CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, ३१ डिसेंबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक ५५ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## रस्ता सुरक्षेसाठी 'एआय'चा वापर

**● मुख्यमंत्री फडणवीसांनी घेतला परिवहन विभागाचा आढावा**


### गुगलसोबत झाला करार

**मुंबई, ३० डिसेंबर**

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात् एआयचा वापर रस्ता सुरक्षेसाठी करण्यावर भर द्यावा. यासाठी गुगलसोबत करार झाला असल्याने त्याचा प्रभावी वापर करण्यात याला, असा निर्देश सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यासोबत त्यांनी आज परिवहन विभागाचा आढावा घेतला.

राज्यातील परिवहन क्षेत्र सुरक्षित, सुंदर आणि शाश्वत ठेवण्यासाठी पुढील तीन वर्षांत नवीन ईव्ही धोरण घोषित करण्यासोबतच १५ वर्षे झालेली वाहने भंगारात काढावी, रस्ते अपघाताचे प्रमाण करण्यासाठी एआयचा वापर करून रस्ते सुरक्षा वाढविण्यावर भर देण्यात यावा. यासंदर्भात गुगलशी करार झाला असल्याने त्याचा वापर करावा, असा निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी बैठकीत दिला.

वडसा-गडचिरोली तसेच सोलापूर-उस्मानाबाद येथील रेल्वे प्रकल्पाचे काम हाती घेण्याची सूचना त्यांनी केली. राज्य परिवहन सेवेच्या १५ वर्षे झालेल्या बसेस भंगारात टाकून उर्वरित बसेसमध्ये एलएनजी तसेच सीएनजी किट बसविण्यात यावी, जेणेकरून बसेसची कार्यक्षमता वाढेल. या बैठकीत पुढील १०० दिवसांचा आढावाही घेण्यात आला. सह्याद्री अतिथीगृह येथे परिवहन, बंदरे आणि महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाच्या आराखड्याच्या अनुषंगाने फडणवीस यांनी आढावा घेतला.




### १३ हजार शासकीय वाहने भंगारात काढणार

राज्यात परिवहन सेवेला अधिक गती देण्यासाठी राज्यात बाईक टॅक्सी, मॅक्सी कॅब सुरू करण्यावर भर देण्यात यावा. त्याचबरोबर जुन्या १३ हजार शासकीय वाहने भंगारात काढली जावी. टॅक्सी, ऑटो, शहर बस सेवेचे तिकिट दरासंदर्भात निर्णय घेण्याबाबतही देवेंद्र फडणवीस यांनी सूचना केल्या.

## मणिपुरात बंडखोरांचे चार बंकर्स उद्ध्वस्त

**इम्फाळ, ३० डिसेंबर**

मणिपुरातील पूर्व इम्फाळ आणि कांगपोक्पी जिल्ह्यात कारवाई करीत सुरक्षा दलाने बंडखोरांचे चार बंकर उद्ध्वस्त केले. मागील आठवड्यात झालेल्या चकमकीनंतर तीन जणांना ताब्यात घेण्यात आले, अशी माहिती पोलिसांनी सोमवारी दिली.

थामनापोक्पी आणि सनासाबी गावाच्या सीमेवर असलेल्या अनेक भागांत मागील दोन दिवसांत मोठ्या प्रमाणात कारवाई केल्यानंतर हे बंकर उद्ध्वस्त करण्यात आले. येथे टेकडीवरील बंदूकधाऱ्यांनी सखल गावांवर हल्ले केले होते. थामनापोक्पी आणि सनासाबी गावात अलिकडे झालेल्या गोळीबारातील सर्व बंडखोरांना बाहेर काढले.

त्यानंतर लष्कर, बीएसएफ आणि सीआरपीएफच्या संयुक्त पथकाने कांगपोक्पी जिल्ह्यातील योक चिंग या बंडखोरांचे वर्चस्व असलेल्या गावावर ताबा मिळवला. कांगपोक्पी जिल्ह्यातील लगतच्या टेकड्यांवरील सशस्त्र बंदुकधाऱ्यांनी सखल भागात असलेल्या थमनापोक्पी आणि सनसाबी गावांवर बंदुकीने हल्ले केले.




सोलापूर : २०२४ हे वर्ष निवडणुकीचे झाले. विधानसभा निवडणुकीत लाडकी बहीण योजना सत्ताधारी युतीला गेमचेंजर ठरली. त्या लाडक्या बहीणीचे चिमुकल्यासोबत संभाजी तलाव परिसरात टिपलेले छायाचित्र.

(छायाचित्र : केवल तिवारी)

## नववर्षात अर्थव्यवस्था सुस्साट : संजय मल्होत्रा

**मुंबई** : २०२५ मध्ये उच्च ग्राहक आणि व्यावसायिक आत्मविश्वासाच्या पृष्ठभूमीवर भारतीय अर्थव्यवस्था सुधारण्याची शक्यता आहे, असे भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी म्हटले आहे. उच्च विकासदर गाठण्यासाठी आम्ही वित्तीय स्थैर्य कायम ठेवण्याचा



प्रयत्न करीत आहोत. वित्तीय संस्थांचे तसेच अधिक व्यापक स्वरूपात यंत्रणेत स्थैर्य कायम ठेवण्यावर आम्ही आमचे लक्ष केंद्रित केले आहे, असे मल्होत्रा यांनी आर्थिक स्थैर्य अहवालात म्हटले आहे. जागतिक पातळीवर अनिश्चितता असूनही चालू आर्थिक वर्षाच्या उत्तरार्धात भारतीय अर्थव्यवस्थेने वेग घेतला आहे. जागतिक अनिश्चितेत २०२४-२५ च्या पहिल्या सहामाहीत अनेक देशांच्या आर्थिक हालचाली मंदावल्या असताना भारतीय अर्थव्यवस्थेत सुधारणा होण्याची अपेक्षा आहे, असे मल्होत्रा यांनी सांगितले. पहिल्या सहामाहीतील घसरणीच्या मुद्यावर अर्थमंत्रालयाने नोव्हेंबरच्या आर्थिक विश्लेषणात चिंता व्यक्त केली होती. एचवनमधील मंदीसाठी संरचनात्मक घटकही कारणीभूत असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे अर्थमंत्रालयाने म्हटले होते.

## अदानी विकणार विलमारमधील हिस्सा

**नवी दिल्ली** : अब्जाधीश गौतम अदानी यांच्या समूहाने सोमवारी एफएमसीजी संयुक्त उपक्रम विलमारमधून बाहेर पडण्याची घोषणा केली. ते त्याचा संपूर्ण हिस्सा सिंगापूरच्या भागीदाराला दोन अब्ज डॉलर्सला विकणार आहेत. अमेरिकेतील लाचखोरीच्या आरोपानंतरचा हा पहिला मोठा करार आहे. फॉर्च्युन ब्रॅण्ड खाद्यतेल, गव्हाचे पीठ आणि इतर खाद्यपदार्थ बनवणारी कंपनी विलमारमध्ये अदानी समूहाची ४३.९४ हिस्सेदारी आहे. त्यापैकी ३१.०६ टक्के हिस्सेदारी विलमार इंटरनॅशनलला विकणार असल्याची माहिती अदानी एंटरप्रायझेस लिमिटेडने दिली. किमान सार्वजनिक भागभांडवलाची गरज पूर्ण करण्यासाठी जवळपास १३ टक्के भाग खुल्या बाजारात विकले जातील.

## मस्साजोग सरपंच हत्येतील सर्व आरोपी लवकरच गजाआड

**चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली माहिती**

**नवी दिल्ली, ३० डिसेंबर**

बीड जिल्ह्याच्या मस्साजोग येथील सरपंच हत्या प्रकरणातील सर्व आरोपी लवकरच गजाआड होतील, कोणीच सुटणार नाही, असा निर्वाळा भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिला.



भाजपाच्या संघटन पर्व बैठकीसाठी राजधानी दिल्लीत आले असता नवीन महाराष्ट्र सदनात पत्रकारांशी बोलताना बावनकुळे म्हणाले की, या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक होईल, मग तो कोणीही असो, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानभवनातून राज्यातील जनतेला दिले आहे.

या प्रकरणाचा तपास विविध पातळ्यांवर सुरू आहे. तपासात कोणतीही चूक होऊ नये, याची खबरदारी घेतली जात आहे. अटक झाल्यानंतर न्यायालयातून कुणी सुटणार नाही, सर्वांना शिक्षा होईल, याची काळजी तपासातून घेतली जात आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांची तपासावर नजर आहे, असे बावनकुळे म्हणाले.

तपासात अडथळा येईल, तपास भरकटेल तसेच तपास यंत्रणांचे मनोधैर्य खचेल, अशी विधाने कोणी करू नये, असे आवाहन करत बावनकुळे म्हणाले की, या संवेदनशील तपासात सर्वांनी आपापल्या परीने मदत केली पाहिजे. या प्रकरणाशी संबंधित कोणताही आरोपी तुम्हाला तुरुंगाबाहेर असल्याचे दिसणार नाही. काही भाजपा आमदारांनीही या प्रकरणाच्या तपासाबाबत चिंता व्यक्त करणारी विधाने केली आहेत. त्यांनीही पोलिस आणि आपल्या सरकारवर विश्वास ठेवावा, या मुद्यावर माझी त्यांच्याशी चर्चा झाली आहे, असे ते म्हणाले.

**नव्या प्रदेशाध्यक्षाची निवड लवकरच**

राज्यातील संघटनात्मक निवडणुकीची प्रक्रिया लवकरच पूर्ण होऊन नव्या प्रदेश अध्यक्षाची निवड केली जाईल, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

## अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टर यांचे निधन

**वॉशिंग्टन, ३० डिसेंबर**

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टर यांचे रविवारी निधन झाले. ते १०० वर्षांचे होते. ते अमेरिकेचे ३९ वे राष्ट्राध्यक्ष होते. कार्टर यांचे हरयाणातील एका गावाशी खास नाते आहे. भारत भेटीवर आले तेव्हा त्यांच्या सन्मानार्थ या गावाला कार्टरपुरी असे नाव दिले आहे.

१९७७ मध्ये आर. फोर्ड यांचा पराभव करून जिमी कार्टर राष्ट्राध्यक्ष झाले. डेमोक्रॅटिक पक्षाकडून त्यांची अध्यक्षपदी निवड झाली होती. १९७७ ते १९८१ पर्यंत कार्टर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. २००२ मध्ये त्यांना शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाला होता. या काळात त्यांनी मध्यपूर्वेतील संबंधांचा पाया घातला. कार्टर यांचा जन्म १ ऑक्टोबर १९२४ रोजी झाला. कार्टर हे १९७१ ते १९७५ या काळात जॉर्जियाचे गव्हर्नरही होते.



जिमी कार्टर हे भारताला भेट देणारे तिसरे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते. कार्टर यांनी भारत दौऱ्यावर असताना तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्यासोबत दिल्ली जाहीरनाम्यावर स्वाक्षरी केली होती.या घोषणेने आणि अमेरिका यांच्यातील संबंधांचा नवे पर्व सुरू झाले होते. भारत भेटीवर आले. ३ जानेवारी १९७८ रोजी कार्टर आणि तत्कालीन फर्स्ट लेडी रोझलिन कार्टर यांनी हरयाणातील दौलतपूर नसीराबाद या गावाला भेट दिली.

## धस यांनी मागितली प्राजक्ताची माफी



अभिनेत्री प्राजक्ता माळीने सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत, आपल्या व्यथा मांडल्या.

**◆ बीड, ३० डिसेंबर**

अभिनेत्री प्राजक्ता माळीबाबत वादग्रस्त वक्तव्य करणारे बीडचे भाजपा आमदार सुरेश धस यांनी सोमवारी दिलगिरी व्यक्त केली. प्राजक्ता माळीने पत्रपरिषद घेत धस यांनी माफी मागावी, अशी मागणी केली होती.

प्राजक्ता माळीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन याबाबत दखल घ्यावी, अशी विनंती केली. यानंतर काही वेळातच आ. सुरेश धस यांनी प्राजक्ता माळीची माफी मागितली. माझ्या वक्तव्यामुळे कुणाचे मन दुखावले असेल, तर मी दिलगिरी व्यक्त करतो, असे धस यांनी म्हटले आहे. प्राजक्ता माळी यांच्याबाबत माझ्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ काढण्यात आला. मला त्यांचा अपमान करायचा नव्हता. मी सर्व महिलांबाबत आदर बाळगतो. कोणत्याही महिलेचे मन दुखावले असेल, तर मी दिलगिरी व्यक्त करतो, असे धस यांनी सांगितले.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राज्यातील राजकारण चांगलेच ढवळून निघाले. मंत्री धनंजय मुंडे यांच्याशी संबंध असलेल्या वाल्मीकि कराडचा या हत्येत सहभाग असल्याचा आरोप होत आहे. या प्रकरणावरूनच आ. धस यांनी परळीमध्ये कसे इव्हेंट पॉलिटिक्स चालते, याचे उदाहरण देताना प्राजक्ता माळीचे नाव घेतले होते. (वृत्तसंस्था)

## अवैध वाळू उपसा; एकास ३ वर्षे साधी कैद

**● न्यायालयाने सुनावली शिक्षा**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.३० डिसेंबर-**

ब्रह्मपुरी येथील भीमा नदी पात्रातून बेकायदा वाळू उपसा करून पर्यावरणास हानी पोहोचणे व वाळू चोरी केल्याप्रकरणी मंगळवेढा न्यायालयाच्या न्यायाधीश एस. एन. गंगवाल-शहा यांनी ट्रॅक्टर चालक कालिदास दत्तात्रय पाटील (रा. ब्रह्मपुरी) याला दोषी धरून वाळू चोरीप्रकरणी तीन वर्षे शिक्षा सुनावली.

यातील आरोपी ट्रॅक्टर चालक कालिदास दत्तात्रय पाटील (रा. ब्रह्मपुरी) याने दि.९ मे २०१८ रोजी दुपारी २.३० च्या दरम्यान ब्रह्मपुरी येथील भीमा नदीच्या पात्रातून (क्र. एम. एच. ४५/ ए. डी. ०९४८) या ट्रॅक्टरमध्ये ७ हजार रुपये किंमतीची एक ब्रास वाळू उपसा करून पर्यावरणास ऱ्हास होईल असे कृत्य करून वाळू चोरून घेऊन जाताना फिर्यादी तलाठी दिगंबर मोरे यांना मिळून आल्यावर त्यांनी पोलिसात गुन्हा दाखल केला होता. याचा तपास तत्कालीन सहाय्यक फौजदार एम. बी. जमादार यांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. यामध्ये साक्षीदार म्हणून बोराळचे तत्कालीन तलाठी विनोद बनसोडे व पंच म्हणून अमीर मुजावर आदींच्या साक्षी पूर्ण झाल्या. यामध्ये ब्रह्मपुरीचे तत्कालीन तलाठी तथा फिर्यादी दिगंबर मोरे व तलाठी विनोद बनसोडे यांच्या साक्षी महत्त्वपूर्ण ठरल्या. सरकार पक्षाच्यावतीने ॲड. धनंजय बनसोडे यांनी बाजू मांडली. यामध्ये वाळू उपशामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असून याचा निसर्गावर परिणाम होत आहे. अवैध वाळू उपसामधून मिळणाऱ्या काळ्या पैशामुळे मुजोरी वाढून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनतो. त्यामुळे आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा ठोठावावी आदी मुद्दे मांडल्याने न्यायाधीश एस. एन. गंगवाल-शहा यांनी शिक्षा ठोठावली.

## चहासाठी वापरले जाणारे प्लॅस्टिक कप धोकादायक

**● उत्पादन व वितरणावर कारवाई**

**मुंबई, ३० डिसेंबर**

चहा विक्रेत्यांकडून ग्राहकांना प्लॅस्टिक कपात चहा देण्यात येतो. या कपांना आतील भागात प्लॅस्टिकचे पातळ वेष्टन असल्यामुळे कपांमध्ये गरम चहा टाकल्यावर आतील मायक्रो प्लॅस्टिक वितळून त्याचे कण चहा पिणाऱ्यांच्या पोटात जातात. त्यामुळे कॅन्सरसारखे गंभीर आजार होण्याची शक्यता असते.



अशा घटकांवर प्रतिबंध घालण्यात आला असून, शहरात कोणी ते वापरू नये म्हणून मनपा प्रशासनाने अभियान सुरू केले आहे. जे कोणी असे कप वापरतील, त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाणार आहे.

शासनाने बंदी घातलेल्या एकल यूज प्लॅस्टिक व थर्माकोल अविघटनशील वस्तूंचे उत्पादन, वापर, विक्री व वाहतुकीवर राज्यात बंदी घालण्यात आली असून, अकोला महानगरपालिका प्रशासनाद्वारा प्रतिबंधित प्लॅस्टिकवर नियमित कारवाई करण्यात येत आहे. तसेच चहा, ज्युस, लस्सी, पाणी इत्यादीकरिता प्लॅस्टिकचे पातळ वेष्टन असलेल्या कागदी कपांमुळे मोठ्या प्रमाणात कचरा निर्मिती होत असून, यामुळे नालेही तुबंतात आणि कचऱ्यात असलेले प्लॅस्टिक अविघटनशील असल्याने पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होतो. एकल वापर प्लॅस्टिक उत्पादनांवर बंदी असल्याने संबंधित प्लॅस्टिक उत्पादक, वितरक, साठवणूकदार, विक्रेते, हॉटेल व्यावसायिक, चहा, ज्युस विक्रेत्यांना अशा प्रतिबंधित वस्तूंचा वापर, विक्री, साठा, उत्पादन व वितरण करू नये, असे मनपा प्रशासनाने बजावले आहे. व्यावसायिकांकडे कोणत्याही प्रकारचे प्रतिबंधित प्लॅस्टिक आढळून आल्यास कारवाई केली जाणार आहे.

## सोन्याच्या साठ्यात भारतीय नारी जगावर भारी

### जागतिक सुवर्ण परिषदेचा अहवाल, महासत्तांसह अनेक देशांनाही टाकले मागे

**◆ नवी दिल्ली, ३० डिसेंबर**

भारतीय संस्कृतीत महिलांना लक्ष्मीचे रूप माणण्यात येते. लक्ष्मी ही धनाची देवता आहे. महिला या लक्ष्मीचे रूप असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. कारण, जागतिक सुवर्ण परिषदेकडून जो अहवाल प्रसिद्ध करण्यात आला, त्यात केलेल्या दाव्यानुसार जगातील एकूण सोन्यापैकी तब्बल ११ टक्के सोने भारतीय महिलांकडे आहे.

सोन्याच्या बाबतीत भारतीय महिलांनी महासत्तासह अनेक देशांनाही मागे टाकले आहे. बचत म्हणून भारतीय महिला सोने खरेदीला प्राधान्य देतात तसेच लग्न किंवा सणासुदीला सोने खरेदी करण्याला महत्त्व दिले जाते. त्यामुळेच भारतीय महिलांकडे दागिन्यांच्या स्वरूपात असलेला सोन्याचा साठा दिवसेंदिवस वाढत आहे. अहवालानुसार, सध्याच्या घडीला भारतीय महिलांकडे २४ हजार टन सोने दागिन्यांच्या स्वरूपात आहे. विशेष बाब अशी की, भारतीय महिलांकडे असलेले सोने आर्थिक महासत्ता असलेल्या पहिल्या पाच देशांच्या एकत्रित सोन्याच्या साठ्यापेक्षा जास्त आहे.

**दक्षिणेतील महिलांची आघाडी**

अहवालानुसार, भारतीय महिलांकडे असलेले सोने अमेरिका आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, स्वित्झर्लंड आणि जर्मनीच्या साठ्यापेक्षा जास्त आहे. भारताच्या एकूण सोन्यापैकी ४० टक्के सोन्याचा वाटा दक्षिणेकडील महिलांकडे आहे. यात एकट्या तामिळनाडूचा वाटा २८ टक्के आहे.



**अर्थव्यवस्थेला आधार**

भारतीय कुटुंबाकडे २१ ते २३ हजार टन सोने होते. २०२३-२४ च्या अहवालानुसार हा आकडा वाढून २४ हजार टन झाला. सोने हे भारताच्या अर्थव्यवस्थेला आधार देण्यासाठी भूमिका बजावते. ज्याचा देशाच्या एकूण देशांतर्गत उत्पादनात ४० टक्के वाटा आहे.



**तुलनात्मक आकडेवारी**

| सोन्याचा साठा (टनात) | अमेरिका | जर्मनी | इटली | फ्रान्स | रशिया | भारतीय महिला |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | ८,००० | ३,३०० | २,४५० | २,४०० | १,९०० | २४,००० |

**आरबीआयकडे किती सोने**

गेल्या अनेक महिन्यांपासून आरबीआय सातत्याने सोन्याची खरेदी करीत आहे. सध्या आरबीआयच्या एकूण परकीय चलनाच्या साठ्यात सोन्याचा वाटा १०.२ टक्के झाला आहे. सेंट्रल बँकेच्या ताज्या आकडेवारीनुसार, देशातील सोन्याचा साठा नोव्हेंबरअखेर ८७६.१८ टन इतका वाढला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत हे प्रमाण ९ टक्क्यांनी अधिक आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

भविष्याची सांगे दिशा
'सोलापूर तरुण भारत'ची

२०२५ दिनदर्शिका

- नव्या वर्षाची नवी कोरी दिनदर्शिका
- वर्षभर संग्रही राहील अशा वाचनीय मजकुरासह २४ पानांची रंगीत दिनदर्शिका
- प्रत्येक तारखेचा बारीक-सारिक तपशील
- तिथी वार, नक्षत्र, बारा राशींचे भविष्य, योगासन, पर्यटन, हॉटेलिंग, आरोग्य विषयी भरगच्च मजकुरासह...



आजच आपल्या दिनदर्शिकेची अंक वितरकाकडे नोंदणी करा.

दिनदर्शिका किंमत २८/- रु.

उद्याच्या अंकासोबत उपलब्ध...

नोंदणीसाठी संपर्क : 8888847267

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### फुटबॉल : भारतीय महिलांचा मलेशियावर १४-० ने विजय



**बंगळुरू** : भारतीय महिला फुटबॉल संघाचे नवनियुक्त स्वीडिश प्रशिक्षक जोकिम अॅलेक्झांडरसन यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी भारतीय महिला फुटबॉल संघाने फिफा मैत्रिपूर्ण फुटबॉल सामन्यात पाहुण्या मालदीव संघावर शून्यविरुद्ध १४ गोलने दणदणीत विजय नोंदवला. पादुकोण-द्रविड सेंटर फॉर स्पोर्ट्स एक्सलन्समध्ये खेळल्या गेलेल्या दोन पैकी पहिल्या मैत्रिपूर्ण सामन्यात भारतीय संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. दुसरा सामना २ जानेवारी २०२५ रोजी त्याच ठिकाणी खेळला जाणार आहे. मध्यंतरापर्यंत भारताने ८-० अशी आघाडी घेतली. या मैत्रिपूर्ण आंतरराष्ट्रीय फुटबॉल सामन्याच्या माध्यमातून प्रशिक्षक अॅलेक्झांडरसन यांनी तब्बल आठ खेळाडूंना आंतरराष्ट्रीय पदार्पणाची संधी दिली. त्यापैकी तिघांनी आक्रमक कामगिरी केली व सामन्यात भारतासाठी ८ गोल केले. अनुभवी प्यारी झॅक्सा व पदार्पणकर्ता लिन्डा कोम सेर्टोने हॅट्ट्रिकसह अनुक्रमे तीन आणि चार गोल केले तर नेहा आणि काजोल डिसूझाने प्रत्येकी दोन गोल, तर संगिता बासफोर, सोरोखैबम रंजना चनू आणि रिंपा हलदरने प्रत्येकी एका गोलची नोंद केली. आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधील भारतीय महिलांचा हा सर्वात मोठा विजय ठरला.

### जम्मू-काश्मीरचा उमर अहमद खो-खो विश्वचषकात खेळणार

**श्रीनगर** : जम्मू -काश्मीरच्या बर्फाळ मैदानावर खेळणारा उम्मर अहमद एक स्वप्नाचा पाठलाग करीत आहे. हा उमर अहमद पुढील महिन्यात नवी दिल्लीत होणाऱ्या पहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेत भारतीय पुरुष संघाचा भाग होण्यास आणि देशासाठी सुवर्णपदक जिंकून देण्यास उत्सुक आहे. 'सराव एखाद्या माणसाला परिपूर्ण बनवितो' यावर उम्मर अहमदचा ठाम विश्वास आहे. बडगमचा रहिवासी, उम्मर सहाव्या वर्गात होता, तेव्हापासून तो खो-खो खेळत आहे आणि आता आगामी खो-खो विश्वचषकासाठी भारतीय पुरुषांच्या संघात स्थान मिळविणार आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत उम्मर आपली प्रशिक्षण दिनचर्या अतिशय धार्मिकपणे पाळतो. मी विश्वचषक स्पर्धेसाठी खरोखर उत्साही आहे. आपल्या सर्वांसाठी ही एक उत्तम संधी आहे आणि देशासाठी सुवर्णपदक जिंकण्याचे आमचे लक्ष्य आहे. आपल्या सर्वांसाठी हा एक अभिमानाचा क्षण आहे की भारतात पहिले खो-खो विश्वचषक स्पर्धा होणार आहे, असे उमर अहमद म्हणाला. नवी दिल्लीत आगामी १३ ते १९ जानेवारीदरम्यान पहिली खो-खो विश्वचषक स्पर्धा होणार आहे.

### संतोष करंडकासाठी आज पश्चिम बंगाल, केरळ लढत

**हैदराबाद** : प्रतिष्ठेच्या संतोष करंडक राष्ट्रीय फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेत येथे मंगळवारी होणाऱ्या अंतिम सामन्यात समृद्ध इतिहास असलेले देशातील दोन उत्कृष्ट संघ- पश्चिम बंगाल आणि केरळ यांच्यादरम्यान लढत होणार आहे. पश्चिम बंगालने ४७ व्यांदा, तर केरळने १६ व्यांदा या राष्ट्रीय स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळविले आहे. दोन्ही संघांनी स्पर्धेत आतापर्यंत आपला जबरदस्त फॉर्म दाखविला आहे. त्यांनी आपल्या १० सामन्यांपैकी नऊ सामने जिंकून स्पर्धेत वर्चस्व गाजविले आहे. ऐतिहासिकदृष्ट्या पश्चिम बंगालने या टप्प्यावर वर्चस्व राखले आहे. अलिकडच्या वर्षांत केरळ संघानेही आपल्या खेळाचा वेग वाढविला आहे. त्यांनी २०१७-१८ आणि २०२१-२२ मध्ये पश्चिम बंगालला पराभूत करून विजेतेपद पटकावले होते. संतोष करंडकाची अंतिम फेरी गाठणे ही आमच्या राज्यासाठी एक मोठी उपलब्धी आहे, असे पश्चिम बंगालचे मुख्य प्रशिक्षक संजॉय सेन म्हणाले. होय, आम्ही यापूर्वी ३२ वेळा ही स्पर्धा जिंकली आहे, परंतु त्यामध्ये भाग घेणाऱ्या राज्यांच्या संख्येच्या दृष्टीने आता संतोष करंडक ही एक मोठी स्पर्धा आहे, जोपर्यंत आम्ही ट्रॉफी जिंकत नाही तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही, असेही ते म्हणाले.

### युनायटेड चषकात पोलंडचा नॉर्वेविरुद्ध २-१ ने विजय

**सिडनी** : येथे सुरू असलेल्या युनायटेड चषक टेनिस स्पर्धेत सोमवारी इगा स्वियातेकने महिला एकेरीचा सामना जिंकला आणि त्यानंतर जॅन झिलिन्स्कीच्या साथीने महिला दुहेरीचा सामना जिंकून आपल्या पोलंड संघाला नॉर्वेविरुद्ध २-१ असा विजय मिळवून दिला. सिडनीच्या चाहत्यांसमोर स्वियातेक व कॅस्पर रुडने एकेरी विजय मिळविल्यानंतर स्वियातेक व झिलिन्स्कीने उलिरकी आयकरी व रुडविरुद्ध ६-३, ०-६, १०-८ अशी चिवट झुंज दिली. विजय मिळाल्याचा मला खरोखर आनंद झाला आहे. झिलिन्स्कीबरोबर खेळू शकली व आमचा खेळ दाखवू शकली, याचाही मला आनंद झाला. त्यामुळेच आम्ही पोलंडसाठी जिंकू शकलो, असे इगा स्वियातेक सामन्यानंतर म्हणाली. आमच्या विजयाची लय अशीच कायम राखून आम्ही विजेतेपदार्यंत पोहोचू असा विश्वासही तिने व्यक्त केला.

# ऑस्ट्रेलियाचा विजय, मालिकेत २-१ ने आघाडी

## १३ वर्षांनंतर मेलबर्नमध्ये भारताचा कसोटी पराभव




चौथा कसोटी सामना जिंकल्याचा आनंद साजरा करताना पॅट कमिन्ससह ऑस्ट्रेलियन खेळाडू



यशस्वी जयस्वालची एकाकी झुंज



मेलबर्न क्रिकेट मैदानावर बाद झाल्यानंतर भारताचा यशस्वी जयस्वाल पंचांशी युक्तिवाद संवाद करताना

◆ **मेलबर्न, ३० डिसेंबर**

बॉक्सिंग-डे कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारतावर १८४ धावांनी विजय नोंदवला. या विजयाबरोबरच ऑस्ट्रेलियाने बॉर्डर-गावस्कर चषक पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील चार सामन्यांनंतर २-१ अशी आघाडी घेतली. १३ वर्षांनंतर मेलबर्नमध्ये भारतीय संघाचा हा पहिला कसोटी पराभव ठरला. अष्टपैलू कामगिरी करणारा ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. कमिन्सने पहिल्या डावात ४९ धावा काढल्या आणि ८९ धावांत ३ बळी टिपले व दुसऱ्या डावात ४१ धावा काढल्या आणि २८ धावांत ३ बळी टिपलेत.

पहिल्या डावांत १०५ धावांची आघाडी घेणाऱ्या ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या डावात ८३.४ षटकांत सर्वबाद २३४ धावा काढल्या आणि भारतासमोर विजयासाठी ३४० धावांचे लक्ष्य ठेवले, परंतु धावांचा पाठलाग करताना भारताचा दुसरा डाव १५५ धावांतच गडगडला.

यापूर्वी २०११ मध्ये भारतीय संघाचा पराभव झाला होता. ऑस्ट्रेलियाने चौथ्या कसोटी सामन्यांत विजय नोंदवून कसोटी मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे. आता भारत आणि ऑस्ट्रेलियादरम्यान पाचवा आणि शेवटचा कसोटी क्रिकेट सामना ३ जानेवारीपासून सिडनीत खेळवला जाणार आहे.

ऑस्ट्रेलियाने ९ बाद २२८ धावांवरून पुढे आपल्या दुसऱ्या डावास सुरुवात केल्यानंतर बुमराहने नॅथन लियोनला (४१) बाद केले. याबरोबरच ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव ८३.४ षटकांत २३४ धावांत आटोपला.

बुमराहने ५ बळी टिपले, मोहम्मद सिराजने ३ बळी, तर रवींद्र जडेजाने एक बळी टिपला.

विजयासाठी ३४० धावा काढण्याचे आव्हान स्वीकारून भारतीय संघ मैदानावर उतरला, परंतु त्यांचा दुसरा डाव सपशेल कोसळला. सलामीवीर यशस्वी जयस्वाल (८४) व ऋषभ पंत (३०) वगळता एकही भारतीय फलंदाज दोन अंकी धावा काढू शकला नाही. रोहित शर्मा (९), विराट कोहली (५) व केएल राहुल (०) पहिल्या सत्रातच बाद झालेत. यशस्वी जयस्वाल बाद होताच भारतीय संघाच्या आशांना मोठा धक्का बसला आहे. यशस्वीने २०८ चेंडूत ८ चौकारांसह ८४ धावांची खेळी केली, तर पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करणारा ऋषभ पंत ३० धावा काढून तंबूत परतला. उर्वरित भारतीय फलंदाज ऑस्ट्रेलियन गोलंदाजांच्या अचूक माऱ्यापुढे टिकाव धरू शकले नाहीत. शेवटच्या ३० मिनिटांत सामन्याचे चित्रच बदलले. अखेरच्या सत्रात भारताने तब्बल ७ फलंदाज गमावले.

यशस्वी जयस्वालच्या रुपाने भारताचा सातवा गडी १४० धावांवर बाद झाला. पहिल्या डावांत शतकी खेळी करणारा नितीश कुमार रेड्डी (१) नॅथन लियोनच्या गोलंदाजीला बळी पडला. ऑसक्ट्रेलियाकडून पॅट कमिन्स व स्कॉट बोलॅण्डने प्रत्येकी ३ बळी, नॅथन लियोनने २ बळी, तर मिचेल स्टार्क व ट्रॅव्हिस हेडने प्रत्येकी १ बळी टिपला. (वृत्तसंस्था)

# जयस्वाल वादग्रस्तरीत्या यष्टिमागे झेलबाद

◆ **मेलबर्न, ३० डिसेंबर**

सोमवारी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या चौथ्या कसोटी सामन्याच्या अंतिम दिवशी भारताचा सलामीवीर यशसवी जयस्वालला वादग्रस्तरीत्या बाद केल्यामुळे वाद निर्माण झाला, कारण तिसरे पंच सायकत शेरफुडडौला यांनी त्याला नकार दिला.

८४ धावांवर फलंदाजी करत असताना यशस्वी जयस्वालने पॅट कमिन्सच्या आखुड टप्प्याच्या चेंडूवर हुक मारण्याचा प्रयत्न केला, परंतु तो चुकला. यष्टिमागे झेल पकडल्याबाबत ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी जोरदार अपील केली, त्यामुळे मैदानावरील पंच जोएल विल्सन यांनी प्रारंभी फलंदाजाला बाद घोषित केले.

तथापि, पुनरावलोकनानंतर, तिसरे पंच सायकत शेरफुडडौला यांनी असा निर्णय दिला की व्हिज्युअल पुराव्यांच्या आधारे जयस्वालच्या ग्लोव्हज/बॅटवर एक विक्षेप आहे. सायकत यांनी मैदानावरील पंचांचा निर्णय योग्य असल्याचे जाहीर केले. याचदरम्याम मेलबर्न क्रिकेट मैदानावर प्रेक्षक चिटर, चिटर म्हणून ओरडू लागले होते. २०८ चेंडूंत ८४ धावांची खेळी करणाऱ्या यशस्वी जयस्वालला मैदान सोडावे लागले.

डावखुरा फलंदाज यशस्वी जयस्वालने परत जाण्यापूर्वी मैदानावरील पंचांशी युक्तिवाद केला.

माझ्या मते निर्णय संपला. तिसऱ्या पंचांनी शेवटी योग्य निर्णय घेतला, असे आयसीसी माजी एलिट पॅनेल पंच सायमन टॉफेल यांनी सांगितले.

तंत्रज्ञानाच्या नियमांचे पालन केले आहे. जेव्हा पंच फलंदाजीवर स्पष्ट विक्षेप बघतो, तेव्हा त्यापुढे जाण्याची गरज नाही, असे टॉफेल म्हणाले. (वृत्तसंस्था)

# आम्ही जिंकण्याचे मार्ग शोधण्यात कमी पडलो : रोहित शर्मा

◆ **मेलबर्न, ३० डिसेंबर**

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या चौथ्या कसोटी सामन्यात १८४ धावांनी झालेला पराभव हा मानसिकदृष्ट्या त्रासदायक आहे. या सामन्यात आमचा संघ लढायला अपयशी ठरला. आम्ही जिंकण्याचे मार्ग शोधण्यात कमी पडलो, असे भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मानि सामन्यानंतर मान्य केले.

बॉर्डर-गावस्कर चषक पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत ऑस्ट्रेलियाने २-१ अशी आघाडी घेतली. आता पाचवा आणि अंतिम कसोटी सामना सिडनी येथे ३ जानेवारीपासून खेळला जाणार आहे.




बॉक्सिंग-डे कसोटी सामन्यात आम्हाला शेवटपर्यंत संघर्ष करायचा होता आणि दुर्दैवाने आम्ही ते करू शकलो नाही, हे मानसिकदृष्ट्या त्रासदायक आहे, असे सध्या स्वतः वाईट फॉर्ममध्ये असलेला रोहित शर्मा म्हणाला.

आम्ही आमच्याकडे असलेले सर्व शक्ती पणाला लावली, परंतु त्यांनी कठोर संघर्ष केला, विशेषतः शेवटच्या गड्यासाठी त्यांनी केलेली भागीदारी आम्हाला महागात पडली, असे तो म्हणाला.


आम्हाला माहित आहे की ३४० धावांचे लक्ष्य गाठणे सोपे होणार नाही, याची आम्हाला कल्पना होती, म्हणून आम्हाला विकेट टिकवून शेवटपर्यंत खेळायचे होते, परंतु तसे काही झाले नाही, असो तो शेवटी म्हणाला.

कर्णधार रोहित शर्मानि शतकवीर नितीश कुमार रेड्डी व वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहची मुक्तकंठाने प्रशंसा केली. (वृत्तसंस्था)

# रोहितने भविष्याबद्दल निर्णय घेण्याची गरज : शास्त्री

◆ **मेलबर्न, ३० डिसेंबर**

विराट कोहलीला अजूनही ३-४ वर्षे क्रिकेट खेळू शकतो, परंतु कर्णधार रोहित शर्माला सध्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेतील फॉर्म लक्षात घेता स्वतःच्या भविष्याबद्दल निर्णय घेण्याची गरज आहे, असे मत भारतीय संघाचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी व्यक्त केले. रोहितने पाच डावांमध्ये केवळ ३१ धावा केल्या आहेत. ऑस्ट्रेलियन मातीवरील



पाहुण्या संघाचा कर्णधार म्हणून त्याची सर्वात कमी आहे. त्याने ६.२० च्या निराशाजनक सरासरीने ३, ६, १०, ३ आणि ९ धावा केल्या आहेत. रोहितचा पुढचा पाय खरोखरच चेंडूकडे जितके पाहिजे तितके पुढे जात नाही, असेही ते म्हणाले. पर्थ कसोटी सामन्यात शतक असूनही कोहलीने मालिकेत आतापर्यंत ५, नाबाद १००, ७, ११, ३६ आणि ५ धावा केल्या आहेत. विचार करा विराट आणखी काही काळ खेळू शकेल. मला वाटते की तो आणखी तीन किंवा चार वर्षे खेळेल, असे शास्त्री म्हणाले. (वृत्तसंस्था)


# ऑस्ट्रेलिया दुसऱ्या, भारत तिसऱ्या स्थानी कायम

## डब्ल्यूटीसी क्रमवारी

◆ **मेलबर्न, ३० डिसेंबर**

मेलबर्न क्रिकेट मैदानावर बॉक्सिंग-डे कसोटी सामन्यात १८४ धावांनी पराभवाचा सामना केल्यानंतर भारतीय संघ आयसीसी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या क्रमवारीत तिसऱ्या स्थानी कायम आहे, तर ऑस्ट्रेलियानेही आपले दुसरे स्थान कायम राखले.

सोमवारी चौथ्या कसोटी सामन्यात झालेल्या पराभवानंतर भारताच्या गुणांची टक्केवारी (पीसीटी) ५५.८८ वरून ५२.७८ घसरली आहे, तर ऑस्ट्रेलियाच्या पीसीटीने ५८.८९ वरून ६१.४६ वर झेप घेतली.



ऑस्ट्रेलिया डब्ल्यूटीसीच्या अंतिम फेरीत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळू शकतो.

ऑस्ट्रेलिया पुढील वर्षी श्रीलंकेला अतिरिक्त दोन कसोटींसाठी दौरा करणार आहे. म्हणजे जर ते सैद्धांतिकदृष्ट्या भाराताविरुद्धच्या मालिकेत २-२ ने बरोबरीत राहिले, तरी ते डब्ल्यूटीसीच्या अंतिम फेरीत स्थान मिळवू शकतात.

तथापि, भारत अजूनही जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरू शकतो, परंतु सिडनीमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेची अंतिम कसोटी जिंकली पाहिजे आणि त्यानंतर श्रीलंकेमध्ये पुढील महिन्यात होणाऱ्या ऑस्ट्रेलियाच्या मालिकेच्या निकालावर अवलंबून राहणे आवश्यक आहे.

ऑस्ट्रेलियाने चौथ्या कसोटी सामन्यात भारतावर १८४ धावांनी विजय मिळविल्यामुळे बॉक्सिंग-डे कसोटी आश्चर्यकारक कळस ठरली आहे. या विजयामुळे ऑस्ट्रेलियाने आता बॉर्डर-गावस्कर चषक पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारतावर २-१ ने आघाडी घेतली आहे. ३ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या सिडनी येथील पाचव्या आणि अंतिम कसोटी सामन्यात पराभव टाळून ते चषक परत जिंकू शकतील. (वृत्तसंस्था)




# मानांकित खेळाडूंची विजयी सलामी

## पांडुरंग पैकेकरी स्मृती चषक बुद्धिबळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**
पांडुरंग पैकेकरी स्मृती चषक बुद्धिबळ स्पर्धेत मानांकित खेळाडूंनी विजयी सलामी दिली. सुंदर मल्टीपर्पज हॉल सोलापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत १९४ खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. ३० वर्षाखालील गटात चौथ्या फेरीअखेर सांनवी गोरे,दौडे तेजस,स्वप्नील हदगल,सार्थक उंबरे, लिमकर वरद रणजीत गायकवाड हे खेळाडू चार पैकी चार गुण मिळवुन तर ९ वर्षाखालील गटात श्लोक चौधरी,क्षीरसागर मनस्वी,निरंजन ओम,मुसळे सृष्टी हे खेळाडू आहेत.
या स्पर्धेचे उद्घाटन प्रयोजन संतोष पैकेकरी व सुशील कुमारजी शिंदे भारत वकास इंग्लिश मीडियम स्कूल प्राचार्य पूनम सोनटकले यांनी केले.
या स्पर्धेत प्रमुख परीक्षक पंच म्हणून
प्रशांत पिसे, इराणा जमादार, सचिन चव्हाण, सम्मेद हुल्ले, बिलानीसिध्द बिराजदार, मंगल हुल्ले व हरिओम नाईक हे काम पहात आहेत.

# हिराचंद नेमचंद वाणिज्य महाविद्यालयाची विजयी सलामी

## जन्मेंजय भोसले करंडक महाविद्यालयीन क्रिकेट

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**
स्वप्निल हंचाटे आणि अथर्व अकेन यांच्या अष्टपैलू खेळाच्या जोरावर हिराचंद नेमचंद वाणिज्य महाविद्यालयाने बार्शीच्या एमआयटी कॉलेजचा पराभव करीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन जन्मेजय भोसले चषक क्रिकेट स्पर्धेची विजयी सलामी दिली.

संगमेश्वर महाविद्यालयाने या स्पर्धेचे आयोजन केले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, विफा फुटबॉल असोसिएशनचे सचिव डॉ. किरण चौगुले व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण यांच्या उपस्थितीत या स्पर्धेचे उद्घाटन झाले. या स्पर्धेत २२ महाविद्यालयांनी भाग घेतला आहे. या स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता महाविद्यालयाचे प्रा. संतोष खेंडे, प्रा. विभुते, प्रा. शरण वांगी आदी परिश्रम घेत आहेत.



**अन्य निकाल :**
केबीपी महाविद्यालय पंढरपूर विजयी विरुद्ध संगमेश्वर रात्र महाविद्यालय, स्वेरी कॉलेज पंढरपूर विजयी विरुद्ध वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, हिराचंद नेमंचंद कॉलेज विजयी विरुद्ध बीपी सुलाखे महाविद्यालय बार्शी, गरड महाविद्यालय मोहोळ विजयी विरुद्ध बीएमआयटी सोलापूर.




# शिवनेरी राज्य शरीरसौष्ठव स्पर्धेत लोणारला सुवर्ण

## महाराष्ट्राचा मोस्ट इम्प्रूव्हडचाही मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**
पुणे जिल्ह्यातील जुन्नरमध्ये येथे झालेल्या शिवनेरी श्री राज्यस्तरीय बॉडी बिल्डिंग स्पर्धेत सोलापूर जिल्ह्याचा पंचाक्षरी लोणार याने ६५ ते ७० किलो गटात सुवर्ण पदक पटकाविले. त्याने राज्यातील सहभागी सर्व खेळाडूंमधून मोस्ट इम्प्रूव्हडचा खेळाडू हा बहुमानही प्राप्त केला. जुळे सोलापुरातील मॅक्झिमम जिमचा लोणार सदस्य असून जिमचे प्रमुख अन्वर शेख यांचे त्यास मार्गदर्शन लाभले. त्याचे सोलापूर जिल्हा बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस फेडरेशनचे अध्यक्ष संतोष पवार, सरचिटणीस विशाल गायकवाड कार्याध्यक्ष अनिल दादा जाधव, उपाध्यक्ष रवींद्र पाटील, संजय हिरेमठ, शशिकांत अक्कलवाडे, अविनाश गंजे, सहसचिव आतिक नदाफ यांनी त्याचे कौतुक केले.

CMYK



जिहाद भाग-२ ची सुरुवात चार महिन्यांपासून झाली. मालेगाव तालुक्यात बांगलादेशी रोहिंग्यांना भारतीय बनवण्याचा कारखाना सुरू आहे. येथे १,११० बांगलादेशी रोहिंग्यांना जन्म दाखले देण्यात आले.
**किरीट सोमय्या**, भाजपाचे नेते

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा





केरळ मिनी पाकिस्तान आहे. म्हणूनच राहुल गांधी आणि त्यांची बहीण तेथून निवडून येतात. सगळे अतिरेकीच त्यांना मतदान करतात. मी खरे बोलतो. अतिरेक्यांना हाताशी धरूनच हे लोक खासदार झाले आहेत.
**नितेश राणे**, भाजपाचे आमदार

# महाकुंभासाठी सातस्तरीय सुरक्षा व्यवस्था

### उत्तरप्रदेश सरकारची माहिती

◆ **महाकुंभनगर, ३० डिसेंबर**

महाकुंभाला ४० कोटींपेक्षा जास्त भाविक येण्याची अपेक्षा असून, त्यांच्यासाठी सातस्तरीय बळकट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे, अशी माहिती उत्तरप्रदेश सरकारने दिली.

स्थानिक प्रशासनाने रेल्वेस्थानक, बस स्टॅण्ड, विमानतळ आणि इतर महत्त्वपूर्ण मार्गांप्रमाणेच शहर आणि ग्रामीण भागात अस्थायी स्वरूपाची पोलिस ठाणी आणि तपास नाके स्थापित केले आहेत. या सुरक्षा व्यवस्थेला प्रांतीय सशस्त्र कॉन्स्टेब्युलरी, एनडीआरएफ, केंद्रीय सशस्त्र पोलिस दल, बीडीडी आणि एएस चेक टीमचे बळ मिळाले आहे.

शहरी आणि ग्रामीण भागात ही पथके राखीव ठेवण्यात आली आहेत, असे सरकारने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. सुरक्षा व्यवस्था बळकट करण्यासाठी अस्थायी स्वरूपात १३ पोलिस ठाणी आणि २३ तपास नाके स्थापन करण्यात आले. महाकुंभ १३ जानेवारीपासून सुरू होऊन २६ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे.

**अशी आहे पोलिस आयुक्तालयाची विभागणी**

प्रयागराजमधील शहरी आणि ग्रामीण भागात दहा हजार पोलिस तैनात करण्यात आले आहेत. प्रयागराज पोलिस आयुक्तालयाच्या कायमस्वरूपी आणि तात्पुरत्या पायाभूत सुविधांची आठ झोन, १८ सेक्टर, २१ कंपन्या, केंद्रीय सशस्त्र पोलिस दल, पीएसीच्या पाच कंपन्या, एनडीआरएफच्या चार कंपन्या, एएस चेकची १२ पथके आणि चार बीडीडी पथके, अशी विभागणी करण्यात आली आहे. ◂(वृत्तसंस्था)

### सायबर सुरक्षाही वाढवली

महाकुंभात डिजिटल आणि सायबर सुरक्षाही चोख असावी, या मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिलेल्या निर्देशाचे पालन करताना पोलिसांनी भाविकांना सायबर घोटाळ्यांपासून वाचवण्यासाठी एक धोरण तयार केले. पोलिस अधिकाऱ्यांव्यतिरिक्त आयआयटी कानपूरसारख्या सायबरतज्ज्ञांची मदत घेतली आहे, असे पोलिस महासंचालक प्रशांतकुमार यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांच्या पंजाब बंदमुळे वाहतूक कोलमडली

### २२१ पेक्षा अधिक रेल्वे गाड्या रद्द, बससेवाही ठप्प

◆ **चंदीगड, ३० डिसेंबर**

शेतमालाला किमान आधार भाव देण्यासह इतर मागण्यांसाठी पंजाबमधील शेतकऱ्यांनी बंद पुकारला आहे. यामुळे अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले आहे. रेल्वेने सोमवारी २२१ गाड्या रद्द केल्या. याशिवाय बससेवासह इतरही वाहतूक ठप्प आहे.

राज्यातील अनेक भागांत रेल्वेसेवासह रस्ते वाहतूक विस्कळीत झाली असून. बंदच्या आवाहनाचा भाग म्हणून शेतकऱ्यांनी अनेक रस्ते मार्गावर धरणे केली. त्यामुळे प्रवास करणाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागला. अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी झाली. शेतकऱ्यांच्या मागण्यांवर केंद्र सरकारने निर्णय न घेतल्यास संयुक्त किसान मोर्चा आणि किसान मजदूर मोर्चा या दोन्ही संघटनांनी आठवडाभरापूर्वी पंजाब बंदची हाक दिली होती.

सोमवारी सकाळी ७ ते दुपारी ४ वाजेपर्यंत बंद पाळण्यात येणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार राज्यात अनेक भागात शेतकरी रस्त्यावर उतरले होते. अमृतसरच्या गोल्डन गेटसह शहरातील वर्दळीच्या मार्गावर शेतकरी सकाळपासूनच धरण्यावर बसले होते.

**अत्यावश्यक सेवा सुरू**

भटिंडाच्या रामपुरा फुलमध्ये करण्यात आलेल्या धरणे आंदोलनात शेतकरी संघटनांचे नेते सहभागी झाले होते. यावेळा माध्यमांशी बोलताना शेतकरी नेते सर्वन सिंह पंढेर म्हणाले, आपत्कालीन आणि इतर अत्यावश्यक सेवा सुरू ठेवण्यास आमची विरोध नाही. शिवाय विमानाने प्रवास करणाऱ्यांना सुद्धा आंदोलनकारी अडवणार नाही. मात्र, व्यावसायिक प्रतिष्ठान, रस्ते वाहतूक आणि रेल्वेसेवा सुरू ठेवण्यास आमचा विरोध आहे. ◂(वृत्तसंस्था)

# ‘हा’ देश सर्वांत आधी करणार नव्या वर्षाचे स्वागत

◆ **तारवा, ३० डिसेंबर**

नवीन वर्ष सुरू होण्यासाठी काही तास शिल्लक असताना, संपूर्ण जग नव्या वर्षाच्या स्वागतासाठी सज्ज झाले आहे. मात्र, सर्वांत आधी कोणता देश नव्या वर्षाचे स्वागत करणार, हे जाणून घेणे सर्वांसाठीच विशेष आहे. नव्या वर्षाचे सर्वप्रथम जो देश स्वागत करणार आहे, त्याचे कोणी नाव देखील कधी ऐकले नाही.

ओशनिक कंट्री म्हणजेच महासागरात असलेल्या छोट्या बेटांवर वसलेल्या देशांपैकी हा एक देश आहे. या देशाचे नाव ‘किरिबाटी प्रजासत्ताक’ असे आहे. हा देश ३० छोट्या बेटांपासून बनलेला आहे. या देशाच्या पूर्वेकडील बेटांवरून अंतरराष्ट्रीय तारीख रेषा म्हणजेच ‘इंटरनॅशनल डेट लाईन’ जाते. किरिबाटीनंतर न्यूझीलंड, रशिया, सिडनी आणि ऑस्ट्रेलिया हे देश नवीन वर्षाचे स्वागत करतात.




प्रत्येक देशात वेगवेगळ्या वेळेला नवीन वर्षाचे स्वागत केले जाते. किरिबाटी देशाचा आंतरराष्ट्रीय टाईम झोनचा विचार केल्यास युटीएस+१४ तास या वेळेनुसार चालतो. म्हणजेच भारतापेक्षा हा देश साडेसहा तास पुढे आहे. म्हणजेच ३१ डिसेंबरच्या सायंकाळी भारतात साडेपाच वाजलेले असतील, तेव्हा किरिबाटी देश नवीन वर्षाचे स्वागत करीत असेल. सिडनीत रात्री ९ वाजले असताना किरिबाटीमध्ये नवीन वर्ष सुरू होते. लंडनमध्ये तर ३१ डिसेंबरचे सकाळचे दहा वाजलेले असताना हा छोटासा देश नवीन वर्षात पदार्पण करतो. पॅरिस, बर्लीन आणि रोम हे लंडनपेक्षा एक तास पुढे आहेत. म्हणजेच किरिबाटीमध्ये नवीन वर्ष येते, तेव्हा या मोठ्या शहरांमध्ये ३१ डिसेंबरचे सकाळचे ११ वाजलेले असतात.

सर्वांत उशिराने नवीन वर्ष साजरा करणारा देश म्हणजे अमेरिकेतील कुक बेट आहे. ही बेटे किरिबाटीपासून जवळच असली, तरी दोघांमधून आंतरराष्ट्रीय डेट लाईन जाते. त्यामुळेच या दोन्ही ठिकाणांमध्ये २४ तासांचे अंतर आहे.

किरिबाटी देशाबद्दल थोडेसे...

किरिबाटी हा देश कॉमनवेल्थ देशांपैकी एक आहे. भारताप्रमाणे पूर्वी या देशावर ब्रिटिशांचे राज्य होते. या देशाची लोकसंख्या अवघी १० हजार आहे. या देशात सामान्यपणे स्नॉर्कलिंग, फटाक्यांची आतषबाजी, स्विमिंग, मासेमारी, गोल्फ यासारख्या गोष्टींचा आनंद घेत नवीन वर्ष साजरे केले जाते तसेच नृत्य आणि गायनाच्या कार्यक्रमांचेही आयोजन केले जाते. किरिबाटीचे एकूण क्षेत्रफळ केवळ ८११ चौरस किलोमीटर आहे. ◂(वृत्तसंस्था)

# २०२४ मधील महत्त्वाच्या घडामोडींची चित्रझलक



**रामलला प्राणप्रतिष्ठा** : २२ जानेवारीला अयोध्येत रामललाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात नतमस्तक झालेले पंतप्रधान नरेंद्र मोदी



सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेताना नरेंद्र मोदी



मुख्यमंत्रिपदाची शपथ घेताना देवेंद्र फडणवीस



**वर्षातील सर्वांत मोठे लग्न** : मुकेश अंबानी यांचा धाकटा मुलगा अनंत अंबानी याचे राधिका मर्चंटसोबत १२ जुलै रोजी लग्न झाले. या लग्नावर ८ ते १० हजार कोटी रुपये खर्च झाल्याचा अंदाज आहे




**रामललाचा सूर्यतिलक** : रामनवमीला अभिजित मुहूर्तावर दुपारी १२ वाजता सूर्यकिरणांनी प्रभू रामाच्या कपाळावर तिलक केले. शास्त्रज्ञांच्या पथकाने हे काम केले



**सरन्यायाधीशांच्या घरी पूजेत मोदी** : पंतप्रधान नरेंद्र मोदी ११ सप्टेंबर रोजी तत्कालीन सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या घरी पोहोचले आणि मराठी पोशाखात गणेश आरती केली



**पहिला विजय** : काँग्रेस सरचिटणीस प्रियांका वढेरा यांनी वायनाड पोटनिवडणुकीत ४.१० लाख मतांनी विजय मिळवला. प्रियांकाने पहिली निवडणूक लढवली आणि जिंकली



**काश्मिरी फिरान** : भारत जोडो यात्रेदरम्यान उत्तर भारतातील थंडीतही राहुल गांधी हाफ टी-शर्टमध्ये दिसले. ३० जानेवारीला प्रवासाच्या शेवटच्या दिवशी त्यांनी काश्मिरी 'फिरान' घातला होता



**शेवटच्या प्रवासात भारताचे रत्न** : टाटा समूहाचे अध्यक्ष रतन नवल टाटा यांचे ९ ऑक्टोबर रोजी निधन झाले. हे चित्र त्यांच्या शेवटच्या प्रवासातील आहे



**पेशवाई** : प्रयागराजमध्ये १३ जानेवारीपासून महाकुंभ सुरू होणार आहे. पंच दशनम आवाहन आखाड्याच्या पेशवाईत उंटावर स्वार झालेला नागा साधू.



**पतंग महोत्सवात** : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी गांधीनगरमधील उत्तरायण पतंग महोत्सवात सहभाग घेतला आणि पतंगबाजी केली



**जळते मणिपूर** : हे चित्र कुकी महिलेच्या हत्येनंतर जाळपोळ आणि निदर्शनाचे आहे. ३ मे २०२४ रोजी मणिपूरच्या आदिवासी विद्यार्थी संघटनेने एकता मोर्चा काढला होता



**पदक जिंकणारे स्मित** : हरयाणातील मनू भाकरने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत २ कांस्यपदके जिंकली



**शेवटचा निरोप** : वर्षाच्या शेवटी माजी पंतप्रधान मनमोहनसिंग आपल्यापासून दूर गेले. २६ डिसेंबर रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पत्नी गुरशरण कौर आणि मुलगी दमन मनमोहनसिंग यांना अखेरचा निरोप देताना



**वायनाडमध्ये भूस्खलन** : केरळच्या वायनाडमध्ये भूस्खलनात ४०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला. क्षणार्धात गावे उद्ध्वस्त झाली



**गंगास्नान** : यावर्षीच्या १६ जून रोजी गंगा दशेरानिमित्त लाखो भाविकांनी हरिद्वारमधील हर की पौडीला भेट देऊन गंगास्नान केले




**तिरंगा** : २९ जून रोजी टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्माने बार्बाडोसच्या मैदानात भारतीय ध्वज रोवला

## अग्रलेख...

# नवोन्मेषाची पूर्वपहाट...

दिवसांमागून दिवस सरतात, महिन्यांमागून महिने मागे पडतात, वर्षांमागून वर्षे जातात आणि मागे जाणारा प्रत्येक क्षण, प्रत्येक दिवस आपल्या काही खुणा मागे ठेवून पुढचा दिवस भविष्यकाळाच्या हाती सोपवितो. तरीही, सरणारा प्रत्येक दिवस स्मरणात राहातोच असे नाही. काही दिवस इतिहासाच्या पानांवर आपला ठसा उमटवितात, तर काही दिवस केवळ औपचारिकपणे उगवून मावळूनही जातात. असे दिवस आठवणींतून वजा केले, तरी उरलेल्या दिवसांच्या आठवणींची साठवण मनाच्या कप्प्यात आपली अढळ जागा निर्माण करत असतात. गेल्या चार-पाच वर्षांत अशा अनेक दिवसांनी मनामनांतील आठवणींचे कप्पे व्यापले असले, तरी सरत्या वर्षाने मात्र, यावरही मात केली आहे. काहीच घडले नाही, कसलीच नोंद नाही असा एखादा दिवस या वर्षात अभावानेच उगवला असेल. म्हणूनच, सरते वर्ष स्मरणीय ठरणार आहे आणि आपल्या भूतकाळात जाताना नव्या वर्षाच्या पहिल्या क्षणाच्या हाती भविष्य सोपवून या वर्षाच्या अखेरचा क्षण मागे पडून नव्या वर्षाचा क्षण उगवेल, तेव्हा त्या क्षणावर मावळत्या वर्षाच्या त्या पाऊलखुणांची सावली दाटलेली असेल. एका अर्थाने, उद्यापासून सुरू होणाऱ्या नव्या वर्षासमोर, जुन्या वर्षातील असंख्य अविस्मरणीय आठवणींच्या तुलनेचे आव्हान असणार आहे. केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशात आणि जगातही अशा अनेक घटनांनी आपली नोंद सरत्या वर्षाच्या इतिहासावर करून ठेवली आहे आणि त्या नोंदींच्या पाऊलवाटांवरच उद्यापासून सुरू होणाऱ्या नव्या वर्षाची वाटचाल होणार आहे.

गेल्या वर्षभरात महाराष्ट्राने आणि देशानेही अनेक स्थित्यंतरे अनुभवली. सामान्य माणसाच्या जगण्यावर त्याचा प्रभाव पडलाच, पण देशाच्या वर्तमानकाळावर आणि भविष्याच्या वाटचालीवरही त्याचा प्रभाव राहणार आहे. विशेषतः, देशाच्या राजकीय क्षितिजावर सरत्या वर्षाने उमटविलेल्या पाऊलखुणांची सावली नव्या वर्षावरही राहणार आहे. सरत्या वर्षाने देशाच्या राजकारणात अनेक अनपेक्षित, अपेक्षित वळणे घेतली, काही घडामोडी अनाकलनीय ठरल्या, तर काहींनी अपेक्षापूर्तीचे समाधान जनतेस दिले. लोकसभेच्या निवडणुकांपासून राज्याराज्यांतील विधानसभा निवडणुकांनी राजकारणाच्या पटलावर एका नव्या इतिहासाची नोंद केली आणि अनेकांच्या भविष्यावर प्रश्नचिन्हेही उमटविली. राजकारणातील अनेकांसमोर राजकीय अस्तित्वाची आव्हाने उभी केली, तर अनेकांच्या भविष्यातील राजकारणाच्या वाटचालीस विश्वासाची साथ देऊन आश्वस्त केले. विशेष म्हणजे, या घडामोडींचा नेमका अंदाज कोणालाच आला नाही, अनेकांनी वर्तविलेली भाकिते फोल ठरली आणि राजकारणातील धुरंधरांच्या अनुभवाला धक्केही बसले. देशातील लोकसभेच्या निवडणुका हे याचे नेमके उदाहरण ठरले. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकारच्या दोन पर्वांची पुण्याई गाठीशी घेऊन नव्याने लोकसभा निवडणुकीच्या आखाड्यात उतरलेल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीने या निवडणुकीकरिता चारशे जागांवर विजय मिळविण्याचे उत्तुंग लक्ष्य निर्धारित केले होते. जनतेने मोदी सरकारला मजबूत जनाधार बहाल केला, पण हे लक्ष्य गाठण्याची संधी मात्र हुकली. महाराष्ट्रातील हुकमी जनाधाराला काहीशी गळती लागल्याने, लागोपाठ होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीतील यशावरही शंकेचे सावट दाटले होते, पण सुज्ञ मतदारांनी विधानसभेत भाजपाच्या झेंड्याखालील महायुतीच्या हाती अविश्वसनीयरीत्या यशाची विक्रमी पताका बहाल केली. अनेकांना महायुतीचा हा विजय पचविता आला नाही, काहींना तो अनाकलनीय वाटला आणि अनेकांच्या राजकीय भविष्यावरच या निकालांनी प्रश्नचिन्हेही उमटविली. म्हणून, महाराष्ट्रातील मावळते वर्ष राजकीयदृष्ट्या ऐतिहासिक ठरले. महायुतीसाठी विक्रमी ठरले आणि महाराष्ट्राच्या सत्तेची स्वप्ने रंगवत भविष्यकाळ काबीज करण्याच्या वल्गना करणाऱ्या अनेकांना जोरदार धक्के देऊन नव्या गणितांची मांडणी करण्यास भाग पाडणारेही ठरले. आगामी वर्षाच्या राजकारणात त्याचे पडसाद उमटणार आहेत, यात शंका नाही. अनेकांना आपल्या अस्तित्वासाठी नवी राजकीय गणिते मांडावी लागतील. जुन्या, पठडीबाज राजकारणाच्या अनुभवांच्या आधारावर नव्या राजकारणाचे इमले उभारण्याचा काळ मागे पडल्याची कटू जाणीवही सरत्या वर्षाने अनेकांना करून दिली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणास सरत्या वर्षाने शिकविलेला हा सर्वांत मोठा धडा ठरला आहे. काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम ३७० निष्प्रभ ठरल्यानंतर प्रथमच झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला सत्तासंपादनाची अपेक्षा होती, पण तसे घडले नाही. झारखंडच्या विधानसभा निवडणुकीतही भाजपाला अपेक्षित असलेल्या सत्तेने हुलकावणी दिली, तर हरयाणाच्या विधानसभा निवडणुकीत भल्याभल्यांची भाकिते खोटी ठरवून तेथील जनतेने भाजपाच्या हाती सत्ता सुपूर्द केली. काळ हा राजकारणावर प्रभाव टाकणारा मोठा घटक असतो. राजकारणातील कोणत्याही घडामोडींच्या आलेखाचा पाया काळावरच बेतलेला असतो. म्हणूनच, प्रत्येक घटनेची तुलना काळासोबत केली जाते. काळाच्या ओघात कधी प्रभावशाली ठरलेल्या राजकारणाची किंमत पुढच्या काळात शून्यावर पोहोचलेली असते, तर एखाद्या राजकारणाचा भाव अनाकलनीयपणे कमालीचा वधारलेला असतो. महानगरी दिल्लीच्या राजकारणात सरत्या वर्षात असेच काहीसे घडून गेले. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना काळाने दिलेला दणका ही राजकारणाच्या इतिहासातील सरत्या वर्षातील सर्वांत मोठी घटना ठरली. अनैतिक राजकारणाचा ठपका बसलेल्या अरविंद केजरीवाल यांची तिहारमधील तुरुंगवारी, तेथून बाहेर पडल्यानंतर त्यांनी दिलेला मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा आणि नव्या जनाधारासाठी त्यांनी सुरू केलेले राजकारण यातून राजधानी दिल्लीच्या राजकारणासमोर अनेक नवे प्रश्न उभे राहिले. झारखंडमध्येही अशाच इतिहासाची काळाने कसोटी पाहिली. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना कथित भ्रष्टाचाराच्या आरोपावरून गजाआड होण्याची वेळ सरत्या वर्षातील काळाने आणली. याच काळात तेथे निवडणुका झाल्या आणि पुन्हा सत्ता संपादन करून सोरेन मुख्यमंत्रिपदावर विराजमान झाले. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत अमेठी मतदारसंघातून राहुल गांधी यांना पराभव पाहावा लागला होता. पुढच्या पाच वर्षांत काळाने राहुल गांधी यांची पुरेपूर कसोटी पाहिली आणि सरत्या वर्षात पुन्हा याच मतदारसंघातून राहुल गांधी लोकसभेत दाखल झाले. या विजयामुळे राहुल गांधी यांचे काँग्रेसवरील वर्चस्व पुन्हा प्रस्थापित होणार हा संकेतही याच सरत्या वर्षातील पक्षांतर्गत घडामोडींनी दिला. आता लोकसभेत त्यांच्यासोबत त्यांच्या भगिनीने, प्रियांका वढेरा यांनीही पदार्पण केले आहे. मजबूत विरोधी पक्षांची फळी सोबत असूनही आता राहुल गांधी यांच्या विरोधी पक्षनेतेपदाच्या कारकीर्दीवर मान्यतेची मोहोर उमटविण्याची जबाबदारी नव्या वर्षावर सोपवून सरत्या वर्षाने निरोप घेतला आहे. राजकारणासोबत, समाजकारणावर प्रभाव टाकणाऱ्या राजकीय घडामोडींचीही सरत्या वर्षाने नोंद करून ठेवली आहे. मोदी सरकारच्या कल्याणकारी योजना ही जगाच्या राजकीय पटलावरील कुतूहलाची बाब ठरली आहे. देशाची अर्थव्यवस्था, सामाजिक कल्याणाच्या योजना आणि पायाभूत सुविधांचा विकास अशा ऐतिहासिक प्रगतीची नोंद नव्या वर्षाच्या हाती देऊन सरत्या वर्षाने निरोप घेण्याची तयारी सुरू केली आहे. भारतीय दंडसंहितेच्या संकल्पनेचा ढांचा बदलून कायद्याला मानवतेचा स्पर्श देणारा न्याय संहिता अस्तित्वात आणणारा ऐतिहासिक क्षण सरत्या वर्षाने अनुभवला, सौरऊर्जेद्वारे घरादारांमध्ये प्रकाशाची नवी उधळण करणारी सूर्यघर योजना ही सरत्या वर्षाने भारताला दिलेली अनोखी देणगी ठरणार आहे. प्रत्येकाच्या माथ्यावर छप्पर देणाऱ्या महत्त्वाकांक्षी योजनेची पायाभरणीदेखील याच सरत्या वर्षात झाली आहे आणि संपूर्ण अपेक्षापूर्तीसाठी सामान्यांच्या नजरा नव्या वर्षावरच खिळल्या आहेत. मागे सरणाऱ्या प्रत्येक दिवसाने अशा अनोख्या आनंदाच्या असंख्य क्षणांची उधळण सामान्यांच्या मनावर केली आहे. या आनंदाचे लेणे सोबत घेऊन, तो द्विगुणित करण्याच्या बांधिलकीसह उद्या नव्या वर्षाचा पहिला दिवस उजाडेल. तसेच घडो, या शुभेच्छांसह सरत्या वर्षाला निरोप देऊया!

## आंतरराष्ट्रीय

# चीनच्या चतुरतेला भारताचे उत्तर

(पूर्वार्ध)

**वसंत गणेश काणे**

आशियातील जनतेचा पाश्चात्त्यांवर विश्वास नाही याबाबत आश्चर्य वाटायला नको. जवळजवळ पूर्ण आशियाला पाश्चात्त्यांनी गुलामासारखे वागवून येथील जनतेचे शोषण केले आहे, ही बाब विसरण्यासारखी नक्कीच नाही. याचा स्वाभाविक परिणाम असा झाला की, आता स्वतंत्र झाल्यानंतर पाश्चात्त्य देशांशी फटकून वागण्याची मानसिकता आशियन जनतेत निर्माण झाली, हेही समजण्यासारखेच आहे. आशियन देशांचाच एक गट तयार करावा आणि त्यांनीच आपापसात संबंध ठेवावेत, अशी मानसिकता निर्माण होण्याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. 'आशियन सगळे एक, इतर सगळे परके', हा भावही यामुळेच निर्माण झाला. या भावनेने भारावून गेलेल्या आशियनांच्या मानसिकतेला आणखी खतपाणी घालण्याचा चतुर डाव चलाख चीनने आखला. चीनची भूमिका अशी होती की, आशियात आपल्याला आव्हान देण्याचे सामर्थ्य कुणातही नाही. त्यात भारतही आला. चीनचा आशियातील बहुतेक देशांशी सीमावाद आहे. हा वाद आम्ही आपापसात सोडवू 'इतरांनी' त्यात पडू नये, अशी भूमिका चीनने घेतली. एकटा भारत सोडला तर इतर देशांचे सामर्थ्य आपल्या तुलनेत टिकणारे नाही, हे चीन जाणून आहे. चीनच्या तुलनेत भारताचे सामर्थ्यही फारशी चिंता करावी, असे नाही आणि नजीकच्या भविष्यात भारतही चीनची बरोबरी करू शकणार नाही, अशीच चीनची समजूत होती आणि आहे. भारताबद्दल बोलायचे तर एकेकाळी पंचशीलच्या गारुडाने भारतही भारावून गेला होता. त्यातून भारताला बाहेर यायला १९६२ साल उजाडावे लागले. एप्रिल १९५४ मध्ये, भारत आणि चीनने पंचशील करारावर स्वाक्षरी केली होती. यालाच शांततापूर्ण सहअस्तित्वाची पाच तत्त्वे म्हणूनही ओळखले जाते. परस्परांच्या सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेचा सन्मान करणे, परस्परांवर आक्रमण न करणे, एकमेकांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे, समानतेवर आधारित व्यवहार करणे, परस्पर लाभ होईल असा व्यवहार करणे, आणि शांततापूर्ण सहअस्तित्वाचा पुरस्कार करणे अशा आशयाची या पंचशील कराराची तत्त्वे आहेत. मुळात बौद्ध धर्मानुसार सदाचाराची पाच तत्त्वे सांगितली आहेत. प्रत्येक धार्मिक व्यक्तीने त्यांचे पालन करावे, अशी बौद्ध धर्माची शिकवण आहे. (१) अस्तेय म्हणजे चोरी न करणे; (२) अहिंसा म्हणजे हिंसा न करणे, (३) ब्रह्मचर्य म्हणजे व्यभिचार न करणे, (४) सत्य म्हणजे खोटे न बोलणे आणि (५) मादक द्रव्यांचे सेवन न करणे अशा आशयाची ही पाच तत्त्वे आहेत. भारत आणि चीन यांनी करार करताना पंचशील हेच प्राचीन शीर्षक वापरून करार केला होता. हा करार करून भारताला बेसावध ठेवून चीनने सीमेवर कुरापती करायला सुरुवात केली आणि १९६२ मध्ये तर सरळसरळ आक्रमणच केले. भारत आपल्या तुलनेत कसा कमकुवत आहे, याची भारताबरोबरच जगालाही जाणीव करून देण्यासाठी केलेला हा चीनचा प्रयत्न होता. चीन फक्त भारताशीच असा वागतो, असे नाही. इतर बहुतेक देशांशीही चीनची वागणूक अशीच आहे.

### चीनने उकरून काढलेले सीमावाद

**भारत-चीन सीमावाद** : अक्साईचीनमधला चीनने ३८,००० चौ. किमी. भूभाग बळकावला आहे तर अरुणाचलमधील ९०,००० चौ. किमी. भागावर दावा सांगितला आहे. या शिवाय उत्तराखंडची ५४५ किलोमीटर लांबीची सीमा चीनला (तिबेट) लागून आहे. या भागात निरनिराळ्या ठिकाणी मिळून एकूण २४५० चौ.किमी. भूभाग चीनला हवा आहे.

**नेपाळ-चीन सीमावाद** : आज नेपाळ चीनच्या ताटाखालचे मांजर असल्यासारखे दिसत असले तरी चीनने नेपाळची घुसखोरी करून हडपलेली एकूण ६४ हेक्टर जागा ढोलाखा, हुमला, सिंधूपालचौक, संखुवासभा, गोरखा आणि रासुवा जिल्ह्यात विखुरलेली आहे. नेपाळ-चीन सीमा १४१५ किमी. लांब आहे. या सीमेवर ठिकठिकाणी पिलर्स लावलेले होते. यापैकी ९८ पिलर्स उखडून फेकण्यात आले आहेत तर इतर काही नेपाळच्या सीमेत आत सरकवण्यात आले आहेत. नेपाळी काँग्रेसने याबाबत नेपाळच्या संसदेत ठराव मांडून चीनने नेपाळची हडपलेली भूमी परत मिळविण्यास ओली सरकारला सांगितले. पण व्यर्थ. मे २०२० मध्ये चीनच्या ग्लोबल टेलिव्हिजन नेटवर्कने, माऊंट एव्हरेस्ट चीनच्या हद्दीत आहे, नेपाळच्या नव्हे, असे घोषित केले. नेपाळमध्ये संतापाची लाट उसळताच मात्र हे ट्विट डिलिट करण्यात आले. चीन आणि नेपाळमध्ये १७८८ ते १७९२ मध्ये युद्ध झाले होते. त्याचा हवाला देत ६४ हेक्टर जागेवर चीन आपला अधिकार सांगतो आहे.

**चीन-भूतान सीमावाद** : जुलै २०१७ मध्ये भूतानी अधिकाऱ्यांनी चिनी अधिकाऱ्यांना बजावले की, दोन देशांदरम्यान झालेल्या सहमतीला अनुसरून वागावे. डोकलाम प्रकरणानंतरही चीन भूतानच्या सीमेच्या आत निरनिराळ्या ठिकाणी घुसखोरी करीत असतो. भूतानी गुराख्यांना भूतानी प्रदेशातूनच चिनी गस्ती तुकड्यांनी अनेकदा हुसकून लावले आहे. चीनने भूतानच्या साकतेंग अभयारण्यावर दावा करून भारतालाही शह देण्याचा प्रयत्न केला आहे. दक्षिण चीन उपसागर आणि प्रशांत महासागरात चीनने जवळपास सर्व देशांशी सीमावाद उकरून वातावरण तापवले आहे. चीनचे तैवान, ब्रुनाई, इंडोनेशिया, मलायाशिया, फिलिपिन्स, व्हिएतनाम आणि जपानबरोबर सागरविषयक प्रश्नी वाद आणि संघर्ष आहेत. चीन समुद्रातील साधनसंपतीबाबत जुने पुराणे ऐतिहासिक दाखले दाखवत अधिकार गाजवण्याच्या प्रयत्नात असतो. दक्षिण चिनी समुद्र व त्यातील लहानमोठी बेटे, समुद्रात जेमतेम बुडालेली बेटे, किनारे यावर चीन आपला अधिकार गाजवत असतो.

**व्हिएतनाम** : १९७४ मध्ये चीनने पॅरॅसेल बेटे व्हिएतनामकडून हिसकावून घेतली. वूड आयलंड्सवर चीनने सैनिकी ठाणी उभारली, विमानतळ बांधले आणि कृत्रिम बेटे उभारली आहेत. या बेटांवर तसेच तैवान आणि व्हिएतनामधील प्रदेशांवरही चीन आपला अधिकार सांगत असतो.

**जपान** : पूर्व चिनी समुद्रात सेनकाकू नावाची निर्जन बेटे आहेत. चीनने याच बेटांना दिओयू बेटे अशी नावे दिली आहेत. १८९० पासून या बेटांवर जपानचे नियंत्रण आहे. १९७० मध्ये या बेटांवर खनिज तेलांचे मोठे साठे आहेत, हे कळताच चीनने या बेटांवर अधिकार सांगितला. अमेरिका आणि जपानने हा अधिकार नाकारताच चीनने प्रचंड प्रचार मोहीम राबवून त्यांना विवादित स्वरूप दिले.

**तैवान** : चीन तैवानवर आपला अधिकार सांगतो आहे. मॅक्लेसफील्ड बँक, पॅरॅसेल बेटे, स्कारबरो शोल, स्पार्टली बेटे यावरही चीन आपला अधिकार सांगतो आहे. या बेटांवर चीन, तैवान, व्हिएतनाम आणि म्यानमार हे देश आपलाही अधिकार आहेत, असे सांगत आहेत.

**फिलिपिन्स** : दक्षिण चिनी उपसागरावर फिलिपिन्स आणि चीन दोघेही आपला अधिकार सांगतात. फिलिपिन्सने हा प्रश्न आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे नेला होता. या न्यायालयाने फिलिपिन्सच्या बाजूने निकाल दिला. पण हा निकाल चीनने मानला नाही.

स्कार्बरो शोल हे बेट समुद्रात जेमतेम बाहेर आलेले बेट आहे. या बेटाबाबत १९९७ साली वाद सुरू झाला होता. तो शिगेला पोचला एप्रिल २०१२ मध्ये. शेवटी चीनने इथेही आपले बस्तान बसवलेच. शेवटी फिलिपिन्सने पीसीए (परमनंट कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन) कडे दाद मागून निर्णय आपल्या बाजूने मिळवला पण चीनने याला वाटाण्याच्या अक्षता लावल्या. चीनची ही चतुराई हाणून पाडण्यासाठी भारतानेही उपाय योजले आहेत. ते आपण पुढच्या भागात पाहू.

९४२२८०४४३०

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# महापुरुषांच्या नावांचा राजकारणासाठी 'गैरवापर'

लोकसभा निवडणुकीत सलग तीनवेळा दारुण पराभव झाल्याने काँग्रेसचे अस्तित्व डावावर लागले आहे. त्यामुळे या पक्षाने आता महापुरुषांच्या नावांनी राजकारण सुरू केले आहे. भावनिक मुद्दे उपस्थित करून सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न सध्या या पक्षाकडून सुरू आहे. परंतु, आधुनिक भारत भविष्याचा विचार करण्यास सक्षम असल्याने काँग्रेसची डाळ शिजण्याची शक्यता नाहीच. पराभवाचे शल्य पचवता न आल्याने आधी संविधान आणि नंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने काँग्रेसने रान उठविले आहे. भाजपा संविधान मानतच नाही, असेही या पक्षाने सांगून पाहिले. परंतु, खऱ्या-खोट्यांतील भेद जाणणाऱ्या जनतेने विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला आपली जागा दाखवून दिली.

संविधान आणि डॉ. आंबेडकरांबद्दल काँग्रेसला एवढाच आदर होता, तर निवडणुकीत त्यांना दोनदा हरविण्याचे पातक का केले? पंडित नेहरूंनी त्यांच्याविरोधात प्रचार का केला? अशा अनेक प्रश्नांची जनतेला उत्तरे हवी आहेत. काँग्रेसचे आंबेडकरप्रेम बेगडी आहे. डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर तब्बल ३३ वर्षांनी भाजपा समर्थित व्ही. पी. सिंग सरकारने त्यांना भारतरत्न हा सर्वोच्च सन्मान बहाल केला. हा सन्मान त्यांना देण्याची गरज काँग्रेसला एकदाही वाटली नाही! पूर्वी देशातील मानाचे पुरस्कार केवळ चेलेचपाट्यांना आणि मर्जीतील लोकांनाच दिले जायचे. देशात मोदी पर्व सुरू होताच तळागाळातील आदिवासी आणि खऱ्याखुऱ्या गोरगरीब समाजसेवकांना पुरस्कृत करण्याचा पायंडा पडला. काँग्रेसने आजपर्यंत गोरगरिबांच्या भावनांचा वापर केवळ राजकारणासाठी केला आहे. भाजपा सरकारने मात्र या उपेक्षित समाजसेवकांचा प्रत्यक्ष गौरव करून दाखविला.

तत्कालीन कायदे मंत्री डॉ. आंबेडकरांनी जम्मू-काश्मीरसाठी ३७० कलमाचा मसुदा तयार करण्यास स्पष्ट नकार दिला होता. तरीही पंतप्रधान पंडित नेहरूंनी हे कलम देशावर लादले, हा डॉ. आंबेडकरांचा सन्मान होता का? एवढे पातक करूनही केवळ मतांच्या लाचारीसाठी आज काँग्रेस भाजपाला आंबेडकरविरोधी ठरवू पाहात आहे! भारतरत्न स्व. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना लोकसभेत काँग्रेसने वारंवार महात्मा गांधींच्या हत्येचा मुद्दा उपस्थित करून वातावरण नासवण्याचा प्रयत्न केला. अटलजींसारख्या संवेदनशील नेत्याला भावनिक मुद्दे उपस्थित करून मानसिक त्रास देण्यात आला. महात्मा गांधींना मारेकऱ्याने फक्त एकदाच मारले परंतु त्यांच्या विचारांची हत्या करून याच लोकांनी महात्मा गांधींची वारंवार हत्या केली! अवघ्या एका मताने सरकार पाडून सभागृहात अटलजींवर हसणाऱ्या काँगेसची आज पुरती दुर्दशा झाली आहे. वास्तविक महात्मा गांधींची काँग्रेस आणि आजच्या काँग्रेस पक्षाचा काहीच संबंध नाही; तरीही केवळ जनतेत सहानुभूती निर्माण करण्यासाठी सोनिया गांधी यांनी पुन्हा महात्मा गांधी आणि भाजपाचा संबंध जोडण्याचा प्रयत्न केला आहे. कर्नाटकात आयोजित बैठकीत सहभागी होऊ न शकणाऱ्या सोनिया गांधींनी आपल्या पक्षाला पत्र लिहून भाजपा सरकारच्या काळात महात्मा गांधींचा वारसा धोक्यात आल्याचा आरोप केला आहे. महात्मा गांधींनी या लोकांकडे आपला वैचारिक वारसा सोपविला होता का, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतो. महात्मा गांधी काँग्रेसला आपली मालमत्ता वाटत आहे का? महात्मा गांधी संपूर्ण देशासाठी वंदनीय आहेत, यात दुमत असू शकत नाही. देशावर ६ दशके राज्य करतानाही महात्मा गांधींच्या स्वप्नातील भारत घडवता आला नाही! आता भाजपा महात्मा गांधींचे स्वप्न साकार करीत आहे, तर ही बाबही सहन होत नाही! महात्मा गांधींनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेसच्या विसर्जनाचा प्रस्ताव ठेवला होता. तरीही केवळ सत्तेच्या लालसेपोटी त्यांच्या विचारांना मूठमाती दिली! आता पक्षाचे अस्तित्वच धोक्यात आल्याने पुन्हा महात्मा गांधींच्या नावाने वातावरण नासवण्याचा डाव रचला जात आहे. ज्या मुस्लिमांच्या गठ्ठा मतांची वारंवार बेगमी केली त्यांना तरी ६० वर्षांच्या सत्ताकाळात तुम्ही न्याय देऊ शकलात का? मुस्लिमांच्या विकासासाठी कोणत्याच ठोस योजना राबविल्या नाही. केवळ कोरडी सहानुभूती दाखवून मुस्लिमांना वर्षानुवर्षे झुलवत ठेवले. या समाजाला काँग्रेसने केवळ पानटपऱ्या आणि भंगाराची दुकाने तेवढी दिलीत! आता भाजपा सरकारच्या लोकोपयोगी योजनांचा लाभ हिंदूंसह मुस्लिमांनाही मिळत आहे. राजकारण करण्यासाठी ठोस मुद्दाच नसल्याने हे लोक महापुरुषांची नावे पुढे करून आपले दुकान वाचविण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहे.

९८८१७१६०२७

## इतस्ततः

# अदानी प्रकरणातील आरोप : अर्थ आणि अनर्थ

**दत्तात्रेय आंबुलकर**

२०२४ या मावळत्या वर्षाकडे मागे वळून पाहताना, भारतीय अर्थ आणि उद्योगविश्वासाठीही हे वर्ष काहीसे खळबळजनक ठरले. त्यातच अदानी उद्योगसमूहावरील विविध आरोपांचे अल्पकालीन परिणामही शेअर बाजारावर दिसून आले. त्यानिमित्ताने या सरत्या वर्षात अदानी समूहावरील आरोप आणि त्यामागचा अर्थ-अनर्थ या लेखातून उलगडला आहे. गेल्या महिन्यात अमेरिकेच्या वित्तीय क्षेत्रातील काही उच्चपदस्थांनी अदानी उद्योगसमूहावर ऊर्जा प्रकल्पांच्या कामासाठी फार मोठ्या प्रमाणावर लाच दिल्याचा आरोप केला व या आरोपांचे पडसाद आर्थिक-औद्योगिक क्षेत्रात व 'दलाल स्ट्रीट'पासून ते 'पार्लमेंट स्ट्रीट'वरच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय संबंध स्तरावर उमटणे अपरिहार्य होते व झालेही तसेच. यासंदर्भात प्रकर्षाने पुढे आलेला मुद्दा म्हणजे, याप्रकरणी केवळ अदानी समूहच नव्हे, तर एका अर्थाने भारताचीच प्रतिष्ठा पणाला लागली. यातून भारताच्या सद्यःस्थितीतील जागतिक स्तरावरील प्रगतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याच्या जोडीलाच भारतीय कॉर्पोरेट कंपन्यांच्या व्यवहारांच्या संदर्भात पण वेगळ्या अर्थाने चर्चा होऊ लागली. या चर्चेचे काही परिणाम तातडीने दृश्य स्वरूपात दिसू लागले. या प्रकरणाचे तातडीने व जागतिक स्तरावर आणि मोठ्या प्रमाणात दिसून आलेले परिणाम म्हणजे, फ्रान्समधील विख्यात तेल उत्पादक कंपनी असणाऱ्या 'टोटल एनर्जी' या प्रख्यात कंपनीने अदानी उद्योग समूहावरील आर्थिक लाचखोरीची चर्चा सुरू होताच, जागतिक स्तरावर अदानी उद्योग समूहामध्ये त्यांच्यातर्फे करण्यात आलेली गुंतवणूक तातडीने रद्दबातल केली. यालाच जोडून केनियाचे राष्ट्राध्यक्ष विलियम रुटो यांनी अदानी उद्योगाला आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पुनर्निर्माणासह पुढील ३० वर्षांसाठी असणारे देखभालीचे प्रदीर्घ कंत्राट तडकाफडकी रद्दबातल केले. याशिवाय 'केनियन एनर्जी' कंपनीने 'अदानी एनर्जी'सह केलेला करार रद्द करण्यात आला.

त्याचदरम्यानच्या व्यावसायिकदृष्ट्या व अदानी उद्योगाच्या संदर्भात व विशेषतः मोठ्या आणि महत्त्वाच्या घडामोडी म्हणून अमेरिकेच्या 'यूएस इंटरनॅशनल डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन'ने अदानींच्या सहकार्यातून श्रीलंकेत बांधल्या जाणाऱ्या बंदर बांधणी प्रकल्पाच्या कामावर नव्याने व्यावसायिक प्रस्तावासह चर्चा सुरू केली. दुसरीकडे त्याचवेळी बांगलादेशमधील




काळजीवाहू सरकार म्हणून काम करणाऱ्या मोहम्मद युनूस यांच्या काळजीवाहू सरकारचे अदानी उद्योगासह करण्यात आलेल्या ऊर्जापुरवठा करारावर फेरविचार करण्यास सुरूवात केली. यानिमित्ताने आंतरराष्ट्रीय स्तरावर अदानी उद्योगातील ऊर्जा, बंदर विकास, विमानतळ बांधणी इ. संदर्भात ज्या देश वा त्या देशातील कंपन्यांनी जे मोठ्या प्रमाणावरील व्यवसायविषयक करार केले होते, त्यापैकी प्रामुख्याने टांझानिया, इस्रायल, ग्रीक, इंडोनेशिया, नेपाळ, व्हिएतनाम, ऑस्ट्रेलिया यासारख्या देशातील महत्त्वाच्या व मोठ्या प्रकल्पांचे प्रस्ताव वा प्रत्यक्ष काम यावर व्यावसायिकदृष्ट्या नकारात्मक परिणाम दिसून आले. यातील महत्त्वपूर्ण प्रकल्पांमध्ये चार आंतरराष्ट्रीय विमानतळ, सहा बंदर-पोर्ट निर्माण व खाणकाम व धातूकाम क्षेत्रातील तीन मोठ्या प्रकल्पांचा समावेश असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. गेल्या काही वर्षांचा कानोसा घेता असे लक्षात येते की, अदानी उद्योग समूहाचे भारतातील खाजगी क्षेत्रातील एक प्रगत कंपनी म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर व भारत सरकारच्या धोरणानुरूप दक्षिण आशिया, आफ्रिका व अन्य देशांत वेगाने औद्योगिक प्रगती करीत आहे. असे करताना भारत सरकारच्या पूर्वेकडील देशांवर भर देण्याच्या धोरणाचे विशेषत्वाने पालन करण्यात येत आहे. याच अनुषंगाने आज भारतातील बांधकाम व मूलभूत सुविधा विकास क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्या मध्य-पूर्वेतील देशांपासून, दक्षिण-पूर्व आशिया क्षेत्रात आपला व देशाचा नावलौकिक वाढवत आहेत.

या पृष्ठभूमीवर ठरावीक कालावधीनंतर आर्थिक-राजकीय संदर्भात विशेष घटनाक्रम लक्षात घेऊन ठरवून केल्याप्रमाणे अदानी उद्योगांवरील आंतरराष्ट्रीय स्तरावरील आरोपांचे बहुविध परिणाम व पडसाद उमटत असतात. सद्यःस्थितीत अशा आरोपांचे अदानींच्या संदर्भात व्यावसायिकच नव्हे, तर राजकीय संदर्भात राष्ट्रीय स्तरावर, तर व्यावसायिक संदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावर परिणाम स्पष्टपणे दिसून येतात. यामध्ये प्रामुख्याने संसदेतील अशा निदर्शनांपासून ग्रीस, ऑस्ट्रेलिया, टांझानिया इ. देशांनी व्यावसायिक पद्धतीने व आंतरराष्ट्रीय स्तरावर न्यायालयीन प्रक्रिया सुरू करण्यापर्यंतचा समावेश करता येईल. याचे परिणाम भारतीय व्यापार-व्यवसाय क्षेत्रावर अपरिहार्यपणे होत जातात.

अदानी उद्योगसमूहावर करण्यात आलेल्या आरोपांमध्ये जागतिक स्तरावरील सर्वांत मोठ्या व्यवहारांपैकी एक अशा सौरऊर्जा व्यवहारांच्या संदर्भात अदानी उद्योग समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांच्यावर अमेरिकन उद्योग-व्यवसाय क्षेत्रातर्फे वैयक्तिक स्तरावर जे आरोप करण्यात आले, त्याला भारतीय संसदेच्या हिवाळी अधिवेशनाची सुरुवात होण्याची राजकीय पृष्ठभूमी लाभल्याचा योग पुन्हा जुळून आला. व्यावसायिक तपशिलासह थोडक्यात सांगायचे म्हणजे, सौरऊर्जा क्षेत्रातील मोठ्या म्हणजेच १२ गिगावॅट तंत्रज्ञान पद्धतीवर आधारित ऊर्जानिर्मितीसाठी अदानी ऊर्जा उद्योग व 'अॅझ्युअर पॉवर' या ऊर्जा क्षेत्रातील आघाडीच्या कंपन्यांतर्फे आवश्यक त्या उपकरणांची उत्पादन निर्मिती व त्यांच्याच उपयोगांद्वारे ऊर्जानिर्मितीचे जागतिक स्तरावरील महत्त्वाच्या व मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध झाली होती. अशा या महत्त्वाच्या प्रकल्पाचे व्यवहार, कागदपत्रे व निर्णयपद्धती या साऱ्यांवर आरोपांसह आक्षेप घेण्यात आले व त्याचा परिणाम भारतीय ऊर्जाक्षेत्राशी प्रामुख्याने संबंधित असणाऱ्या 'सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया', 'नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन' व इतर काही कंपन्यांवर झाले आहेत. आपल्या व्यावसायिक व्यवहाराच्या संदर्भात अदानी ऊर्जा कंपनीने प्रामुख्याने नमूद केलेली बाब म्हणजे, ऊर्जा क्षेत्रात उपकरणांचे उत्पादन व प्रकल्प व्यवस्थापन व त्याच्या क्रियान्वयनाद्वारे प्रत्यक्ष वीजवितरण अशी सेवा जागतिक स्तरावर देणाऱ्या मोजक्याच कंपन्या असून, त्यामध्ये अदानी-अॅझ्युअर एनर्जीचा संयुक्त प्रकल्प प्रस्ताव अव्वल व म्हणूनच स्वीकार्ह ठरणार होता. या एकमेव व महत्त्वाच्या मुद्यावरूनच गौतम अदानींनी त्यांच्यासह त्यांच्या कंपनीवर करण्यात आलेले आरोप खोडून काढले आहेत.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### सीताबर्डीत नागरिकांना कधी मिळेल मोकळा मार्ग?

३० डिसेंबरच्या तरुण भारतात उपरोक्त बातमी वाचली. व्हेरायटी चौक ते लोखंडी पूलपर्यंत मार्ग रुंद केल्यानंतरही वाहनचालकांना व पायी जाणाऱ्यांना बराच त्रास सहन करावा लागतो. येथील अतिक्रमण हटवण्यासाठी अनेकदा प्रयत्न झाले; मात्र अद्याप कोणालाही यश आले नाही. येथील अतिक्रमणधारकांची प्रचंड दादागिरी वाढली आहे. कधी हटेल अतिक्रमण आणि कधी हा मार्ग मोकळा होईल, याकडे नागपूरकरांचे लक्ष लागले आहे. हे अतिक्रमण हटविण्यासाठी खालील उपाययोजना करावी असे वाटते.

सर्वप्रथम या मार्गावरून कोणत्याही वाहनाला परवानगी नसावी. या मार्गावरून पायी चालणे प्रत्येकाला सहज शक्य आहे. रस्त्यावर दुकान लावून उदरनिर्वाह करण्याची संख्या अधिक असल्यामुळे दुकानांसाठी जमिनीवरील जागा कमी पडत आहे, असे दिसते. त्यामुळे या दुकानदारांसाठी मल्टीस्टोरीड दुकाने बांधून ती त्यांना भाडेतत्त्वावर देण्यात यावी. मनपाला हे सहज शक्य आहे. असे केल्याने याच मार्गावर दुकानदारांना दुकाने मिळतील, म्हणजे त्यांचा व्यवसाय सुरू राहील तसेच रस्त्यावरील गर्दी कमी होऊन मनपाला दुकानदारांकडून उत्पन्नही मिळेल. ही दुकाने अपना बाजार भागात बांधण्यात यावी म्हणजे किरकोळ दुकानदारांचा बाजार एकत्रितपणे या मार्गाच्या मध्ये येईल आणि अतिक्रमणाचा प्रश्न सुटेल.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

### जॉर्ज सोरोस आणि काँग्रेस

गेल्या काही दिवसांपासून माध्यमांमध्ये एक नाव प्रामुख्याने वारंवार येत आहे, ते म्हणजे जॉर्ज सोरोस. हा एक अमेरिकन उद्योगपती आहे. आतापर्यंत जे काही वाचण्यात आले, त्यावरून या माणसाचे उद्योग म्हणजे जगभरात अराजकता निर्माण करणे, लोकशाही पद्धतीने सत्तेवर आलेली सरकारे उलथवून तिथे स्वतःच्या पसंतीचे बुजगावणे बसविणे व त्यांच्याकडून स्वतःला लाभकारक निर्णय करवून घेणे, हे आहेत. त्यातल्या त्यात संबंधित देशांतील फुटीरवादी मंडळी हाताशी धरून आणि त्यांना पैशांची भरघोस मदत करून देशविरोधी कारवाया घडवून आणायच्या आणि अराजक निर्माण करायचे.

ही पृष्ठभूमी पाहता, सद्सदविवेक जागृत असणाऱ्या कोणत्याही नागरिकाने अशा व्यक्तीशी कसलाही संबंध ठेवला नसता. पण, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी या त्याच्याशी घनिष्ठ संबंध ठेवतात. त्याच्या संस्थेत जबाबदारीची पदे स्वीकारतात. एवढेच नव्हे तर, त्याच्या कार्यक्रमांनुसार स्वतःच्या पक्षाची धोरणे आखतात आणि भूमिका घेतात. थोडक्यात, स्वतःची अक्कल गहाण ठेवून संपूर्ण देशाला वेठीला धरण्याचे उद्योग करतात. अशा वृत्तीला काय म्हणावे? ठीक आहे, त्या तर बोलून-चालून विदेशी मुळाच्याच आहेत. पण इतर ज्येष्ठ काँग्रेसी नेत्यांचे काय? त्यांना तर देशाचे बरे-वाईट कळते ना? काँग्रेसने देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले, अशी शेखी मिरवणारे हे सर्व नेते राजमातेच्या चरणी माथा टेकवून स्वतःची अस्मिता गहाण ठेवल्यासारखे वागतात, तेव्हा मात्र कीव नव्हे, चीड येते. बरं, यांचा ५५ वर्षीय 'युवा नेता'! त्याच्याबद्दल काय म्हणावे? हा कायम बालपणातच जगतो. कुठे काय बोलावे किंवा बोलू नये, हेही त्याला कळत नाही. एखादा लहान मुलगादेखील आपल्या घरातल्या गोष्टी बाहेर सांगत नाही. पण, हा माणूस मात्र जगभर स्वतःच्या देशाविरुद्ध बोलत असतो. म्हणजे जॉर्ज सोरोसच्या हातचे बाहुलेच आहे.

**चारुदत्त शेंडे**/९४२२३१५३१८

### त्यागाचा आदर व्हावा तरच जीवन सफल होते

ओंजळभर सुखासाठी विश्वाइतका पदर पसरणारी आई आणि त्या पदराला सामर्थ्याचा हात देणारा पुरुष अर्थात् वडील यांच्या त्यागाचा आदर करायला नवीन पिढी मागे का पडते आहे? आई-वडिलांच्या कष्टांना आणि प्रेमाला कमी समजणारे स्वतःचे अस्तित्वच विसरायला लागले आहेत. तुम्ही आमच्यासाठी काय केले? हा हृदयस्पर्शी प्रश्न काळीज कापून टाकतो. मैत्रिणींना हजारो रुपयांची पार्टी आणि दारू देण्यापेक्षा आई-वडिलांनी आपल्याला शिक्षण देऊन नोकरीयोग्य बनविले, त्याचे उपकार मानण्याचे प्रयत्न करावे. खोटा आव आणून जगाला श्रीमंती दाखवून, आई-वडिलांच्या नावे कर्ज घेऊन त्यांना वृद्धाश्रमात ठेवून मारू नका. आईचे जीवन दूध, दही, ताक, लोणी, तूप या पंचतत्त्वाने बनलेले असते. जेवलास का? झोपलास? काही दुखते का? हे प्रश्न विचारणाऱ्या मायेच्या, काळजीच्या आणि कोमल स्वरांना लुप्त करून जीवन आनंदी होत नाही. आई शब्दात जीव असतो, बाबा शब्दात जाणीव असते, ताई शब्दात मान असतो, दादा शब्दात वचक असतो, मित्र शब्दात शान असते, अंत शब्दात खंत असते, भिंत शब्दात जिवंतपणा असतो, गुरू शब्दात अर्थ असतो, अ ते ज्ञ बाराखडीत इंग्रजीपेक्षा ज्ञानाचे भांडार असते; म्हणूनच त्यागाचा आदर करून जीवन सफल बनविण्याचा नवीन पिढीने प्रयत्न करायला हवा.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### अंगणात गळफास घेऊन वृध्दाची आत्महत्या

**सोलापूर, दि. ३० डिसेंबर -**

घराच्या अंगणात लाकडी वाशाला गळफास घेऊन वृध्दाने आत्म हत्या केली. हा प्रकार सोमवारी दुपारी उघडकीस आला. रेवणसिध्द भिमण्णा म्हेत्रे (वय ६०, रा. जगजीवनराम झोपडपट्टी, मोदी) असे आत्महत्या केलेल्या व्यकतीचे नाव आहे. यातील मयत हे जगजीवनराम झोपडपट्टीत राहत होते. सोमवारी दुपारी ३.३० च्या सुमारास अज्ञात कारणातून त्यांनी घराच्या अंगणातील लाकडी वाशाला दोरीने गळफास घेतला. ही बाब लक्षात येताच नातेवाईकांनी खाली उतरवून दुपारी बेशुध्दावस्थेत नातेवाईकांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूवीच ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### लग्नाचे आमिष दाखवून तरूणीवर अत्याचार करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३० डिसेंबर -**

एकाच ठिकाणी काम करताना लग्नाचे आमिष दाखवून तरूणीवर अत्याचार करणाऱ्या तरूणाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत तरूणीच्या फिर्यादीवरुन रामकृष्ण नागनाथ गरड (वय २५, रा. लक्ष्मी अपार्टमेंट, नवनीत हॉस्पीटलच्या बाजूला, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीता आणि रामकृष्ण गरड हे दोघे एकाच ठिकाणी काम करतात. १५ फेब्रुवारी ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत यातील पिडीत तरूणीला रामकृष्ण गरड याने लग्नाचे आमिष दाखवून वारंवार तिच्याशी शारीरीक अत्याचार केला. पिडीतेने रामकृष्ण यास लग्नाबाबत विचारणा केल्यानंतर त्याने पिडीतेला मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ केली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस आयुक्त पोमण पुढील तपास करीत आहेत.

### जबरदस्तीने तरूणीवर अत्याचार करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३० डिसेंबर -**

स्नॅपचॅटवरून ओळख झालेल्या तरूणीवर जबरदस्तीने अत्याचार करणाऱ्या तरूणाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत तरूणीच्या फिर्यादीवरुन आयुश राजेंद्र ढंगळे (वय २१, रा. जंगली गल्ली, वैराग, ता. बार्शी) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीता आणि आयुश ढंगळे यांची स्नॅपचॅट या ॲपवरून ओळख झाली असून २४ डिसेंबर २०२४ रोजी पिडीता ही आयुश यास भेटण्यासाठी वैराग येथे गेली होती. त्या दोघांची तेथील कॉलेजजवळ भेट झाल्यानंतर आयुश याने पिडीतेला त्याच्या मोटारसायकलवरून सोलापुरला आणले. बाळे येथील एका लॉजवर नेऊन आयुश याने लग्नाचे आमिष दाखवून पिडीतेवर जबरदस्तीने अत्याचार केले. त्यानंतर पिडीतेने आयुश यास लग्नाबाबत विचारले असता फोनवर पिडीतेशी वाद करून मी तुझ्याशी लग्न करणार नाही, तुला काय करायचे ते कर, तुला कोणाला सांगायचे ते सांग असे म्हणून शिवीगाळ केली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक मोरे-पाटील पुढील तपास करीत आहेत.

### नितेश राणेंना मंत्रीपदावर राहण्याचा अधिकार आहे का? : प्रदेश काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे

**मुंबई, दि. ३० डिसेंबर -**

देशाची एकता व अखंडता राखण्याची शपथ घेऊन मंत्री झालेले नितेश राणे केरळला भारताचा पाकिस्तान म्हणतात आणि भाजपला मतदान न करता काँग्रेस व इतर विरोधी पक्षांना मतदान करणाऱ्यांना दहशतवादी म्हणतात, अशा व्यक्तीला मंत्रिमंडळात राहण्याचा अधिकार आहे का? हे राष्ट्र प्रथम म्हणणाऱ्या भारतीय जनता पक्षाचे स्पष्ट करावे, असे आव्हान प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी दिले आहे. फडणवीस यांच्या मंत्रिमंडळातील राणे यांनी नुकतेच केरळबाबत वादग्रस्त वक्तव्य केले आहे त्याबाबत लोंढे म्हणाले की, अशा व्यक्तीकडून काय अपेक्षा करणार? पण आमचा प्रश्न देशाचे पंतप्रधान मोदी व मुख्यमंत्री फडणवीस यांना आहे की, आजच प्रसिद्ध झालेल्या व्यक्तीगत खर्चाच्या आकडेवारीमध्ये महाराष्ट्राला बिहार व उत्तर प्रदेशच्या बरोबर नेऊन ठेवले आहे. कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश व तेलंगणा ही गैरभाजपा शासित राज्ये यात दुपटीने आघाडीवर आहेत. शहर व ग्रामीण भागातील लोक जास्त कमावतात व जास्त खर्च करण्याची क्षमता ठेवतात हे सरकारचे आकडे आहेत.

## निधन वृत्त...

### सावळाराम शिंदे



**सोलापूर,दि. ३० डिसेंबर-**

जोडभावी पेठ (खणी) येथील सामाजिक कार्यकर्ते सावळाराम तुकाराम शिंदे (वय ७६) यांचे रविवारी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर रविवारी सायंकाळी अक्कलकोट रोड येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. ते राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे आधारवड, संत रविदास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री यमाईदेवी आश्रम शाळेचे खजिनदार होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. उद्योजक दीपक शिंदे यांचे वडील तर ज्येष्ठ पत्रकार शंकर जाधव यांचे ते भावजी होत.

### अमीनाबी काझी



**सोलापूर, दि. ३० डिसेंबर -**

अमीनाबी चांदसाब काझी (वय ९८) यांचे रविवार, दि. २९ डिसेंबर रोजी वृध्दापकाळाने निधन झाल आहे. सोमवारी मोदी मुस्लिम कब्रस्थान येथे त्यांना दफन करण्यात आले. त्यांच्या पश्चात पाच मुले आणि मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. जुनी मील ईदगाह मस्जिदचे मुख्य ट्रस्टी युसूफ काझी व ॲड. एम.सी. काझी यांच्या त्या मातोश्री होत.

### नंदिनी देशमुख-बेडगेकर



**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

जुळे सोलापूर येथील जि.प.चे निवृत्त अधिकारी बाळासाहेब देशमुख-बेडगेकर यांच्या पत्नी नंदिनी यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्याच्या पश्चात पती दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.मोदी स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# थर्टीफर्स्टसाठी पोलिसांचा शहरात कडक बंदोबस्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर -**



नववर्षाचे स्वागत करीत असताना थर्टीफर्स्टच्या रात्री शहरात कुठल्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये, यासाठी सोलापूर शहर पोलिस सज्ज झाले आहेत. सर्वत्र चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. शहरातील हॉटेल, बार, ऑर्केस्ट्रा बार, रेस्टॉरंट, परमिट रुम त्याचप्रमाणे फार्म हाऊस, बंगले आदी ठिकाणी होणाऱ्या नववर्ष स्वागताच्या पार्ट्यांवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे.

शहरात मोठ्या प्रमाणात बंदोबस्त ठेवण्यात आला असून त्यासाठी अडीच हजार पोलिस अधिकारी-कर्मचारी, त्याशिवाय वाहतूक विभागाचे अधिकारी, कर्मचारी तैनात ठेवण्यात आले आहेत. यात ३ पोलिस उपायुक्त, ४ सहाय्यक पोलिस आयुक्त, १७ पेक्षा अधिक पोलीस निरीक्षक, ४१ सहाय्यक पोलीस निरीक्षक-पोलीस उपनिरीक्षक त्याचप्रमाणे ७५० पेक्षा अधिक पोलीस अंमलदारांचा समावेश आहे. वाहतूक विभागाकडून शहराच्या प्रवेशद्वारावर, मुख्य चौकात, नाकाबंदी, गस्त, फिक्स पॉईट, तसेच निर्जन स्थळी चेकिंगचे पॉईंट लावण्यात येणार आहेत. शहरात विविध स्तरावर ठेवण्यात आलेल्या बंदोबस्तावर पोलिस उपायुक्त तसेच सहाय्यक पोलिस आयुक्त विभाग स्तरावरुन देखरेख करणार आहेत. बेवारस वस्तू, संशयित व्यक्ती, संशयित वाहने, मुलींची छेड काढणारे, अफवा पसरविणारे आदींची माहिती देण्यासाठी ११२ या हेल्पलाइनवर संपर्क साधण्याचे आवाहनदेखील पोलिसांनी केले आहे.

# पैशाच्या कारणावरून खूनप्रकरणी आरोपीस उच्च न्यायालयात जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर -**



पैशाच्या कारणावरून चंद्रकांत पवार याचा खून केल्याप्रकरणी अटकेत असलेला आरोपी अतुल मुटेकर याची मुंबई उच्च न्यायालयाने जामीनावर मुक्तता केली.

या प्रकरणाची हकीकत अशी की, आरोपी अतुल मोटेकर याचे घरी पत्रे ठोकण्याचे केलेल्या कामाचे पैसे मागण्याच्या कारणावरून आरोपी अतुल मुटेकर व चंद्रकांत पवार याच्या मध्ये भांडण झाले होते. त्यामुळे चिडून जाऊन आरोपी अतुल मुटेकर याने दि. १९ जून २०२३ रोजी बेंबळे ते अकोले बुद्रुक जाणारे रोडवर चंद्रकांत बाबा पवार (रा. कोन्हापुरी, ता. पंढरपूर) याचा डोक्यात दगडाने मारून त्याचा खून करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने चंद्रकांत पवार यांचे प्रेत उसाचे शेतीचे बांधालगत खड्ड्यात टाकून दिले होते. या आरोपावरून आरोपी अतुल मुटेकर यास टेंभुर्णी पोलिसांनी अटक केलेली होती. आरोपी अतुल मुटेकर याचा जामीन अर्ज बार्शी सत्र न्यायालयात फेटाळण्यात आला होता. त्यानंतर आरोपीने मुंबई उच्च न्यायालयात ॲड. जयदीप माने यांच्यामार्फत जामीन अर्ज दाखल केला होता. मुंबई उच्च न्यायालयात जामीन अर्जाच्या सुनावणी वेळी आरोपीचे वकील यांनी केलेला युक्तिवाद ऐकून आरोपी अतुल मुटेकर याचा जामीन अर्ज मंजूर केला.

याप्रकरणी सरकारपक्षातर्फे ॲड. पी.पी. देवकर यांनी तर आरोपीतर्फे ॲड. जयदीप माने यांनी काम पाहिले.



# नाट्य परिषद, उपनगरीय शाखेचा रंगकर्मी पुरस्कार सोहळा उत्साहात

**सिनेअभिनेते जयराम नायर, अजय तपकिरे यांच्या हस्ते सन्मान**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद उपनगरीय शाखेच्या वतीने आयोजित करण्यात आलेला रंगकर्मी कलागौरव पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला. सिनेनाट्य अभिनेते जयराम नायर व अभिनेते अजय तपकिरे यांच्या हस्ते कलावंताचा रंगकर्मी पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. उपनगरीय शाखेचे अध्यक्ष विजयदादा साळुंखे यांनी प्रास्ताविक करताना शाखेच्या उल्लेखनीय कार्याचा अहवाल सादर केला. सोलापुरात संपन्न झालेले पहिले बालनाट्य संमेलन, शंभरावे विभागीय नाट्य संमेलन ऐतिहासिक आणि अविस्मरणीय झाल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी ज्येष्ठ कलावंताच्या सन्मानार्थ रंगकर्मी पुरस्कार तसेच सध्या रंगभूमीवर कार्यरत असलेल्या कलावंतांना सुशीलकुमार शिंदे रंगकर्मी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अध्यक्षस्थानी माजी आमदार प्रकाशजी यलगुलवार होते तर प्रमुख पाहुणे म्हणून आई प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मोहन डांगरे, बालरंगभूमीचे अध्यक्ष सीमा यलगुलवार, नियामक मंडळ सदस्य प्रा. तेजस्विनी कदम,सुमित फुलमामडी, बार्शी शाखेचे अध्यक्ष सोमेश्वर घाणेगावकर, सल्लागार प्रशांत बडवे, महानगर शाखेचे गोवर्धन कमटम, उपाध्यक्ष शशिकांत पाटील, मीरा शेंडगे, प्रमुख कार्यवाह प्रशांत शिंगे, कोषाध्यक्ष कृष्णा हिरेमठ आदी पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी सर्व पुरस्कार्थींनी आपल्या नाट्यप्रवासाचे अनुभव विशद केले. प्रमुख पाहुण्यांनी उपनगरीय शाखेच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव केला. या पुरस्कार सोहळ्यास रसिक प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपर्णा गव्हाणे आणि श्रुती मोहोळकर यांनी केले तर आभार प्रमुख कार्यवाह प्रशांत शिंगे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्याध्यक्ष जयप्रकाश कुलकर्णी, शोभा बोल्ली, किरण लोंढे, सुशांत कुलकर्णी, आशुतोष नाटकर, वर्षा मुसळे, जितेश कुलकर्णी, महेश निकंबे, अनुजा मोडक आदींनी परिश्रम घेतले.

### सुशीलकुमार शिंदे रंगकर्मी पुरस्काराचे मानकरी

अश्विनी तडवळकर, ऋतुराज आरसिद, अमोल देशमुख, राजेश जाधव, अशोक किल्लेदा, बाळकृष्ण निमसूडकर, अपर्णा जोशी, सुनंदा शेंडगे, सई दरेकर, अर्चना सलवारु, श्रीनिवास देशपांडे, कुबेर शास्त्री, अरविंद माने, श्याम चव्हाण, उमेश बटाणे, रमेश श्रावण, नमिता देशमुख यांचा सन्मान करण्यात आला.

### नाट्य स्पर्धा सोलापूर केंद्राचे प्रथम तीन विजेते

६३ व्या महाराष्ट्र राज्यनाट्य स्पर्धा सोलापूर केंद्रातील पारितोषिक प्राप्त नाट्यसंघांचा विजय कुमार साळुंके पुरस्कृत विक्रमाचा घातांक क्ष (अ.भा. वा. सांप्रादायिक मंडळ सोलापूर, प्रथम) जयप्रकाश कुलकर्णी पुरस्कृत ती रात्र - (अनघ नाट्य मंदिर सोलापूर, द्वितीय) कृष्णा हिरेमठ पुरस्कृत -एका उत्तराची कहाणी - (श्रुती मंदिर, सोलापूर तृतीय).

### रंगकर्मी कलागौरव पुरस्काराचे मानकरी

* **रजनीश जोशी** (सिनेनाट्य अभिनेते) : विजयकुमार साळुंके पुरस्कृत डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली स्मृती पुरस्कार.
* **नागेश भोसेकर** (सिनेनाट्य संगीतकार) : एस. एम. पाटील परिवार पुरस्कृत रंगभूमी संवर्धक सिध्दा पाटील स्मृती पुरस्कार.
* **अमीर तडवळकर** (सिनेनाट्य अभिनेते): शोभा बोल्ली व राजा बागवान पुरस्कृत रंगकर्मी लक्ष्मीनारायण आकेन स्मृती पुरस्कार.
* **वनमाला किणीकर** (ज्येष्ठ अभिनेत्री व दिग्दर्शक) : मिलिंद व मंदार काळे पुरस्कृत रंगकर्मी संजीवनी काळे स्मृती पुरस्कार.
* **दत्तात्रय श्रीराम** (ज्येष्ठ सिनेनाट्य अभिनेते, लेखक, दिग्दर्शक व निर्माता) : प्रशांत शिंगे पुरस्कृत रंगकर्मी ढसाळ स्मृती पुरस्कार.

# वर्ष भरात गहाळ झालेले ३६ लाखांचे १४५ मोबाईल केले परत

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३० डिसेंबर-**



सांगोला पोलीस ठाणे हद्दीमध्ये दि.०१ जानेवारी ते ३१ डिसेंबर या वर्ष भरात गहाळ झालेले एकूण ३६ लाख २५ हजार रुपये किंमतीचे १४५ मोबाईल तांत्रिक विश्लेषणाद्वारे शोध घेऊन तक्रारदार यांना परत करण्यात आले आहेत अशी माहिती सांगोला पोलीस निरीक्षक भीमराव खणदाळे यांनी दिली. तसेच दि.०१ ते ३१ डिसेंबर पर्यंत ३ लाख २० हजार किमतीचे एकूण १६ मोबाईल तक्रारदारास पोलिस निरीक्षक भीमराव खणदाळे यांच्या हस्ते परत केले आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम गायकवाड, सांगोला पोलिस निरीक्षक भीमराव खणदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याकडील पोकॉ.शहाजहान शेख, पोकॉ.रतन जाधव यांनी केली. यापुढे ज्या मोबाईलधारकांचा मोबाईल गहाळ झाल्यास त्यांनी आपल्या हद्दीतील पोलीस ठाणे येथे मोबाईलचे बिल, आधारकार्ड व लेखी अर्ज असे संपूर्ण कागद पत्रासह रितसर तक्रारा नोंदवावी असे आवाहन सांगोला पोलीस निरीक्षक भीमराव खणदाळे यांनी केले आहे.


**जाहीर प्रसिध्दीकरण**

जन्म-मृत्यू/कावि/५९/२०२४
दिनांक २६/१२/२०२४

**अनगर येथील मे.अपर तहसिलदार सो अनगर यांचे न्यायालयात**

**श्री. महादेव अन्याबा माने** - **अर्जदार**
रा. गलंदवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर
विरुध्द
**ग्रामविकास अधिकारी ग्रा.पं. गलंदवाडी ता. मोहोळ, जि. सोलापूर** - **सामनेवाला**

यातील अर्जदार यांनी जन्म व मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३/३ याप्रमाणे अर्ज न्यायालयात आई श्रीमती सुशिला अन्याबा माने यांचा मृत्यू दिनांक २६/११/२०२२ रोजी मौजे गलंदवाडी, ता. मोहोळ येथे अर्जदार यांच्या घरीच झालेला आहे. तसेच ग्रामपंचायत गलंदवाडी रेकॉर्डला देखील कर्मचाऱ्यांनी मृत्युची नोंद घेतलेली नाही. श्रीमती सुशिला अन्याबा माने यांच्या मृत्यू नोंदणीचा दाखला आवश्यक आहे. परंतु सदरची नोंद ग्रामपंचायत गलंदवाडी मृत्यू नोंदणीचे रजिस्टरमध्ये झालेली नसल्याने अर्जदार यांनी श्रीमती सुशिला अन्याबा माने यांच्या मृत्यूबाबत सामनेवाला यांची नोंदणीचे रजिस्टरमध्ये होणेकामी आदेश देणेसाठी अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे. सदरच्या अर्जास कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत अथवा मे. कोर्टात नमेलेली तारीख २८/०१/२०२५ रोजी समक्ष हजर राहून म्हणणे मांडावे अन्यथा मे. कोर्ट मृत्यूची नोंद होणेबाबत योग्य ते आदेश करतील याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली असे. दि. २६/१२/२०२४

शिक्का

**सही/-**
**अपर तहसिलदार**
**अनगर**



## अुत्तम सेवा — मंगळवार दि. ३१ डिसेंबर २०२४ — नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **नागपूर महानगरपालिका** | | | |
| | १) परिचारिका (५२ पदे) | बारावी व GNM कोर्स उत्तीर्ण | ३८ पर्यंत | १५/०१/२५ |
| | २) स्थापत्य अभि. सहाय्यक (१५०) | डिप्लोमा (सिव्हील) उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| | ३) क. अभियंता (३९ पदे) | B.E. (सिव्हील/इले./इलेक्ट्रॉ.) उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| २) | **स्टेट बँक ऑफ इंडिया, SBI** | | | |
| | प्रोबेशनरी ऑफिसर (६०० पदे) | पदवी/ॲपिअर स्त्री/पुरुष उमेदवार | ३० पर्यंत | १६/०१/२५ |
| ३) | **इंडियन आर्मी ई.एम.ई. ग्रुप, पुणे** | | | |
| | १) ट्रेडसमन मेट (२२८ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २५ पर्यंत | १७/०१/२५ |
| | २) लिपीक (५६ पदे) | बारावी व इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | २५ पर्यंत | |
| | ३) व्हेईकल मेकॅनिक (९० पदे) | बारावी व ITI (मेकॅ.) उत्तीर्ण | २५ पर्यंत | |
| | ४) बहुउद्देशीय कर्मचारी (१३ पदे) | दहावी उत्तीर्ण असावी | २५ पर्यंत | |
| | ५) कुशल कर्मचारी (१३५ पदे) | बारावी व ITI (इले/मोटार/फिटर/मशिनिस्ट/टर्नर/वेल्डर) उत्तीर्ण | २५ पर्यंत | |
| ४) | **लेखा व कोषागार संचालनालय** | | | |
| | कनिष्ठ लेखापाल (७५ पदे) | पदवी व मराठी/इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३८ पर्यंत | ३०/०१/२५ |
| ५) | **स्टेट बँक ऑफ इंडिया, SBI** | | | |
| | लिपीक (१३,७३५ पदे) | पदवी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २८ पर्यंत | ०७/०१/२५ |
| ६) | **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, MPSC** | **(गट-ब) (मुदतवाढ)** | | |
| | १) कर निरीक्षक (२०९ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | ०६/०१/२५ |
| | २) कक्ष अधिकारी (५५ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | |
| | ३) पोलिस उपनिरीक्षक (२१६ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३१ पर्यंत | |
| ७) | **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, MPSC** | **(गट-क) (मुदतवाढ)** | | |
| | १) लिपीक (७८६ पदे) | पदवी व मराठी/इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३८ पर्यंत | ०६/०१/२५ |
| | २) कर सहाय्यक (४८२ पदे) | पदवी व मराठी/इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| | ३) तांत्रिक सहाय्यक (०९ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | |
| | ४) नगरपाल (१७ पदे) | पदवी व मराठी/इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| | ५) उद्योग निरीक्षक (३९ पदे) | पदवी/पदविका (इंजिनियरींग)/B.Sc | ३८ पर्यंत | |
| ८) | **जनता सहकारी बँक लि. सोलापूर** | | | |
| | ट्रेनी क्लार्क | पदवी (५०%) गुणांसह उत्तीर्ण असावे व संगणक साक्षरता आवश्यक | ३५ पर्यंत | ३१/१२/२४ |
| ९) | **दि. न्यू इंडिया एश्योरन्स कं. लि. मुंबई** | | | |
| | सहाय्यक (५०० पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३० पर्यंत | ०१/०१/२५ |
| १०) | **राष्ट्रीय संरक्षण व नौदल अकॅडमी** | **NDA** | | |
| | NDA & NA (४०६ पदे) | बारावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | १९ पर्यंत | ३१/१२/२४ |
| ११) | **संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा, CDS** | | | |
| | CDS-I 2025 (४५७ पदे) | पदवी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २३ पर्यंत | ३१/१२/२४ |
| १२) | **समाजकल्याण आयुक्तालय, पुणे** | **(मुदतवाढ)** | | |
| | १) अधीक्षक- महिला (९२ पदे) | पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | ३१/१२/२४ |
| | २) अधीक्षक- सर्वसाधारण (६१) | पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| | ३) समाजकल्याण निरीक्षक (३९) | पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| | ४) वरिष्ठ निरीक्षक (०५ पदे) | पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| | ५) लघुलेखक (२२ पदे) | दहावी व टायपिंग-स्टेनो उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| १३) | **महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं.** | **MAHAGENCO (मुदतवाढ)** | ३८ पर्यंत | १०/०१/२५ |
| | १) तंत्रज्ञ - ३ (८०० पदे) | ITI (इले/ वायरमन/मशिनिस्ट/फिटर/इलेक्ट्रॉ/ आय.टी./वेल्डर/इन्स्ट्रू/बॉयलर/स्विचबोर्ड/पॉवर) उत्तीर्ण | | |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्ॲप करावा.**

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा — १) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.
www.uttamseva.org

# "स्मार्ट सिटी" अपेक्षाभंग!

- शहरातील पर्यटन वृध्दीचा मार्ग खुंटला !
- कोट्यावधीचा खर्च; देखभाल दुरुस्तीचे आव्हान
- उजनी-सोलापूर जलवाहिनी कामाच्या अडथळ्याची शर्यत संपेना!




**स्मार्ट अपयश**


किरण बनसोडे
मो.९४०५४३६१४१


केंद्र शासनाच्या अंतर्गत देशातील १०० शहरे स्मार्ट करण्याची वैशिष्ट्यपूर्ण अशी स्मार्ट सिटी योजना ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महत्त्वाकांक्षी योजना मानली जाते. स्मार्ट सिटी अंतर्गत'' स्वच्छ कार्यक्षम विकसनशील'' हे लक्ष ठेवण्यात आले होते. मात्र सोलापुरात स्मार्ट सिटी योजनेची म्हणावी तेवढी अपेक्षापूर्ती झाली नाही. उलट अपेक्षा भंगच झाला असल्याचे दिसून येते. कोट्यावधी रुपये खर्च करून पूर्ण करण्यात आलेले काही प्रकल्प कुलूप बंद आहेत. देखभाल दुरुस्तीचे तगडे आव्हान आता महापालिकेबरोबरच सोलापूर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन समोर आहे. दुसरीकडे उजनी – सोलापूर जलवाहिनी कामाच्या अडथळ्याची शर्यत संपत नसल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील एकूण शंभर शहरे स्मार्ट करण्याचा निर्णय घेतला होता. महापालिकांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. लोकांचा सहभाग नोंदवण्यात आला होता. २८ जानेवारी २०१६ रोजी सोलापूर शहराचा स्मार्ट सिटी योजनेत समावेश झाला. ही घोषणा झाल्यानंतर सोलापुरात जणू दिवाळी साजरी झाली होती. सोलापूरकरांच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. आता सोलापूर स्मार्ट होणार सोलापूरचा चेहरा मोहरा बदलणार अशी भावना होती. वास्तवात मात्र या अपेक्षांची पूर्ती झाली नसल्याचेच पाहायला मिळाले. आदर्श असा हा प्रकल्प सोलापुरात राबविताना शासन -प्रशासनाचे मोठे दुर्लक्ष झाले. गुणवत्ता आणि दर्जा संदर्भात आरोप-प्रत्यारोप झाले. त्यामुळे या प्रकल्पाच्या यशापेक्षा अपयशावरच मोठी चर्चा होते. विविध कामांवर थेट आरोप करत चौकशीची मागणी झाली मात्र त्याकडे सपशेल दुर्लक्ष करत कार्यवाही केली नाही.

सोलापूर स्मार्ट सिटीचे कामकाज महापालिकेच्या नियंत्रणाखाली चालत नाही तर त्यासाठी स्वतंत्र कंपनी कायद्याखाली कंपनी स्थापन करण्यात आली. सोलापूर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेड ही कंपनी दि. २३ मार्च २०१६ रोजी स्थापन करण्यात आली. या कंपनीचे अध्यक्ष म्हणून वरिष्ठ आयएएसए अधिकारी असीमकुमार गुप्ता यांची नियुक्ती झाली. कंपनीच्या संचालक मंडळात मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस आयुक्त, जिल्हाधिकारी आणि महापालिका आयुक्त, मनपाचे प्रतिनिधी म्हणून महापौर, सभागृह नेते, मनपा विरोधी पक्षनते यांचा समावेश आहे. तर दोन स्वतंत्र संचालक म्हणून शासन नियुक्त सदस्यांची नियुक्ती करण्यात येते. दर तीन महिन्याला संचालक मंडळाची बैठक होते. सर्व प्रक्रियेची माहिती, सर्व निर्णय, अधिकार संचालक मंडळाला आहेत. प्रत्यक्ष अंमलबजावणीचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) यांना आहेत. सुरुवातीला एकूण ५४ प्रकल्प नियोजित होते. त्यानंतर यामध्ये बदल झाला. पहिल्या टप्प्यात सुमारे १०.८ किलोमीटरचे एकूण बारा रस्ते विकसित करण्यात आले आहेत. काही ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट व काही ठिकाणी डांबरी रस्ते, पाण्याची पाईपलाईन व ड्रेनेज लाईन पावसाळी गटार आदी कामे केली.

स्मार्ट रोड फेज - २अंतर्गत पायलट प्रोजेक्ट म्हणून शहरातील रंगभवन चौक ते डफरीन चौक ते डॉक्टर आंबेडकर चौक हा सुमारे १.१ किमीचा रस्ता रिडिझाईन करताना रस्त्याच्या दोन्ही बाजूस पाण्याची पाईपलाईन, ड्रेनेज लाईन, पावसाळी गटार, भूमिगत विद्युत तारा, टेलिफोन वायर इत्यादी युटिलिटी करीत स्वतंत्र डक्ट व फुटपाथ तयार करण्यात आला. शहरात लक्ष्मी मार्केट हेरिटेज स्ट्रक्चरचे पुनर्जीवन, हेरिटेज वस्तूचे जतन करणे अंतर्गत इंद्रभवन इमारतीचे सुशोभीकरण, सिद्धेश्वर तलाव विकास सुधारणा व लाईट अँड साऊंड शो, होम मैदान नूतनीकरण, हुतात्मा बाग फेस-२ अंतर्गत सुधारणा करण्यात आल्या. उद्यान विभाग अंतर्गत पासपोर्ट ऑफिसलगत एडवेंचर पार्कदेखील करण्यात आले.सोलापूर महापालिकेकडे पूर्वी १०५ घंटागाड्या उपलब्ध होत्या. नंतर ७.११ कोटी खर्चून १२० नवीन गाड्या घेण्यात आल्या. या गाड्यांवर जीपीएस ट्रॅकिंग यंत्रणाही बसविण्यात आली. ट्रान्सफार्मेश स्टेशन उपकरणे, ट्रान्सफरस्टेशन सिव्हील, डस्टबिन असे अनेक उपक्रम राबविण्यात आले. करार मुदतीनंतर महापालिका या प्रकल्पांचा दुरुस्ती खर्च उचलणार आहे. योजनेतून शहरातील पायाभूत सोयी सुविधा सक्षम करण्याचा उद्देश आहे. एकूण १६९४ कोटींची कामे हाती घतली होती. त्यापैकी सुमारे ६५० कोटींची कामे पूर्ण झाली. दुहेरी जलवाहिनीचे ८५० कोटींचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.





## निकृष्ट दर्जाचे रस्ते करणाऱ्यांवर कारवाई करा; तत्कालीन उपमुख्यमंत्री फडणवीसांचे आदेश

सोलापूर शहरात काही रस्त्यांच्या कामात गुणवत्ता नाही. निकृष्ट दर्जाचे रस्ते झालेले आहेत. यामध्ये महापालिका आयुक्तांनी गांभीर्याने लक्ष घालावे आणि रस्त्याच्या कामात हलगर्जीपणा करणाऱ्यावर तातडीने कारवाई करावी. ते रस्ते पुन्हा योग्य पद्धतीने करून घ्यावेत, असे सक्त आदेश तत्कालीन उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सोलापुरात लोकार्पण सोहळ्यात यावेळी दिले होते. त्यांनतर कार्यवाही झाली नसल्याचे दिसून आले.

## एकाच दिवशी वर्क ऑर्डर आणि ११ कोटीचे बील अदा केल्याचा आरोप

एकाच दिवशी कामाची वर्क ऑर्डर आणि कंपनीने रिव्हयुव्हड म्हणून ११ कोटीचे बील अदा करण्यासंबधाने पत्र दिले. तेही तांत्रिक मान्यतेशिवाय ! विशेष म्हणजे हे स्मार्ट काम मात्र वर्क ऑर्डर देण्यापूर्वीच दोन महिने अगोदरच पूर्ण झाल्याचा आरोप बहुजन विकास आघाडीचे जिल्हा अध्यक्ष प्रवीण सोनवणे यांनी त्यावेळी केला होता. त्यासंदर्भात संबधीतावर गुन्हे नोंद करावेत, अशी तक्रारही प्रवीण सोनवणे यांनी पोलीस आयुक्त, महापालिका आयुक्त यांच्याकडे केली होती. मात्र त्यानंतर कार्यवाही झाली नसल्याचा आरोपही सोनवणे यांनी केला.

## नवा अनाकलनीय प्रस्ताव स्मार्ट सिटी बोर्डाकडे सादर

मक्ता रद्द केलेल्या तसेच इतकेच नव्हे तर लक्ष्मी कंपनीला टेंडर देण्याचे फायनल केलेल्या नव्या टेंडर प्रक्रियेत कोणताही सहभाग अथवा सबंध नसलेल्या पोचमपाड कंपनीने जलवाहिनीचे काम करण्याचा अनाकलनीय नवा प्रस्ताव स्मार्ट सिटी बोर्डाकडे सादर केला. याबाबत सर्वत्र आश्चर्य व्यक्त झाले होते.

समांतर जलवाहिनी कामाची वर्क ऑर्डर तत्कालीन सीईओ त्रिंबक ढेंगळे - पाटील यांनी दि. १० ऑक्टोबर २०२२ रोजी दिली. त्यानंतर सर्वेक्षणाचे कामही या कंपनीने सुरू केलं होते. त्यांनतर दिनांक २४ नोव्हेंबर २०२२ रोजी तत्कालीन सीईओ ढेंगळे पाटील यांनी लक्ष्मी कंपनीस काम थांबविण्याचे आदेश दिले होते.त्यानंतर बैठकीच्या इतिवृत्तावर चेअरमन असीम गुप्ता यांची सही न झाल्याने तत्पूर्वीच वर्क ऑर्डर दिली असल्याने लक्ष्मी कंपनीचे काम थांबवल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले. यामुळे स्मार्ट सिटीचे चेअरमन गुप्ता यांना इतिवृत्तावर सही करण्यास विलंब का लागला? वर्कऑर्डर दिली असल्याची बाब चेअरमन यांना माहित नव्हती का ? असेल तर वर्क ऑर्डर का देण्यात आली ? आणि काम थांबविण्याचे आदेश या कारणास्तव देण्यात आले असले तरी त्यानंतर चेअरमन गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १५ डिसेंबर २०२२रोजी झालेल्या स्मार्ट सिटीच्या बैठकीत पुन्हा इतिवृत्तावर स्वाक्षरी करून लक्ष्मी कंपनीस काम सुरू करण्याचे आदेश का देण्यात आले नाहीत, असे प्रश्न उपस्थित झाले होते.

## एकूण ४७ पैकी ४६ प्रकल्प पूर्ण

स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत एकूण ४७ पैकी ४६ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. त्यापैकी ४१ प्रकल्पांचे सोलापूर महापालिकेकडे हस्तांतरण करण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत रस्ते सुधारणा, पाणीपुरवठा सुधारणा, घनकचरा व्यवस्थापन, पुरातन वारसा इमारतीचे पुनर्जीवन, सौर ऊर्जा प्रकल्प, सोलापूर शहरातील १४ स्मशानभूमीचे सुशोभीकरण, प्रदर्शनीय जागा विकास, इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटर , स्काडा प्रणाली, पार्क स्टेडियम या घटक प्रकल्पांचा यामध्ये समावेश आहे.

## आयुक्त बदलले अन् मक्तेदारही बदलले

महापालिका आयुक्त दीपक तावरे यांच्या कार्यकाळात हैदराबाद येथील पोचमपाड कंपनीस मक्ता देण्यात आला होता.पी. शिवशंकर यांच्या काळात पोचमपाडचा मक्ता रद्द करून लक्ष्मी इंजिनिअरिंगला दिला होता. समांतर जलवाहिनी कामाची वर्क ऑर्डर तत्कालीन सीईओ त्रिंबक ढेंगळे - पाटील यांनी दि. १० ऑक्टोबर २०२२ रोजी लक्ष्मी कंपनीला दिली. त्यानंतर सर्वेक्षणाचे कामही या कंपनीने सुरू केलं होते. त्यांनतर दि. २४ नोव्हेंबर २०२२ रोजी तत्कालीन सीईओ ढेंगळे- पाटील यांनी लक्ष्मी कंपनीस काम थांबविण्याचे आदेश दिले होते. २५ नोव्हेंबर २०२२ रोजी ढेंगळे -पाटील कार्यमुक्त झाले. त्यानंतर सीईओ पदी आयुक्त शीतल तेली - उगले यांची नियुक्ती झाली. लवाद प्रक्रिया पार पडल्यानंतर सीईओ तथा मनपा आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या कार्यकाळात पोचमपाड कंपनीला मक्ता देण्यात आला. दरम्यान, त्यानंतर सद्यस्थितीत दुहेरी जलवाहिनीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. ११० किलोमीटर पैकी १०४ किलोमीटरचे काम पूर्ण झाले आहे. जागेमुळे जलशुद्धीकरण केंद्राचे काम थांबले आहे. नोव्हेंबर २०२४ पर्यंत या कामाची करारानुसार मुदत होती. महापालिका आयुक्त शितल तेली -उगले यांनी पाठपुरावा करून या जलवाहिनीचे काम अंतिम टप्प्यात आणले आहे.




## विविध कामे आणि निधी असा

- दुहेरी जलवाहिनी ७८५ कोटी
- पार्क स्टेडियम नूतनीकरण - २२.१५ कोटी
- सिटी एक्जीबिशन सेंटर - ५.४४ कोटी
- इंद्रभुवन नूतनीकरण - ५.८९५ कोटी
- राणी लक्ष्मीबाई मंडई नूतनीकरण - ९.६० कोटी,
- स्काडा प्रणाली - ९०.१५ कोटी
- घंटागाड्या खरेदी - ७ कोटी
- पब्लिक प्लाझा रंगभवन - ४.३८ कोटी
- हुतात्मा बाग २ - १.६५ कोटी
- एडवेंचर पार्क - ४.३४ कोटी
- एबीडी एरिया पाणीपुरवठा, ड्रेनेज - १९० कोटी
- प्राधान्य रस्ते (१०.८ किलोमीटर) - १०० कोटी
- राणी लक्ष्मी मंडई - ८.२३ कोटी
- एलईडी पथदिवे - ५३.६० कोटी

## सीईओपदी गोपीचंद कदम यांची नियुक्ती

दरम्यान, शासनाने नुकतीच सोलापूर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ)पदी गोपीचंद कदम यांची नियुक्ती केली आहे. यामुळे आता उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे उर्वरित काम पूर्ण करण्यास प्राधान्याने लक्ष घालावे लागणार आहे. या जलवाहिनीच्या अडथळ्याच्या शर्यतीतून मार्ग काढत हा महत्त्वकांक्षी प्रकल्प पूर्णत्वास न्यायचा आहे. तसेच इतर प्रकल्पासंदर्भातही त्यांना लक्ष घालावे लागणार आहे.




## लाईट अँड साऊंड लेसर शो

सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिर परिसरातील तलावात स्मार्ट सिटी योजनेतून साकारण्यात आलेल्या लाईट अँड साऊंड लेसर शो या प्रकल्पाचे लोकार्पण झाले. या प्रकल्पात म्युझिकल फाउंटन ऑन वॉटर स्क्रीन, लेसर थीम आणि लाईट शो बसवण्यात आला आहे. ७ कोटी ७४ लाख रुपये यासाठी खर्च करण्यात आला. ऑडिओ आणि व्हिडिओ ट्रॅकमध्ये असलेल्या या शो चा कालावधी तीस मिनिटांचा आहे. सोलापूर शहराचा इतिहास, स्वातंत्र्य लढ्यातील सोलापुरचे योगदान, ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यांचे चरित्र तसेच त्यांनी केलेले लोकोपयोगी कार्य यांचा समावेश असलेला हा माहितीपट मराठी, कन्नड आणि हिंदी भाषेतून या शोमधुन दाखवण्यात येणार आहे. यामुळे सोलापूरला येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत निश्चित वाढ होईल असा उद्देश होता मात्र हा प्रकल्प सध्या बंद अवस्थेत आहे.

## स्मार्ट सिटीची कामे निकृष्ट दर्जाची? आ. विजयकुमार देशमुख यांचा आरोप



सोलापूर स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत रस्त्यांसह विविध कामे निकृष्ट दर्जाची झाली आहेत. याबाबत तत्कालीन राज्यपाल व उपमुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली मात्र त्यानंतर चौकशी झाली झाली की नाही हे कळालं नाही. वर पासून खालपर्यंतच्या अधिकाऱ्यांनी ऍडजेस्ट करून या कामात मक्तेदारांना पोसले आहे. अधिकाऱ्यांना कोणतीही भीती नाही, असा आरोप भाजपचे आ.देशमुख यांनी यापूर्वी एका पत्रकार परिषदेत केला होता. सत्ताधारी आमदारानी आरोप केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या.

## शहरातील १४ स्मशानभूमीचे काम

सोलापूर स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत शहरातील १४ स्मशानभूमीचे काम करण्यात आले. कुमठे स्मशानभूमी, मोदी स्मशानभूमी, मोदी ख्रिश्चन समशान भूमी, देगाव मुस्लिम कब्रस्तान स्मशानभूमी, जुना कारंबा नाका स्मशानभूमी, जुना पुना नाका स्मशानभूमी, भावसार स्मशानभूमी, रुपाभवानी रोड लिंगायत स्मशानभूमी, रुपा भवानी रोड हिंदू स्मशानभूमी, अक्कलकोट रोड जडे साहेब मुस्लिम स्मशानभूमी, अक्कलकोट रोड पद्मशाली स्मशान भूमी या सर्व स्मशानभूमीचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. दि. ३१ ऑक्टोबर २०२१ रोजी या कामाचे भूमिपूजन करण्यात आले होते. एकूण २२ कोटी रुपये निधीतून या १४ स्मशानभूमीत सुशोभीकरण काम करण्यात येत आहे. प्रवेशद्वार,संरक्षक भिंत, गॅस दाहिनी, स्वच्छता गृह, अंतर्गत कॉंक्रिटचे रस्ते, सौर पथदिवे, वेटिंग शेड, बोर व पंपसेट बर्निंग शेड, पाण्याची टाकी, पेवर ब्लॉक पथदिवे, प्रेरक करणारे साईन बोर्ड, स्टोअर रूम, विद्युत दाहिनी आदी कामांचा यामध्ये प्रामुख्याने समावेश आहे.

## इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटर

कमांड अँड कंट्रोल सेंटरचे काम येत्या दोन महिन्याच्या कालावधीत पूर्ण होण्याची शक्यता असून त्याद्वारे संपूर्ण शहरातील सुरक्षा व्यवस्थेवर देखरेख व नियंत्रण करण्यासाठी याचा उपयोग होणार आहे. या इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरच्या उभे करतानाच शहर सुरक्षा व्यवस्था, स्काडा प्रणालीचे नियंत्रण, ऑटोमॅटिक ट्रॅफिक सिग्नल, ई - चलन सिस्टीम ही सर्व कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. शहरात १३० ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येत आहेत.

# उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनी महत्त्वकांक्षी प्रकल्पाचा प्रवास अडथळ्यांचाच!

स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत उजनी ते सोलापूर हा शहराच्या भविष्याच्या दृष्टीने महत्वकांक्षी प्रकल्प आहे. या कामाचे भुमीपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हस्ते आले होते. सोलापूर शहरासाठी वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठी उजनीधरण ते सोलापूर १७० एमएलडी क्षमतेची दुहेरी पाईपलाईन योजना आहे.

या कामाचे ३५९ कोटी इतक्या रक्कमेचे टेंडर दि.१७ जानेवारी २०१९ रोजी प्रसिध्द केली होती. या निविदेच्या सर्व प्रक्रिया पुर्ण करण्यात येवुन दि.९ सप्टेंबर २०१९ रोजी हैदराबाद येथील पोचमपाड कन्स्ट्रक्शन कंपनी प्रा.लि. यांना ४०५ कोटी(जीएसटी वगळुन ) इतक्या रक्कमेचे कार्यारंभ आदेश देण्यात आला होता.

या योजनेअंतर्गत मुख्यत्वे धरण क्षेत्रात जॅकवेल बांधणे, पंपीग स्टेशन व पंपीग मशिनरी, रायझिंग मेन, बी.पी.टी., ग्रॅव्हीटी मेन इ.कामाचा समावेश आहे. उजनी येथे पंपीग स्टेशन, उजनी ते वरवडे (२८.५ किमी दाबनलिका) , वरवडे ते सोरेगाव (८१.५० किमी उतारनलिका) समाविष्ट आहे. या कामांमध्ये १३२१मिमी, १२९६मिमी, ११६८मिमी व्यासाच्या पाईपचा समावेश आहे. जिंदाल स्टील वर्क्स येथुन ११६८ मिमी व्यास व १० मिमी जाडीच्या एमएस पाईपचा पुरवठा केला. सोलापूर शहरातील पुणे हायवेवरील



राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र येथे प्रत्यक्ष पाईपलाईन टाकण्यास सुरवात झाली होती. दरम्यान, या योजनेचे काम वर्षभर रखडले होते व ते सुरु झाले होते. सोलापूर शहराची सन २०५० ची ३३ लाख लोकसंख्या गृहीत धरून समांतर जलवाहिनीचे नियोजन करण्यात आले. दरम्यान, महापालिकेचे तत्कालीन आयुक्त अविनाश ढाकणे यांनी यासाठी ४५०४ कोटींचा विकास आराखडा तयार केला. या समांतर जलवाहिनीकामासाठी स्मार्ट सिटी योजनेतून २०० कोटी तर एनटीपीसी कंपनीकडून २५० कोटींचा निधी उपलब्धतेस मान्यता मिळाली. या प्रकल्पाला ऑक्टोबर २०१८ मध्ये अंतिम मंजुरी देण्यात आली. त्यानंतर निविदा प्रक्रिया पार पाडली. आणि हैदराबादच्या पोचमपाड कंपनीला सप्टेंबर २०१९ मध्ये या महत्वाकांक्षी कामाचा मक्ता देण्याची वर्कऑर्डर (कार्यादेश) देण्यात आली. त्यानंतर या कंपनीने १८ किलोमीटर अंतरावर जलवाहिनी टाकण्यासह इतर तांत्रिक अशी ४८ कोटींचे कामे हाती घेतली होती. दरम्यान काळात कोरोना लॉकडाऊन यासह इतर कारणास्तव विलंब झाला. परिणामी वाढीव रकमेची मागणी कंपनीने केली. या कंपनीचा मक्ता रद्द झाला. टर्मिनेट करण्यात आले. पोचमपाड कंपनी दाद मागण्यासाठी न्यायालयात गेली. लवाद नेमला. त्यानंतर राज्यात सत्तांतर झाले.

दरम्यान, महाविकास आघाडी सरकारने ११० वरून वाढवून ही योजना १७० एमएलडीवर आणली. तसेच भूसंपादनासाठी होणार खर्च वाचविण्याकरिता राष्ट्रीय महामार्गाकडून ३० वर्षांसाठी आवश्यक जागा भाडेतत्त्वावर घेतली. तर वाढीव योजनेसाठी २०० कोटी मंजूर करण्यात आले. त्यानंतर नव्याने टेंडर प्रक्रियेत अडीच वर्षे गेली. आणि राज्यात पुन्हा सत्तांतर झाले. स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन कडून टेंडर प्रक्रिया राबवून अखेर कोल्हापूरच्या लक्ष्मी इंजिनिअरिंग कंपनीला ६३९ कोटींच्या योजनेचा मक्ता देण्यात आला.लक्ष्मी इंजिनिअरिंग कंपनीस १७० एमएलडी क्षमतेचे काम ६३९ कोटीस दिले.

महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांची बदली झाली. त्यांच्या जागी शितल तेली - उगले या रुजू झाल्या. दरम्यान, सोलापूर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनचे सीईओ त्रिंबक ढेंगळे पाटील यांना कार्यमुक्त करण्यात आले. २५ नोव्हेंबर २०२२ रोजी ते कार्यमुक्त झाले. आणि महापालिकेचे आयुक्त शितल तेली - उगले यांच्याकडेच स्मार्ट सिटी सीईओ पदाचा शासनाने पदभार दिला. तत्पूर्वी २४ नोव्हेंबर २०२२ रोजी तत्कालीन सीईओ ढेंगळे - पाटील यांनी समांतर जलवाहिनीचे काम थांबविण्याचे आदेश दिले असल्याची माहिती पुढे आली. त्यानंतर १५ डिसेंबर २०२२ रोजी स्मार्ट सिटी कार्पोरेशन बोर्डाची बैठक चेअरमन असीम गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली झाली होती. या बैठकीनंतर चेअरमन असीम गुप्ता यांनी महापालिकेतील इंद्रभुवनच्या नूतनीकरण कामाची पाहणी केल्यानंतर माध्यमांशी बोलताना समांतर जलवाहिनीचे यापूर्वीचा मक्ता रद्द केलेल्या हैदराबादच्या पोचमपाड कंपनीने पुन्हा हे काम करण्यासंदर्भातला प्रस्ताव बोर्डाकडे सादर केला असल्याचा गौप्यस्फोट केला होता. तर दुसरीकडे तत्पूर्वी २४ नोव्हेंबर २०२२ रोजी तत्कालीन सीईओ ढेंगळे - पाटील यांनी समांतर जलवाहिनीचे काम थांबविण्याचे आदेश दिले असल्याची माहिती पुढे आली. तर दिनांक ५ डिसेंबर २०२२ रोजी मक्ता रद्द केलेल्या पूर्वीच्या पोचमपाड कंपनीने पुन्हा काम करण्यात असल्याचा प्रस्ताव बोर्डाकडे दिला. यामुळे समांतर जलवाहिनीच्या या कामात ट्विस्ट आला. एकीकडे तत्कालीन सीईओ कार्यमुक्ती पूर्वी सध्याच्या मक्तेदारास काम थांबविण्याचे आदेश देतात तर दुसरीकडे स्मार्ट सिटी चे चेअरमन हे टर्मिनेट झालेल्या व मक्ता रद्द केलेल्या जुन्या पोचमपाड कंपनीने पुन्हा काम करणार असल्याचा प्रस्ताव सादर केला असल्याची माहिती १५ डिसेंबर २०२२ च्या बैठकीनंतर माध्यमांना दिली होती. यामुळे याप्रकरणी अनेक प्रश्न उपस्थित झाले होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# जिल्हा

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### सीए परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या आशुतोष कौलवार यांचा सत्कार

**पंढरपूर, दि.३० डिसेंबर-**

आर्य वैश्य कोमटी समाज-जेष्ठ नागरिक समिती, पंढरपूर यांच्या वतीने आयोजित कोमटी समाजातील आशुतोष मनिष कौलवार याने पहिल्याच प्रयत्नात चार्टर्ड अकौटंट परीक्षेत घवघवीत यश संपादन करुन ५० वा क्रमांक पटकावला म्हणून त्याचा सत्कार साहित्यिक व वक्ते शहाजी देशमुख यांचे हस्ते नुकताच करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ पत्रकार रमेश घळसासी उपस्थित होते. यावेळी हसत खेळत जीवन कसे जगावे ? या विषयावर शहाजी देशमुख यांचे खुमासदार व्याख्यान झाले. यावेळी जेष्ठ नागरिक संघाचे प्रभाकर कौलवार, प्रफ्फुल गडम, नलबिलवार, सुरेंद्र कवठेकर व आर्यवैश्य कोमटी समाजातील उपाध्यक्ष अनेक जेष्ठ प्रतिष्ठित व्यापारी- भगिनी वर्ग व नागरीक उपस्थित होते. यावेळी कोमटी समाज बांधव लक्ष्मीकांत नारायण गडम, प्रकाश रंगनाथ नलबिलवार, ज्ञानेश्वर सदाशिव कोले, औदुंबर विश्वनाथ पल्लेवार, दिलीप काशिनाथ गुज्जलवार , बाळकृष्ण नरहर चिंतलवार यांचा देखील विशेष सत्कार करण्यात आला.



### ग्रीन फिंगर्स कॉलेजमध्ये स्कूल कनेक्ट कार्यशाळा उत्साहात

**अकलूज, दि. ३० डिसेंबर-**

ग्रीन फिंगर्स कॉलेज तर्फे स्कूल कनेक्ट कार्यक्रमांतर्गत बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी करियर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एक प्रभावी करिअर मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित केली गेली. आजच्या जलद विकसित जगात पारंपारिक करिअर मार्ग हाच एकमेव पर्याय राहिलेला नाही आर्टिफिशल इंटलिजन्स डिजिटल मार्केटिंग ग्राफिक्स डिझाईन या क्षेत्रातील करियर फायदेशीर म्हणून उदयास आले आहेत याची माहिती उपस्थित विद्यार्थ्यांना देण्यात आली. या कार्यशाळेत नवीन करिअरच्या संधी व त्यामध्ये येणारे नवीन नवीन सॉफ्टवेअर मधील बदल तसेच करिअरमधील आवश्यक कौशल्याची माहिती देण्यात आली या कार्यशाळेत अशा व्यक्तींची उदाहरणे देण्यात आली ज्यांनी नवीन काळातील करिअरमध्ये प्रवेश केलेला आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चौकटी बाहेर विचार करण्यास प्रेरित केले गेले. ही कार्यशाळा माळशिरस, अकलूज, नरसिंगपूर, टेंभुर्णी इत्यादी अनेक गावातील विविध महाविद्यालयांमध्ये संपन्न करण्यात आली. या कार्यशाळेमध्ये नवीन शैक्षणिक धोरण व त्यामधील बदल याची माहिती विद्यार्थ्यांना दिली तसेच शैक्षणिक धोरणानुसार शैक्षणिक व नवीन तंत्रज्ञानानुसार असणाऱ्या करिअर संधी विषयी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



### संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची प्रा. झोळ यांनी घेतली भेट

**करमाळा, दि.३० डिसेंबर-**

मस्साजोग (ता. केज, जि. बीड) गावचे लोकनियुक्त सरपंच संतोष पंडितराव देशमुख यांची दिवसाढवळ्या निर्घृण हत्या झाल्यानंतर, त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामदास झोळ यांनी त्यांच्या कुटुंबीयांची मस्साजोग गावी जाऊन भेट घेतली. सदर घटना ही शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महान व्यक्तिमत्त्वांचा वारसा लाभलेल्या महाराष्ट्र राज्यास अशोभनीय आहे. या हत्या प्रकरणात राजकीय नेत्यांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी समाज माध्यमांमध्ये प्रसिद्ध केलेल्या पुराव्यांची पोलीस यंत्रणेने दखल घ्यावी, अशी आशा प्रा. झोळ यांनी व्यक्त केली.

### अक्कलकोट येथे वेळ अमावस्या उत्साहात साजरी

**अक्कलकोट, दि. ३० डिसेंबर-**

महाराष्ट्र कर्नाटक सिमावर्ती भागात शेतकऱ्याच्या आवडीचा व जिव्हाळया असलेला वेळा आमावशासण सोमवारी मोठया उत्साहाने साजरा झाला. चॉंगो चांग भले पाऊस आला हरको चलो अशी आरोळी देत बळी राजाने रानात पिकात अंबील शिंपडल. पांडव व लक्ष्मी चे पुजन केले . छज्जी रोट्टी चवळीकाई भज्जी बाजरीचे ऊंडे पुरणपोळी असा अस्सल गावरान मेनु च्या पंगती रानात झडल्या अवघ शहर आज निसर्ग पर्यटनासाठी शिवराकडे आल होत. शेत शिवारे आज शेतकऱ्याच्या आप्तस्वकीय मित्र व शहरी बाबूनी फुललेली दिसली. वेळा अमावशानिमित्य आज सिमावर्ती महाराष्ट्र कर्नाटक भागात पहाटे २पासुन शेतकऱ्याच्या घरामध्ये बाजरीचे उकडलेले उन्डे व चुका पालक मेथी अंबाडा हरभरा भाजी ढाळे चाकवत चिंच बोर काकडी गाजर भोपळा घेवडा मटार कांदयाची पात सर्व प्रकारच्या भाज्या यासह अनेक रानभाज्या मिळून भज्जीनामक अस्सल गावरानभाजी बनविली होती. भज्जीनामक सर्व प्रकारच्या भाज्याची एकत्रीत भाजी हाच मेनु व बाजरीचे उकडलेले उंडे पुरन पोळी अंबील यावर शेतकरी त्यांचे मित्र परिवार यांनी ताव मारला. रानामध्ये बळीराजाने पांडव लक्ष्मीची पुजन केले. अंबील शिडकाव केला. चांगमल चा गजर केला.

# ग्रामीण भागात तायक्कांदोकडे वाढतोय मुलींचा कल

## आई-वडिलांकडून मुलींसाठी तायक्कांदोला प्राधान्य

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, ३० डिसेंबर-**

राज्यासह देशामध्ये मुलींचा विनयभंग, छेडछाड, लैंगिक अत्याचार अशा घृणास्पद घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. तसेच अलीकडच्या काळामध्ये मुलींचे आई-वडील आपल्या मुलीला कराटे, तायक्कांदो, ज्युडो अशा साहसी खेळासाठी प्रोत्साहन देत असल्याने या खेळांकडे मुलींची संख्या वाढताना दिसत आहे. आपल्या मुलीसोबत आपण सतत राहू शकत नाही. अशा परिस्थितीमध्ये तिच्यावर काही संकट ओढावल्यास तिने स्वतः आत्मसंरक्षण केले पाहिजे. तसेच, आयुष्यातील कठीण प्रसंगांना सामोरे जाण्यासाठी मानसिक आणि शारीरिक कणखरता आली पाहिजे, असा विचार पालकांमध्ये रुजत आहे.

मुलींना लहानपणापासूनच कराटे, तायक्कांदो, ज्युडो या खेळांचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण मिळावे असा प्रयत्न पालक करीत आहेत.



लहान मुले-मुली एखादी गोष्ट लवकर शिकतात. तसेच, या खेळामुळे शरीर आणि मन दोन्ही कणखर बनते. म्हणून या खेळांसाठी लहान वयापासून मुलींना प्रोत्साहन देत आहेत. शहरी भागासोबतच आता ग्रामीण भागातील मुलींचे पालक सजग बनले आहेत. मोबाइल, टीव्हीमुळे कराटे, तायक्कांदो, ज्युडो अशा खेळांची माहिती ग्रामीण भागातील मुलींना मिळत आहे. त्यामुळे या मुलीही अशा खेळात नाव कमविण्यासोबतच शारीरिक आणि मानसिकरित्या कणखर बनत आहेत. सोलापूरसारख्या शहरामध्ये मुलांना मैदानी खेळ खेळण्यासाठी जागांची उपलब्धता कमी झाली आहे. परिणामी शरीराला व्यायाम मिळत नाही. त्यामुळे पालक मुलांना विशेषता कराटे, तायक्कांदो, ज्युडो अशा खेळांसाठी पाठवित आहेत. गेल्या काही वर्षांत भारतीय मुलींनी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठे नाव कमविले आहे. कराटे, ज्युडो, तायक्कांदो अशा खेळांमध्ये मुलींसाठी मोठ्या संधी असल्याने पालक मुलींना या खेळांमध्ये करिअर घडविण्याच्या दृष्टीने त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रयत्न करीत आहेत, त्यामुळे येणाऱ्या काळात मोठ्या संख्येने मुली या खेळांमध्ये पदक आणि नाव कमविताना दिसतील अशी पालकांना आशा आहे.

पोलीस, सैन्य दलातील भरती तसेच राज्यसेवा परीक्षांमध्ये खेळाडूंसाठी काही जागा रिक्त असतात. कराटे, ज्युडो, तायक्कांदो अशा खेळात राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पारितोषिके जिंकणाऱ्या मुला-मुलींना सरकारी नोकरी मिळविताना मोठा फायदा होत असतो. त्यामुळे मुलींच्या भविष्याचा विचार करून पालक आपल्या पाल्यांना अशा खेळांसाठी मार्गदर्शन करीत आहेत.

> १५ वर्षांपासून तायक्कांदोचे प्रशिक्षण देत आहे. पूर्वी मुलींची संख्या फारच कमी होती. परंतु, गेल्या दोन वर्षांपासून मुलींच्या संख्येमध्ये मोठी वाढ झाली आहे. आज मुलांपेक्षा मुली तायक्कांदो चांगल्या प्रकारे शिकत आहेत. करिअर व स्वसंरक्षणासाठी माझ्याकडे ४० मुली प्रशिक्षण घेत आहेत. अजूनही मुलींची संख्या वाढत असून पालक मुलींच्या बाबतीत सजग झाले आहेत.
>
> **- शिवराज मुगळे, प्रशिक्षक, दक्षिण सोलापूर तायक्कांदो अकॅडमी**

> अलीकडील काळामध्ये मुलींबाबत घडणाऱ्या घटनांमुळे मुलीची आई म्हणून चिंता वाटते. आपल्या मुलीने आयुष्यातील कठीण प्रसंगांना सामोरे जाण्यासाठी तिने कणखर बनणे गरजेचे आहे. म्हणून मी माझ्या मुलीला तायक्कांदो शिकण्यासाठी पाठवित आहे.
>
> **-श्रीदेवी वाले, पालक**

## एमएएच-एलएलबी-सीईटी-२०२५ करिता ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० डिसेंबर-**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये पदवीनंतर ३ वर्षे कालावधी असलेल्या एलएलबी ला प्रवेश घेण्याकरिता प्रवेशपूर्व परीक्षा देणे आवश्यक आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या वतीने सदर प्रवेशपूर्व परीक्षेच्या तारखा जाहीर झाल्या असून एमएएच-एलएलबी-सीईटी-२०२५ या प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याची प्रक्रिया शुक्रवार, दि.२७ डिसेंबर २०२४ पासून ते सोमवार, दि.२७ जानेवारी २०२५ पर्यंत सुरु राहणार आहे. पदवी उत्तीर्ण झालेल्या व पदवीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी एमएएच-एलएलबी-सीईटी २०२५ साठी ऑनलाईन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा स्वेरीमध्ये उपलब्ध केली आहे.' अशी माहिती स्वेरीचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांनी दिली.

कोणत्याही शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण असलेले जे विद्यार्थी एलएलबी ला प्रवेश घेऊ इच्छितात त्यांना शासनाची एमएएच-एलएलबी-सीईटी-२०२५ ही परीक्षा द्यावी लागेल. महाराष्ट्र शासनाने घोषित केल्यानुसार दि. २० मार्च २०२५ व दि. २१ मार्च २०२५ या दोन दिवशी सदर परीक्षा होणार आहे. या परीक्षेसाठी ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रिया शुक्रवार, दि.२७ डिसेंबर २०२४ पासून ते सोमवार, दि.२७ जानेवारी २०२५ पर्यंत चालणार आहे. खुल्या प्रवर्गासाठी प्रवेश परीक्षा नोंदणी शुल्क रु.१००० व अनुसूचित जाती-जमातीसाठी रु.८०० एवढे असून हे नोंदणी शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरायचे आहे. या सीईटी परीक्षांचे फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्यांकडे आयडेंटी साईज एक रंगीत फोटो, एटीएम कार्ड अथवा ऑनलाईन बँकिंगचा लॉगीन आयडी आणि त्याचा पासवर्ड या बाबी आवश्यक असणार आहेत. या प्रवेश परीक्षेच्या संदर्भात अधिक माहीतीसाठी शासनाचे अधिकृत www.mahacet.org हे संकेतस्थळ पाहवे तसेच स्वेरी अभियांत्रिकीच्या प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता डॉ.करण पाटील (मोबा. नंबर-९५९५९२११५४) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

## अन्नछत्राचे सामाजिक कार्य उल्लेखनीय : अभिषेक कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३० डिसेंबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून भक्तांची सेवा गेल्या ३८ वर्षापासून अखंडपणे सुरु असून धार्मिकतेबरोबरच सामाजिक जोड ही बाब उल्लेखनीय असल्याचे मनोगत एमडी ग्रुप सीईओ अर्बन एरो स्पेस, इंडिया, दुबई, युकेचे प्रोप्रायटर अभिषेक कुलकर्णी पुणे यांनी व्यक्त केले.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी ज्योतिष सुजित देशमुख पुणे, लोकमान्य मल्टीस्टेटचे विभागीय व्यवस्थापक सुशील जाधव उपस्थित होते. यावेळी उपाध्यक्ष अभय खोबरे, सिद्धेश्वर मोरे, पुरोहित अप्पू पुजारी, प्रवीण घाडगे, गोटू माने, निखील पाटील, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, राहुल इंडे, बाळासाहेब घाडगे, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, एस. के. स्वामी, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, विशाल घाडगे, विठ्ठल रेड्डी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



## दुधनी येथे तीन घरफोड्या; ६४ हजारांचा मुद्देमाल लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३० डिसेंबर-**

तालुक्यातील दुधनी येथे १९ डिसेंबर रोजी रात्री १० वाजता ते ३० डिसेंबर रोजी पहाटे ३ वाचे सुमारास बंद घराचे दारास लावलेले कुलूप अज्ञात व्यक्तीने अज्ञात हत्याराने फोडुन घरात प्रवेश करुन १४ हजार रुपये किमंतीचे सोने, चांदीचे दागीने व रोख रक्कम चोरून नेले. तसेच शेजारील दोन घरे फोडुन ४९ हजार आठशे रूपयांचा ऐवज याबाबत दक्षिण पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल झाला आहे. फिर्याद सिध्दाराम अप्पाशा कुंभार (वय २७ वर्षे) व्यवसाय टेलर राहणार दुधनी (ता. अक्कलकोट) याने दिली. फिर्यादी हा सोलापूर येथील रेमन्ड शोरुम मध्ये काम करुन कुटूबांची उपजिवीका भागवितो. फिर्यादीच्या वडीलांचे डोळ्याचे ऑपरेशन असल्याने तीन दिवसापुर्वी वडीलांना सोलापूर येथील खासगी हॉस्पीटल मध्ये उपचारास दाखल केले असुन वडीलाजवळ रात्रीच्या वेळी कोणी तरी पाहीजे म्हणुन आई गुज्जबाई हिस काल रात्री १० वाजता घराचे दार बंद करुन कुलूप लावुन सोलापूर येथे घेवुन गेले होते. आज पहाटे शेजा-याने फोनवरुन चोरीची माहिती दिली. अज्ञात व्यक्तीने स्वताचे आर्थीक फायदया करीता सात हजार रोख, सात हजार रूपयाचे एक ग्रॅममुलाचे कानातील सोन्याचे कुडी असे १४ हजार रूपयाचा रोख रुपये व सोन्याचे दागीने चोरुन नेले. तसेच गल्लीतील सुनिल गजानन काळे यांच्या घराचे दार अज्ञात हत्याराने उचकटुन घरात प्रवेश करुन त्यांचे घरातील रोख रक्कम व चांदीचे लिंग व चांदीची बोरमाळ असे २५ हजार रोख रक्कम व चौदा हजार रुपये किमंतीचे २ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कर्णफुले असे ३९ हजार रूपयाचा ऐवज व सिध्दम्मा यशवंतप्पा कोतनुर यांचे १८०० रुपये किमंतीचे २ तोळ वजनाचे चांदीचे लिंग व नऊ हजार रुपये किमंतीचे १० तोळ वजनाचे चांदीचे बोरमाळची चैन असे एकुण १० हजार आठशे रूपयाचा ऐवज चोरून नेले.असे एकुण तीन घरे फोडुन ६३ हजार ८०० रुपये किमंतीचे सोने, चांदीचे दागीने व रोख रक्कम कोणी घरात नसल्याचे फायदा घेत बंद घराचे दारास लावलेले कुलूप अज्ञात व्यक्तीने अज्ञात हत्याराने फोडुन घरात प्रवेश करून स्वताचे आर्थीक फायदया करीता चोरुन नेले.

## वैरागमध्ये शॉर्टसर्किटमुळे आग लागून घर जळून खाक

### वेळ अमावस्येनिमित्त कुटुंबीय शेतात गेल्यानंतर घडली घटना

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ३० डिसेंबर-**

वेळा अमावस्या असल्यामुळे घरातील सर्व सदस्य शेतात गेलेले असताना बंद घरामध्ये शॉर्टसर्किटमुळे अचानक आग लागून संसारोपयोगी आणि जीवनाश्यक वस्तू जळून खाक झाल्या.ही घटना सोमवारी सकाळी साडे अकराच्या सुमारास ढोराळे (ता बार्शी) येथे घडली असून यातून सुमारे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

ढोराळे येथील शहाजी बलभीम आवारे हे वेळ अमावस्या असल्यामुळे आपल्या कुटुंबासह शेतामध्ये पूजा करण्यासाठी गेले होते. त्यानंतर साडेअकराच्या सुमारास गावकऱ्यांनी तुमच्या घराला आग लागली आहे असे सांगितल्यानंतर ते घरी परत आले. त्यावेळेस आगीच्या भक्षस्थानी सापडलेले घर त्यांना पाहायला मिळाले. गावकऱ्यांनी तातडीने अग्निशमन दलाला पाचारण केले. मात्र ती वेळेवर येऊ शकत नसल्याचे कळल्यामुळे गावकऱ्यांनीच आग विझवण्यासाठी प्रयत्न सुरू केले त्यांच्या प्रयत्नांना काही वेळानंतर यशदेखील आले. मात्र तोपर्यंत शहाजी आवारे यांच्या घरातील टीव्ही, फ्रिज, कुलर, कपाट, दिवाण अशा संसार उपयोगी वस्तू जळून खाक झाल्या होत्या तर भुईमुगाच्या शेंगा, सोयाबीन, तांदूळ, ज्वारी, खते हे देखील आधीच सापडल्यामुळे जळून खाक झाले. दरम्यान वैराग पोलीस ठाण्यामध्ये या घटनेची नोंद करण्यात आली असून महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाच्या वतीने घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला आहे.

## गावातील मंजूर कामासाठी ग्रामपंचायतीचा ठराव

### एनओसी अट रद्द करण्याची आ. सदाभाऊ खोत यांची ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ३० डिसेंबर-**

गावगाड्यातील विविध मंजूर असलेल्या विकासकामांसाठी ग्रामपंचायतीची ठरावाची नक्कल किंवा एनओसी ची अट काढून टाकण्याची मागणी आ. सदाभाऊ खोत यांनी राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे केली आहे.



गावागावांत विविध लेखा शीर्ष अंतर्गत कामे मंजूर होत असतात. परंतु या मंजूर कामांसाठी ग्रामपंचायतीचा ठराव किंवा ना हरकत दाखला आवश्यक असतो. अनेक ग्रामपंचायती विरोधकांच्या ताब्यात असल्यामुळे ते ग्रामपंचायतीचा ठराव किंवा ना हरकत प्रमाणपत्र देत नाहीत. या कारणामुळे गावातील विकास कामे करण्यास अडथळा निर्माण होत आहे. काम न झाल्यामुळे तो निधी तसाच पडून राहतो किंवा लॅप्स होतो.वरील परिस्थिती लक्षात घेता गावातील मंजूर विकास कामांसाठी ग्रामपंचायतीच्या ठरावाची किंवा ना हरकत दाखल्याची जाचक अट काढून टाकण्याची मागणी आ सदाभाऊ खोत यांनी ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे केली आहे.

# पंढरपुरात कृषी उडान विमानतळ लवकर व्हावे

## आ. अभिजीत पाटील मागणी; केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० डिसेंबर-**

माढा विधानसभाचे आमदार अभिजीत पाटील यांनी विकास कामाचा झपाटा लावलेला दिसत आहे. निवडणुकीमध्ये दिलेल्या वचनाला जागत मतदार संघातील प्रश्नांचा उलगडा करत आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वीच हिवाळी अधिवेशन नागपूर येथे मतदार संघातील ५५ प्रश्नांचा उलगडा करत विधानसभेच्या पटलावर नेऊन ठेवला आहे. तसेच आज दिनांक ३० डिसेंबर रोजी केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची मुंबई येथे भेट घेऊन पंढरपूर येथे केंद्रीय कृषी उडान योजना अंतर्गत विमानतळ व्हावे ही मागणी चे पत्र आमदार अभिजीत पाटील यांनी दिले.



सोलापुर जिल्ह्यातील श्रीक्षेत्र पंढरपुराला दक्षिण काशी तर विठ्ठलाला महाराष्ट्राचे आराध्य दैवत म्हणतात. विठ्ठलमंदिर अवघ्या महाराष्ट्राचे एक चिरंतन स्फूर्ती स्थान आहे. गोरगरिबांचा देव म्हणून श्री विठ्ठलाची ओळख आहे. पंढरपूरमध्ये वर्षातून चैत्री, आषाढी, माघी व कार्तिकी एकादशी निमित्त मोठ्या यात्रा भरतात..त्यातील दरवर्षी आषाढी एकादशीला लाखो भाविक येथे वारीसाठी व श्री विठ्ठल-रखुमाईचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. अशा या भारताची दक्षिण काशी समजल्या जाणार्या श्रीक्षेत्र पंढरपूर येथे केंद्रीय 'कृषी उडान योजना २.०' या योजनेअंतर्गत विमानतळ असणे गरजेचे आहे. श्रीक्षेत्र पंढरपूर येथे विमानतळ झाल्यास श्रीक्षेत्र शिर्डी प्रमाणे धार्मिक पर्यटन स्थळ असलेल्या पंढरपूरचाही विकास होईल. या विमान सेवेमुळे अक्कलकोट, गाणगापूर, तुळजापूर इत्यादी तीर्थक्षेत्रांना भेट देणाऱ्या भाविकांसाठी गतिमान वाहतुकीची सुविधा उपलब्ध होईल. त्याशिवाय परदेशातील भाविकांची रिघ वाढेल, मागील काही वर्षात आषाढी वारीत परदेशी भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत असल्याने विमान सेवा सुरु झाली तर परदेशातील भाविकांसाठी सोयीचे ठरणार आहे.

> **शेतमालाला मिळणार जागतिक मार्केट**
>
> श्रीक्षेत्र पंढरपूर येथे विमानतळ झाल्यास शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांपर्यंत कमी वेळात आणि कमी खर्चात पोहोचवता येईल. शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन दूरच्या बाजारपेठांपर्यंत पोहोचवण्यासाठी मदत होईल आणि त्यांचे उत्पन्नात वाढ होईल. त्याचबरोबर शेतकऱ्यांना आर्थिक लाभासह त्यांच्या उत्पादनाला जगभरात ओळख मिळेल होईल असे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले.

# ५१ दुकानांकडून अडीच लाख दंड वसूल

## ७ हजार ७२ किलो प्लास्टिक केले जप्त, ३४८ दुकानांची केली तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

महापालिकेच्या पथकाकडून विविध बाजारपेठांमध्ये प्लास्टिक विरोधी कारवाईची मोहीम जोरदारपणे सुरूच आहे. गेल्या तीन दिवसात महापालिकेच्या पथकाने ५१ दुकानांकडून २.६० लाख दंड वसूल केला आहे. ३४८ दुकानांची तपासणी करण्यात आली तर ७ हजार ७२ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले.

आयुक्त शितल तेली-उगले यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या नियंत्रणाखाली नियोजनपूर्वक प्लास्टिक विरोधी कारवाई मोहीम राबविण्यात येत आहे. आज शनिवारी महापालिकेच्या पथकाने मोठ्या प्रमाणात प्लास्टिक विरोधी कारवाई केली. सोलापूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून शहरातील व्यापारी व नागरिक यांना वेळोवेळी जाहीर आवाहन व प्रसिद्धीकरण देऊनही शहरात मोठ्या प्रमाणावर बंदी घालण्यात आलेल्या प्लास्टिकची विक्री व वापर होत आहे.

त्यामुळे महापालिका प्रशासनाने मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांच्या नियंत्रणाखाली आरोग्य निरीक्षकांच्या माध्यमातून ही मोहीम सुरु केली आहे. शनिवारी २८ डिसेंबर रोजी शहरातील १८३ दुकानांपैकी २८ दुकानदारांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. ३७.७ किलो प्लास्टिक जप्त केले आहे. एक लाख ४० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. शुक्रवार २७ डिसेंबर रोजी महापालिकेच्या पथकाने शहरात रेकॉर्ड ब्रेक कारवाई केली. १७ दुकानांवर कारवाई करत ९० हजार रुपये दंड वसूल केला आहे. अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी थेट बाजारपेठेत जाऊन पथकासह बेधडक ही कारवाई केली. चौपाड परिसरात असलेल्या जुन्या विठ्ठल मंदिर जवळील एका अपार्टमेंटमधील गोडाऊनवर ही धाड टाकण्यात आली होती. विविध कारवाईत या दिवशी सुमारे ७ हजार २९ किलो बंदी असलेले प्लास्टिक जप्त करण्यात आले. या मोहिमेत मुख्य सफाई अधिक्षक नागनाथ बिराजदार, मुख्य आरोग्य निरीक्षक नागनाथ मेंडगुळे, सुर्यकांत लोखंडे, बाबासाहेब इंगळे,आरोग्य निरीक्षक राजशेखर वनारोटे व त्यांची टीम आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कर्मचारी सहभागी होते.

### फौजदारी कारवाई केली जाणार : रवी पवार

शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी शासनाने बंदी घातलेल्या प्लास्टिकचा उत्पादन, वापर, विक्री, हाताळणी, वाहतूक व साठवणूक करू नये व वापरताना आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार दंडात्मक तसेच फौजदारी स्वरुपाची कारवाई केली जाईल, असा इशारा अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांनी दिला आहे.

# राज्य बालनाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी हुतात्मा येथे ६ जानेवारीपासून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने आयोजित २१ व्या राज्य बालनाट्य स्पर्धेची सोलापूर केंद्रावरील प्राथमिक फेरी येत्या सहा जानेवारीपासून हुतात्मा स्मृती मंदिर सोलापूर येथे रंगणार आहे.

प्राथमिक फेरीत विविध संस्थांकडून विविध विषयांवरची बालनाट्य पाहायला मिळणार आहेत.प्राथमिक फेरीला दिनांक ०६-०१-२०२५ जानेवारी रोजी सकाळी नऊ वाजता असा मी काय केला गुन्हा या बालनाट्याने सुरुवात होईल, त्याचबरोबर याच दिवशी गिफ्ट, दुष्काळ, बालवाडी, भोंदूगिरी, सुंदर गाव, मोबाईल, स्वच्छता करूया दारू दारी, या बालनाट्यांचे सादरीकरण होईल.

दिनांक ०७-०१-२०२५ रोजी सकाळी नऊ वाजता अभियान राबउया, वृद्धाश्रम, तो पोलीस होणार, सदाफुले रंगीत झाली, स्वप्न एका कळीचे, अति तिथे माती, जागर शेतकऱ्याचा, अ ब क ड ई, ही बालनाट्य होतील.

दिनांक ०८-०१-२०२४ रोजी निबंध, ह्यूमनॉईड,चांगभलं, चिंदी, बघा हो बघा, लाईट, चम चम चमको, ०९-०१-२०२४ रोजी गण्याचा देव मनाचा देव, जत्रा, बीज अंकुरले, जिर्णोद्धार, देव तारी त्याला कोण मारी, दुष्काळावर करूया मात, अभागीतारा, १० जानेवारी २५ रोजी सकाळी नऊ वाजता जोकर, लास्ट बेंच, व्हीसीआर, कर्तव्य, येडी बाभळ आणि झाले मोकळे आभाळ या बालनाट्याने स्पर्धेचा शेवट होईल.

सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा संपन्न होत आहे. सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे तसेच संचालक विभीषण चवरे यांनी सर्व बालनाट्यांतील कलाकारांना शुभेच्छा देत जास्तीत जास्त संख्येने प्रेक्षकांनी हजर रहावे असे आवाहन केलेले आहे. सोलापूर केंद्रावर स्पर्धा समन्वयक म्हणून रंगकर्मी अमोल धावळे काम पाहत आहेत.

## संक्षिप्त वृत्त



**कोल्हापूर : उच्च व तंत्रशिक्षण आणि संसदीय कार्यमंत्री म्हणून चंद्रकांत पाटील यांनी पदभार स्वीकारल्यानंतर प्रथमच कोल्हापूर येथील निवासस्थानी त्यांचे आगमन झाल्यानंतर सासू श्रीमती शुभदा खरे यांनी फुलांच्या पायघड्या व रांगोळी सजावट करत त्यांचे औक्षण केले. त्यांचा जीवनात कुटुंबाची साथ अत्यंत मोलाची ठरली आहे व तसेच आईरुपी असणाऱ्या सासूबाईंचा आशीर्वाद माझ्यासोबत असाच कायम रहावा, असा उल्लेख त्यांनी आवर्जुन केला.**



**सोलापूर : अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी शिवस्मारक येथे प्रयागराज उत्तर प्रदेश महाकुंभसाठी वाचनालयाला भेट दिली. गतिविधीमार्फत खूप छान उपक्रम राबवत असल्याबद्दल शुभेछाही दिल्या.**

### दिल्ली येथील पथसंचलनासाठी ओंकार कुंभार याची निवड

**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**



म्हेत्रे वस्ती येथील रहिवासी तर सध्या पुणे येथील मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स शिवाजीनगर पुणे येथे बी.कॉम पदवी शिकत असलेल्या ओंकार विजयकुमार कुंभार (ज्युनियर अंडर ऑफिसर) यांची एनसीसीकडून भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या दिल्ली येथील पथसंचलनासाठी एनसीसीच्या महाराष्ट्र डायरेक्टरेटकडून निवड झाली आहे.



### जि. प. ग्रामपंचायत कामगार युनियनच्या वतीने ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचा सत्कार

**सोलापूर, दि.३० डिसेंबर-**

आ.जयकुमार गोरे यांची राज्याच्या मंत्रीमंडळात ग्रामविकासमंत्री या पदावर वर्णी लागल्याने, महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत जिल्हा परिषद नगर परिषद कामगार युनियन सोलापूरच्या वतीने करण्यात आला. महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी कृती समितीच्या वतीने राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी, प्रलंबीत प्रश्न व मागण्या बाबतचे निवेदन ग्रामविकास मंत्री यांना देण्यात आले. दरम्यान, संपूर्ण राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे प्रश्न लवकरात लवकर निकाली काढू, गेल्या अनेक दिवसापासून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्रलंबित आहेत. याची मला जाण असून लवकरच आपण पदभार स्वीकारल्यानंतर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध व महत्त्वाचे प्रश्न मार्गी लावणार असल्याचे आश्वासन आ.गोरे यांनी यावेळी दिले. यावेळी युनियनचे अध्यक्ष मोहन लामकाने, प्रदेश सरचिटणीस दिलीप जाधव प्रसाद भोसले, बालाजी पवार, जनार्दन करपे, नितीन सावंत, श्री कृष्ण ढोले, अमोल मोरे, विशाल देशमुख, किसन सुळ, नाथा भगत, प्रशांत थोरात, गुणवंत लांडगे, आदींसह युनियनचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.



### वेळआमवस्या उत्साहात

**सोलापूर : दक्षिण सोलापूर तालुका परिसरातील सोरेगांव येथे सोमवारी श्रीशैल स्वामी यांच्या शेतात वेळआमवस्या सहकुटुंब साजरी करण्यात आली.**

# सोलापूर शहर-जिल्ह्यात भाजपा सदस्य नोंदणी मोहीमेला प्रतिसाद

## शहर-जिल्ह्यात १० हजाराच्यावर सदस्य नोंदणी

### भाजपा शहर सरचिटणीस पांडुरंग दिड्डी यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

भारतीय जनता पक्षाने संपूर्ण भारतात आपली राष्ट्रीय सदस्यत्व मोहीम सुरू केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीत 'संघटन पर्व सदस्यत्व अभियान-२०२४' नावाने २०२४ च्या राष्ट्रीय सदस्यत्व मोहिमेचे उद्घाटन केले आहे. पीएम मोदींनी पक्षाच्या टोल फ्री क्रमांकावर मिस कॉल देऊन सदस्यत्वाचे नूतनीकरण केले. त्या अनुषंगाने सोलापूर शहर आणि जिल्ह्यातही ही सदस्य नोंदणी सुरु केली असून, आजतागायत १० हजाराच्या वर सदस्यांची नोंदणी झाल्याची माहिती भाजपाचे शहर सरचिटणीस पांडुरंग दिड्डी यांनी दै. तरुण भारतशी संवाद साधताना आज (दि. ३०) दिली.

शहरातील प्रत्येक वार्डातील बुथनिहाय ही मोहीम सुरू केली असून, त्या-त्या भागातील माजी नगरसेवक, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सदस्य नोंदणीच्या कामाला लागले आहेत. यासाठी त्या-त्या मतदारसंघातील आमदारांना घेवून आम्ही सदस्य नोंदणीचे कार्यक्रमही राबवित आहोत. याच धर्तीवर जिल्ह्यातील भाजपा लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते-पदाधिकारीही काम करू लागले आहेत. या मोहिमेद्वारे सदस्यत्वाची सुविधा देण्यासाठी भाजपने ८८०००२०२४ हा मिस कॉल नंबर दिला आहे. लोक नमो ॲपद्वारे देखील पक्षामध्ये सामील होऊ शकतात.

यावेळी दिंड्डी पुढे म्हणाले की, भारतीय जनता पार्टी हा पक्ष केवळ जगातील सर्वात मोठा पक्ष नाही तर राजकीय पक्षांमध्येही अद्वितीय आहे. कोणताही राजकीय पक्ष लोकशाही पद्धतीने दर सहा वर्षांनी सदस्यत्व मोहीम राबवत नाही. कोविडच्या संकटामुळे, गेल्या वेळी मोहीम मर्यादित होती, परंतु ती आता २ सप्टेंबरपासून देशभरात दणक्यात सुरु झाली आहे. भाजपाचे १०० दशलक्षाहून अधिक नवीन सदस्यांची नोंदणी करण्याचे लक्ष्य आहे. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातून जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करण्याचा आमचा प्रयत्न राहील, अशीही माहिती शेवटी दिड्डी यांनी दिली.

# 'दीड मीटर'ने भूजलपातळी वाढली; सोलापूर जिल्हा यंदा 'दुष्काळमुक्त'!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

केंद्रपुरस्कृत 'जलशक्ती अभियानः कॅच द रेन' अंतर्गत विविध विभागाद्वारे करण्यात आलेल्या कामांचा आढावा नुकताच केंद्रीय पथकाने घेतला. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात सादरीकरणही करण्यात आले. यामध्ये यंदा जिल्ह्यातील पाणीपातळी सरासरी तब्बल दीड मीटरने वाढल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. इतकेच नाहीतर किमान यंदातरी सोलापूरकरांना दुष्काळाच्या झळा लागणार नाहीत, असा निष्कर्ष निघाला आहे.

जलशक्ती अभियानः कॅच दी रेन या अभियानाचा आढावा केंद्रीय नोडल अधिकारी राकेश कुमार मीना, केंद्रीय अधिकारी एकता धवण या दोन सदस्यांच्या पथकाने घेतला होता. यावेळी या केंद्रीय पथकाने जिल्ह्यातील जलशक्ती अभियानातील कामांबाबत समाधान व्यक्त केले. जिल्ह्यातील कामगिरी चांगली असल्याचे सांगून त्यांनी जिल्ह्यात काही उपाययोजना राबविण्यावर भर द्यावा, अशी सूचना केली. त्यात प्रामुख्याने पावसाच्या पाण्याचे जलपुनर्भरण, जलपुनर्भरणाच्या विविध उपायांचा अवलंब करणे, रिचार्ज शाफ्ट सारख्या उपाययोजना आणखी वाढवणे, भुजल अधिनियमाचे काटेकोर पालन करणे. तसेच सोलापूर महानगरपालिका मार्फत नारी शक्ती से जलशक्ती अभियान व शिक्षण विभागातील शाळांनी जलशक्ती अभियानाची जागरूकता विषय कार्यक्रम घेण्याच्या सुचना केल्या आहेत.



जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर दामा यांनी जिल्ह्यातील जलशक्ती अभियानांतर्गत नारीशक्ती ते जलशक्ती हे ब्रीद अंतर्गत जलसंधारणाची कामे, अमृत सरोवर योजना, रेन हार्वेस्टिंग, नाला खोलीकरण रुंदीकरण बंधारे या कामांची माहिती दिली. तसेच भूजल सर्वेक्षण यंत्रणा अधिकारी शेख यांनी या विभागामार्फत केलेल्या कामाचा आढावा दिल्यानंतर राकेश कुमार मीना यांनी मागील बैठकीनंतर पाच महिन्यात हे काम समाधानकारक असून, १.५ मीटर पाणी पातळी अवरेज वाढल्याचे समाधान व्यक्त केले. यावेळी जलसंचय जन भागीदारीचा आढावा घेवून अमृत सरोवर योजनेच्या कामावर विशेष भर द्यावा अशा सूचनाही जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना केल्या आहेत.

### तरीही पाण्याचा वापर काटकसरीनेच करावा

जिल्ह्यातील पाण्याची पातळी दीड मीटरने वर आली असली तरी पाण्याचा वापर वारेमाप करू नये. उजनी धरण भरले म्हणून जास्तीची आवर्तने सोडून चालणार नाही; शेतकऱ्यांनी कृषी विभागाने आवाहन केल्याप्रमाणे ऊस व इतर पिकांसाठी ठिबक, तुषार सिंचनचाच वापर करावा. एकंदरीत, सध्या जिल्ह्याची पाणीपातळी वरती असली तरी त्या पाण्याचा वारेमाप वापर केल्यास ती पाणीपातळी खोल जायला वेळ लागणार नाही. यामुळे जिल्ह्यातील तमाम नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीनेच करण्याची गरज आहे.

**- एम.जे. शेख, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा अधिकारी, सोलापूर**

# पोलिस असल्याचे सांगून जबरी चोरी करणाऱ्या ईराणी आरोपीस अटक

### शहर गुन्हे शाखेची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर -**

पोलिस असल्याचे सांगून वृध्द महिलेची फसवणुक करणाऱ्या ईराणी आरोपीस शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली. याप्रकरणी पोलिसांनी मिरजेतील सराफासह तिघांना अटक करून त्यांच्याकडून ४ लाख रुपये किंमतीच्या ७० ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या बांगड्या हस्तगत करण्यात आल्या आहेत.





कासिम युसूफ बेग (वय ३४, रा. प्लॉट नं. ४१, विष्णु कृपा नगर, शिवाजी नगर, पुणे-५), महमंद उर्फ जॉर्डन युसूफ ईराणी (वय ३०, रा. सह्याद्री नगर, खोजा कॉलनी, ईराणी वस्ती, विश्रामबाग, सांगली) आणि सराफ सुनिल वामनराव मानगावकर (वय ५५, रा. कुरणे गल्ली, ज्योतीबा मंदीराजवळ, नदी वेस, मिरज, सांगली) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

३० जुलै २०२४ रोजी जुळे सोलापुरातील संतोषी माता मंदीर जवळील एलआयसी ऑफीसच्या बोळात एका वृध्द महिलेस पोलिस असल्याचे सांगून चोरट्यांनी त्या महिलेकडील सोन्याच्या चार बांगड्या काढून घेऊन फसवणुक केली होती. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास करताना शहर गुन्हे शाखेचे पोलिसांना हा गुन्हा पोलिसांच्या रेकॉर्डवरील ईराणी गुन्हेगार कासिम बेग याने केल्याचे समजल्यानंतर पोलिसांना त्यास पुणे येथे सापळा लावून ताब्यात घेतले. बेग याच्याकडील चौकशीमध्ये त्याने हा गुन्हा महमद ईराणी याच्या मदतीने केल्याचे सांगितले. त्यामुळे पोलिसांनी ईराणी यास सांगली येथील छत्रपती शिवाजी महाराज भाजी मंडई भागात सापळा लावून ताब्यात घेतले. या दोघांकडे केलेल्या चौकशीत त्यांनी चोरलेल्या सोन्याच्या बांगड्या या सुनिल मानगांवकर या सराफाकडे विकल्याचे सांगितले.

त्यामुळे पोलिसांनी मानगांवकर सराफालादेखील या गुन्ह्यात आरोपीकडून अटक केली. या गुन्ह्यातील चोरीस गेलेला ४ लाख रुपये किंमतीचे सोन्याच्या बांगड्या पोलिसांनी हस्तगत केल्या आहेत. कासिम बेग याच्यावर महाराष्ट्र व इतर राज्यात मिळून ५ गुन्हे, मोहम्मद ईराणी याच्याविरुध्द १४ तर सुनिल मानगांवकर या सराफाविरुध्द १४ गुन्हे दाखल असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

तसेच पोलिसांनी सागर उपेंद्र येमुल (वय ३२, रा. कुचन नगर, सोलापूर सध्या रा. बोळकोटे नगर, पिठाच्या गिरणीमागे, एमआयडीसी, सोलापूर), अंबादास अंपय्या कर्रे (वय ३०, रा. करली नगर, जिव्हेश्वर मंदीराच्या पाठीमागे, बोळकोटे नगरजवळ, सोलापूर) यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून एमआयडीसी, फौजदार चावडी आणि जोडभावी पेठ पोलिस ठाण्यातील चोरीचे प्रत्येकी एक गुन्हा उघडकीस आणून ७२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अल्फाज शेख, सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रय काळे, पोलिस अमंलदार बापू साठे, भारत पाटील, सैपन सय्यद, वसीम शेख, सुभाष मुंढे, शांतीसागर जेनूरे, राजकुमार वाघमारे, अभिजित धायगुडे, शैलेश बुगड, विठ्ठल यलमार, सतिश काटे, अनिकेत खत्री, बाळासाहेब काळे, फरदीन शेख, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड, महिला पोलिस कर्मचारी निलोफर तांबोळी यांनी केली.



# शौचालयात साठवलेला गोवा बनावटीचा मद्य साठा जप्त

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर -**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने टाकळी सिकंदर (ता. मोहोळ) येथील एका घरामध्ये छापा टाकून शौचालयात साठविलेला ३ लाख ८५ हजार रुपये किंमतीचा गोवा बनावटीचा मद्य साठा जप्त केला.

या कारवाई आकाश धनंजय गवळी (वय २६, रा. टाकळी सिकंदर, ता. मोहोळ) आणि शहाजी पठाण गायकवाड (वय २२, रा. टाकळी सिकंदर, ता. मोहोळ) यास अटक करण्यात आली आहे. आणखी आरोपी फरार आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाला ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर टाकळी सिकंदर येथील एका घरामध्ये गोवा बनावटीच्या दारूच्या साठा करण्यात आल्याची माहिती मिळाली होती. त्यावरुन उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने टाकळी सिकंदर येथील आकाश गवळी याच्या घरामध्ये छापा मारला. त्यावेळी घरामध्ये गोवा बनावटीच्या मद्याचे बॉक्स मिळून आले. गवळी याच्याकडे करण्यात आलेल्या चौकशीत त्याने गायकवाड वस्ती येथील शहाजी गायकवाड यास गोवा बनावटीचे मद्य विकल्याचे सांगितले. त्यामुळे उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने गायकवाड वस्ती येथील शहाजी गायकवाड याच्या घरामध्ये छापा मारला. त्यावेळी घराशेजारील शौचालयामध्ये गोवा बनावटीच्या मद्याचे २५ बॉक्स मिळून आले. राज्य उत्पादन शुल्क विभागाने या दोन्ही ठिकाणाहून ७५ विदेशी मद्याचे बॉक्स व मोबाईल असा ३ लाख ८५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करून गवळी व गायकवाड यास अटक केली. ही कारवाई अधिक्षक भाग्यश्री जाधव, उपअधिक्षक एस.आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक जगन्नाथ पाटील, दुय्यम निरीक्षक धनाजी पोवार, रमेश कोलते, अंजली सरवदे, सज्जन चव्हाण, जवान चेतन व्हनगुंटी, अनिल पांढरे, शोएब बेगमपूरे, वसंत राठोड यांनी केली.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






## क्राईम वृत्त...

### गतिरोधकावर दुचाकी आदळून पडल्याने महिला जखमी

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर -**

अलकुंटे चौक ते अशोक चौकादरम्यानच्या गतिरोधकावर दुचाकी आदळल्याने दुचाकीवरील महिला खाली पडून जखमी झाली. हा प्रकार सोमवार सकाळी घडला. मिराबाई रमेश लच्छुवाले (वय ५१, रा. लोधी गल्ली) असे जखमी महिलेचे नाव आहे. यातील जखमी मिराबाई या सोमवारी सकाळी ११च्या समारास दुचाकीवर मागे बसून जात होत्या. अलकुंटे चौक ते अशोक चौक दरम्यान सिध्दार्थ चौकात गतिरोधकाजवळ अचानक दुचाकी चालकाने ब्रेक दाबले. यामुळे तोल जाऊन मिराबाई खाली पडल्याने डोक्याला जखमी होऊन त्या जखमी झाल्या. मुलगा निलेश याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

### व्यवहाराच्या कारणातून शिरवळ फाट्याजवळ तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील शिरवळ फाट्याजवळ थांबलेल्या तरुणाला व्यवहाराच्या कारणातून चौघांनी मारहाण केली. हा प्रकार रविवारी रात्रीच्या सुमारास घडला. शावरसिध्द यलप्पा गौडनुर (वय २८, रा. शिरवळ ता. द. सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. कलप्पा मुडदे व इतर आणि शावरसिध्द यांच्यात पैशाचा व्यवहार आहे. यातून शिरवळ फाट्याजवळ रविवारी रात्री ९ च्या सुमारास त्यांच्यात तक्रार झाली. यातून कलप्पा व इतरांनी शावरसिध्द यास लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात पायास खरचटले असून सर्वांगास मुक्कामार लागून जखमी झालेला शावरसिध्द हा बेशुध्द पडला असून त्यास आई निलाबाई यांनी सोमवारी दुपारी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### आजीने रागवल्याने नातीने प्राशन केले किटकनाशक

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर -**

आजीने रागावल्याच्या कारणातून नातीने किटकनाशक प्राशन केले. हा प्रकार उत्तर सोलापूर तालुक्यातील कळमण गावात सोमवारी दुपारी घडला. भाग्यश्री नागनाथ सावंत (वय १५) असे किटकनाशक प्राशन केलेल्या मुलीचे नाव आहे. कौटुंबिक कारणातून भाग्यश्री हिस तिची आजी रागावली. यामुळे संतापलेल्या भाग्यश्रीने पिकावर मारण्याचे औषध प्राशन केले. दरम्यान दुपारी मामा नानासाहेब मुरकुले यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कुकरचे झाकण उडून लागल्याने तरुणी जखमी

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर -**

घरात स्वयंपाक करताना कुकरचे झाकण उडून चेह-यास लागल्याने तरुणी जखमी झाली. हा प्रकार सोमवारी सकाळच्या सुमारास घडला. कैवल्या कृष्णात वाघमोडे (वय १९, रा. कोळेगाव ता. मोहोळ) असे तरुणीचे नाव आहे. केवल्या ही सोमवारी सकाळी घरात स्वयंपाक करत होती. त्यावेळी अचानक कुकरचे झाकण उडाले. ते झाकण चेह-याला व गळ्याला लागून भाजल्याने कैवल्या जखमी झाली. सकाळी दहा वाजता वडील कृष्णात यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### मंदिरात वाढदिवस करून चौघांनी केली तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर -**

भवानी पेठेतील निलकंठेश्वर मंदिरात वाढदिवस साजरा करून झाल्यानंतर किरकोळ कारणातून मंदिराच्या कट्ट्यावर बसलेल्या तरुणाला चौघांनी मारहाण केली. ही घटना २८ डिसेंबरच्या रात्री ९.३० वाजता घडली. ओमकार किरण मरगल (वय १९, रा. घोंगडे वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) असे माराहण झालेल्या तरुणाचे नाव आहे. घटनेच्या दिवशी रात्री ९.३० वाजता फिर्यादी भवानी पेठेतील निलकंठेश्वर मंदिराच्या ओट्यावर बसला होता. त्यावेळी मंदिरात वाढदिवस साजरा करून शेखर दुबय्या इराबत्ती, सागर मरगल, राहुल मरगल, श्रीनिवास मरगल (सर्व रा. जुना विडी घरकुल, सोलापूर) हे मंदिराबाहेर आले. त्यावेळी यातील आरोपी श्रीनिवास याने माझ्याकडे घुरून का बघितला अशी विचारणा फिर्यादीस केली. मात्र असा प्रकार केला नसल्याचे फिर्यादीने त्यास सांगत असतानाच, आरोपी राहुल याने कमरेचा बेल्ट काढून फिर्यादीस मारले. यात खाली पडल्याने डोक्याला खरचटून फिर्यादी जखमी झाला.या गन्ह्याची नोंद जोडभावी पोलीस ठाण्यात झाली असून तपास हवालदार खरात करत आहेत.

# विमानसेवा सुरु न झाल्याने तीव्र संताप!

## गाजर आंदोलन करून निषेध

## गड्डा यात्रा संपल्यावर प्रदीर्घ लढा

## सोलापूर विकास मंचचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

सोलापूरच्या होटगी रोड विमानतळावरून नागरी विमानसेवा सुरू व्हावी, या करीता सोलापूर विकास मंचच्या माध्यमातून सर्वसामान्य सोलापूरकरांनी चार वर्षांचा प्रदीर्घ लढा दिला. विमानसेवेतील प्रमुख अडथळे दूर करूनही दीड वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला आहे. विमानतळाचे नूतनीकरण होऊन चार महिने झाले असले, तरीही नागरी विमानसेवा सुरू झालेली नाही. दरम्यान, सोलापूरकरांची सातत्याने उपेक्षा करणाऱ्या सत्ताधाऱ्यांना धडा शिकवण्यासाठी, विमानसेवा सुरू न झाल्यास गड्डा यात्रा संपल्यानंतर प्रदीर्घ लढा उभारण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

२३ डिसेंबर २०२४ पासून होटगी रोड विमनतळावरून नियमित विमानसेवा सुरू होईल, असे खुद्द केंद्रीय नागरी उड्डयन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सोलापुरात येऊन पत्रकार परिषदेत जाहीर केले होते. परंतु प्रत्यक्षात २३ डिसेंबर रोजी विमानसेवा सुरू झाली नाही, हे वास्तव आहे. विमानसेवा सुरु न होण्यामागे हास्यास्पद कारणे दिली जात आहेत. त्यामुळे सोलापूर विकास मंचने शासन व प्रशासनाविरोधात पुन्हा एकदा यल्गार पुकारला आहे. याचाच पहिला भाग म्हणून ३० डिसेंबर २०२४ रोजी जिल्हा परिषदेच्या पुनम गेटसमोर एकदिवसीय आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात सोलापूरकरांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला. सत्ताधारी पक्षाच्या केंद्रीय पातळीवरील मंत्र्याने २३ डिसेंबर २०२४ पासून विमानसेवा सुरू होईल, अशी घोषणा केली आणि प्रत्यक्षात ती सुरू न झाल्याने, ही घोषणा म्हणजे विधानसभा निवडणुकीतील स्टंट होता का, असा संतप्त सवाल आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला. त्याचप्रमाणे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाबाबतही असेच प्रकार घडले आहेत.



### आंदोलनात या मान्यवरांची होती उपस्थिती

या आंदोलनात सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष डी. राम रेड्डी, इंजि. मिलिंद भोसले, केतन शहा, विजय जाधव, योगिन गुर्जर, सुहास भोसले, आनंद पाटील, दत्तात्रय अंबुरे, सुशील कुमार व्यास, इकबाल हुंडेकरी, नरेंद्र भोसले, हर्षल कोठारी, प्रसन्ना नाझरे, काशिनाथ भतगुणकी, अर्जुन रामगिर, सुभाष वैकुंटे, बिराजदार राजू, अशोक अहुजा, संजय वाकडे, गौरी अंबेकर, विनय वडगावकर, शुभदा पाटील, भरत पाटील, किसन रिकेबी, आरती अरगडे, अमृता अकलूजकर, नर्सिंग मेंगजी, शैलेंद्र क्षीरसागर, प्रशांत भोसले, कुंडल राकेश, घनश्याम डायमा, नागेश काकी, अमित कामतकर, श्रीकांत अंजुटगी, श्रीनिवास पोटाबत्ती, लक्ष्मीकांत दंडी, बाळासाहेब मोरे, सुनील दस्सल, शशिकांत बनसोडे, प्रभाकर कमटम, परवेज पिरजादे, रवींद्र कोळी, महेश चिंचोळे, राजकुमार राठोड, अब्दुल शेख, प्रभा सुरवसे, विजय सुरवसे, अनुराधा सुरवसे, शैला सुरवसे, सुमन सुरवसे, श्वेता सुरवसे, राखी सुरवसे, सुमन लोखंडे, युवराज सुरवसे, विनोद क्षीरसागर, सरताप काझी, नीलकंठ उंबरजगीकर, सतीश दारूकर, विनोद सिद्धम, मनोज कुमार तमिवार, शेखर बंगाळे, मोसिन शेख, संतोष कसे, बनसोडे कोहीरकर, रोहन झटकर यांचीही या आंदोलनात उपस्थिती होती.

२०१६ साली सोलापुरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय मंजूर झाले होते. मात्र, आठ वर्षे लोटूनही हे महाविद्यालय अस्तित्वात आलेले नाही. अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणोशेट्टी आणि आमदार प्रणितीताई शिंदे यांनी प्रयत्न करूनही यश मिळाले नाही. पुढील शैक्षणिक वर्षापासून हे महाविद्यालय सुरू करण्यासाठी सोलापूर विकास मंच मोठा लढा उभारणार आहे. याशिवाय, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष ललित गांधी यांनीही फोनद्वारे संपर्क साधून महाराष्ट्रातील सर्व व्यापारी सोलापूरकरांच्या या लढ्यात त्यांच्यासमवेत असल्याची ग्वाही दिली.

### लवकरच सकारात्मक कारवाई : सातव

आंदोलनादरम्यान सोलापूर विकास मंचचे सदस्य मिलिंद भोसले आणि विजय कुंदन जाधव यांनी केंद्रीय नागरी उड्डयन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे स्वीय सहायक विनोद सातव यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली. सोलापूरकरांचा तीव्र संताप मंत्री महोदयांपर्यंत पोहोचवण्यात आला. लवकरच सकारात्मक कार्यवाही होईल, असे आश्वासन देण्यात आले.

प्रभारी गटशिक्षणाधिकारी आरबाळे यांचा प्रताप

# गटविकासाधिकाऱ्याच्या मान्यतेशिवाय परस्पर १२ शिक्षकांच्या प्रतिनियुक्त्या केल्या रद्द

## चौकशीच्या फेऱ्यातून वाचण्यासाठी प्रभारी गटशिक्षणाधिकारी आरबाळे यांची अनोखी शक्कल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० डिसेंबर-**

पुणे विभागीय आयुक्तांच्या अधिकाराचा गैरवापर करत अक्कलकोट तालुक्यात २१ प्राथमिक शिक्षकांच्या नियमबाह्य प्रतिनियुक्त्या करत वादग्रस्त ठरलेले प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांचे दिवसेंदिवस नवीन कारनामे समोर येत आहेत.अश्यातच चौकशीच्या फेऱ्यातून वाचण्यासाठी गटविकासाधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय २१ पैकी १२ प्राथमिक शिक्षकांच्या नियमबाह्य प्रतिनियुक्त्या रद्द करून केलेल्या चुकांवर पांघरून घालण्याचाच प्रकार चौकशी समितीच्या सुनावणी दरम्यान उघडकीस आल्याची माहिती मागासवर्गीय संघटनेचे अध्यक्ष महांतेश्वर कट्टीमनी यांनी दिली.

सण २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाच्या संचमान्यतेनुसार अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन प्रक्रिया पूर्ण झालेली असतानाही २०२३-२४ ची संच मान्यता अंतिम न होताच नियमबाह्य पद्धतीने समायोजनाच्या नावाखाली २१ प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे



यांनी केल्या होत्या.याविरोधात मागासवर्गीय संघटनेने मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केलेली होती.या तक्रारीची गंभीर दखल घेत नियमबाह्य बदल्यांच्या चौकशीसाठी त्रिसदस्यीय चौकशी समिती शिक्षणाधिकारी योजना सुलभा वठारे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेली होती.

दरम्यान, चौकशी समितीच्या सुनावणीवेळी १२ प्राथमिक शिक्षकांच्या प्रतिनियुक्त्या गटविकासाधिकारी यांच्या मान्यतेशिवाय रद्द केल्याचा मुद्दा उपस्थित करून हा प्रकार गंभीर असल्याचे चौकशी समितीच्या निदर्शनास आणून दिले होते. केलेल्या चूका झाकण्यासाठी सातत्याने वादग्रस्त प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे नव्या शक्कला लढवत असून ग्रामपंचायत कार्यालय,शाळा व्यवस्थापन समिती यांच्याकडून लेखी घेण्यासाठी धावपळ करत असल्याची माहिती अध्यक्ष महांतेश्वर कट्टीमनी यांनी दिली.

# यात्रेआधीच पूर्वभागात अवतरले लहान नंदीध्वज

## नंदीध्वज बनवा.. जिंका बक्षीसे, या स्पर्धेत विद्यार्थ्यांची उत्स्फूर्तपणे सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० डिसेंबर-**

सोलापूरात दरवर्षी मकर संक्रांतीला ग्रामदैवत श्री सिध्देश्वर महाराजांचे यात्रा भरतो. यात्रेचे प्रमुख आकर्षण असलेल्या अक्षता सोहळा व नंदीध्वज पाहण्यासाठी विविध राज्यांमधून आणि विदेशातून सुद्धा भाविक भक्त आवर्जून येतात. लहान मुलांचे आकर्षण असणा-या नंदीध्वजाचे विषयाचे औचित्य साधून सोलापूरातील श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन, पद्मशाली सखी संघम व पद्मकमळ प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर शहर व जिल्ह्यातील ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी नंदीध्वज बनवा.. जिंका बक्षीसे... अशी अनोखा स्पर्धा आयोजित करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला. स्पर्धा संपल्यानंतर लगेचच निकालाची घोषणा करुन बक्षीसे देण्यात आले.

स्पर्धेच्या निमित्ताने सर्वधर्मसमभाव दिसून आले, या स्पर्धेत विविध



समाजांसह मुस्लीम समाजाचा विद्यार्थीही सहभागी झाला होता. अनेक विद्यार्थी आकर्षक दिसतील अशाचपध्दतीने नंदीध्वज बनवले होते.

यावेळी सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. स्पर्धेचे परिक्षक म्हणून सुरेश येमूल यांनी पाहिले. पद्मकमळ प्रतिष्ठानचे संस्थापक गोपीकृष्ण वड्डेपल्ली यांनी स्पर्धेसाठी बक्षीसे दिले असून फाउंडेशनचे संस्थापक गौरीशंकर कोंडा यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा घेण्यात आले. पद्मशाली सखी संघमचे अध्यक्षा मेघा इट्टम, उपाध्यक्षा कल्याणी पेनगोंडा, सचिवा पूजा चिप्पा, सल्लागार ममता मुदगुंडी, कल्पना अर्शनपल्ली, माजी सहसचिवा ममता तलकोकूल, कार्यकारिणी सदस्या वनिता सुरम, पल्लवी संगा, अॅड. मेघना मलपेद्दी, हेमा मैलारी, पद्मा मेडपल्ली, सोनाली तुम्मा, फाउंडेशनचे सल्लागार दयानंद कोंडाबत्तीनी, श्रीनिवास रच्चा, किशोर व्यंकटगिरी, श्रीनिवास पोटाबत्ती, वैकुंठम् जडल, सतीश चिटमील आदींचे स्पर्धा यशस्वीतेसाठी सहकार्य मिळाले.

**'बसवेश्वर'चा वल्लभ बोल्ली प्रथम**

विडी घरकुल येथील बसवेश्वर मराठी विद्यालयाचा पाचवीतला वल्लभ चंद्रगिरी बोल्ली याने प्रथम तर याच विद्यालयातील सातवीचा आसिद असफ शेख याने द्वितीय क्रमांक पटकाविला. तृतीय क्रमांकाचे पारितोषिक बसवेश्वर विद्यालयातील नवनीत अंबादास अमृतम याने मिळवला. उत्तेजनार्थ पारितोषिक म्हणून निलकंठेश्वर प्रशालेची सातवीची विद्यार्थिनी गौतमी गोपाल चिन्नी,ऑल इज वेल सामाजिक बहुउद्देशीय संस्था संचलित, स्पेड्क सेंटर सोलापूर या शाळेचा दिगंबर मधुकर मांतुवाद तर भू. म. पुल्ली कन्या प्रशालेतील सोनाक्षी लक्ष्मण मेरगू हिने पारितोषिक जिंकले.

# वेळआमावस्यानिमित्त मधला मारुती परिसरात फुलांचे दर तेजीत

## सुट्टी फुले आणि हारांच्या दरात झाली वाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० डिसेंबर-**

ग्रामीण भागातील प्रमुख आणि महत्त्वाचा मानला जाणारा सण वेळाआमावस्या सोलापूर ग्रामीण व जिल्ह्यात मोठ्या उत्साहात साजरा झाला. वेळा अमावस्या साठी लागणाऱ्या विविध साहित्यांची खरेदी करण्यासाठी शहरातील मधला मारुती बाजारपेठेत ग्राहकांची वर्दळ होती. सुट्टी फुले, हार, प्रासादिक साहित्य, अशा विविध साहित्यांची खरेदी केली. यावेळी परिसर गजबजून गेला होता. वेळा आमावस्या निमित्त सुट्ट्या फुलांचे दर तेजीत दिसून आले. तर हारांच्या किमतीत देखील दहा ते वीस टक्के वाढ झाल्याचे सांगण्यात आले.

शेतकरी आज वेळा अमावस्या निमित्त आपल्या शेताचे विधिवत पूजन करतो. ज्वारीचे धाटे लावून पाच पांडवांची पूजा संपन्न केली जाते. त्यांना पुरणपोळी, आंबील, बाजरीचे उंडे, शेंगाची पोळी असा गोडाधोडाचा नैवेद्य अर्पण केला जातो. पुष्पहार अर्पण करून काळ्या आईचे ऋण फेडले गेले.यासाठी लागणाऱ्या विविध साहित्याची खरेदी शेतकऱ्यांनी बाजारपेठेत केली.दरम्यान अमावस्या असल्याने ग्राहकांनी पोवळा लिंबू आणि मिरची यांची देखील खरेदी केली. घरावर लावण्यासाठी शुभ मानले जाते.



**सुट्या फुलांचे दर किलो याप्रमाणे**

| फुले | दर |
|---|---|
| पांढरी शेवंती | १०० रू. किलो |
| पिवळी शेवंती | ५० ते ८० रू. किलो |
| गुलाब | ६० रू. किलो |
| बटण गुलाब | ८० रू. किलो |
| झेंडू | ४० ते ५० रू. किलो |
| मोगरा | १०० रू. किलो |
| पोवळा | ५० ते १०० रू. नग |
| **मध्यम आकाराचे हार** | **१०० ते २०० रुपये** |
| **मोठा हार** | **३०० ते ५०० रुपये** |

त्यासाठी दर अमावस्याला ग्राहक याची खरेदी करतात असे विक्रेत्यांनी सांगितले.

# 'शेतशिवारं' माणसांनी फुलली तर गावे-शहरे दिवसभर ओस !

## शेता-शेतात झाले लक्ष्मीपूजन

## शेतकरी कुटुंबियांचे पै-पाहुण्यांसोबत वनभोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ डिसेंबर-**

सोलापूर जिल्ह्याचा काही भाग आणि मराठवाड्यातील तमाम शेतकरी बांधवांनी आज वेळा अमावस्या उत्साहात साजरी केली. या वेळा अमावस्येनिमित्त सोमवारी (दि. ३०) शेतशिवारात माणसांची मोठी गर्दी दिसून आली तर गावे-शहरे ओस पडल्याचेच दिसून आले.

वेळा अमावस्या हा बळीराजाचा मुख्य सण असतो. आजच्या दिवशी बळीराजाचं संपूर्ण कुटुंब शेतात असते. सोबतीला मित्र, नातलग



पै-पाहुणे वन भोजनाचा आनंद लुटायला येतात. ही वेळा अमावस्या लातूर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यातल्या काही भागात मोठ्या प्रमाणात साजरी होते. आज पहाटे ४ वाजेपासूनच शेतकऱ्यांच्या महिलांची वनभोजनाची तयारी दिसून आली. संपूर्ण तयारी करून सकाळी



### सोलापुरातील रस्ते दिवसभर पडले ओस

सोलापूर शहरातील असंख्य नागरिक पै-पाहुणे किंवा स्वत:च्या शेतावर आपल्या कुटुंबियांसमवेत वनभोजनासाठी गेल्याने आणि जिल्हा प्रशासनाकडून शासकीय सुटी असल्याने आज सोलापूर शहरातील रस्ते सकाळी १२ पासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत ओसच पडल्याचे दिसून आले. शहरातील नेहमी गजबजलेल्या मधला मारूती चौकातही दुपारी नागरिकांची अत्यंत कमी वर्दळ होती. तर सराफ बाजारातील जवळपास ९० टक्के दुकानेही दुपारच्या सुमारास बंदच दिसून आली. एकंदरीत, वेळा अमावस्येनिमित्त सर्व बाजारपेठा ओस पडल्याचे दिसून आले.

शेतात गेल्यानंतर महिलावर्गाने आणि बळीराजाने प्रथम शेतातील लक्ष्मी, म्हसोबा, विहिरींचेही पूजन करून श्रीफळ वाढविला. यानंतर ज्वारीच्या कडब्याच्या पेंड्या बांधून किंवा ज्वारीची ७ ताटे बांधून 'पांडव पूजन' केल्याचे दिसून आले. या पूजनानंतर सर्वजण मिळून वनभोजनाचा आस्वाद घेतात. यानंतर सायंकाळी ७ च्या सुमारास अनेक शेतकऱ्यांनी शेतात पिकविलेल्या ज्वारीच्या ताटांनी बांधलेली पाटी डोक्यावर आणली आणि चाऊर चाऊर ऽऽ चांगभलं, शिवा पार्वते हरऽऽ हर महादेव असा जय घोष करीत ही पाटी ग्रामदेवतेच्या मंदिरात आणली. यानंतर ही पाटी घरी घेवून जावून गृहलक्ष्मीकडून तिचे यथोचित पूजन केले. अशी ही परंपरा वर्षानुवर्षे शेतकरी बांधव चालवित आहेत. आज वेळा अमावस्येनिमित्त शेताच्या काळ्या आईची पूजा केली जाते.

# रत्नकुमार म्हेत्रे उद्योगरत्न पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

सोनार समाज बांधवच्यावतीने विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा सामाजिक बांधिलकी पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यामध्ये रत्नकुमार म्हेत्रे यांना उद्योगरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्काराचे वितरण विजापूर रोड येथील निर्मिती लॉन्स येथे



करण्यात आले. यावेळी मोहन मंद्रुपकर, उमेश कुरुलकर, संजय मैंदर्गीकर, संतोष कळमणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कोषाध्यक्ष गजानन सोनार, विश्वस्त पदमकुमार दिक्षीत, सहसचिव गिरीश जमखंडीकर, विश्वस्त अविनाश पंडीत, सचिव दत्तगुरु वेदपाठ, सतिश पोतदार, उपाध्यक्ष विजयकुमार पोतदार, अमोल महामुनी, अध्यक्ष वसंत पोतदार, निलेश धाराशिवकर उपस्थित होते.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९९०

**जैसें क्षेत्रीं जे पेरिजे । तेवांचूनि आन न निपजे ।**
**कां पाहिजे तेंचि देखिजे । चहू वर्णी ।।**

भक्ति व प्रेमाचे महत्व भगवंत अर्जुनाला सांगत आहेत. निष्काम आणि सकाम असे भक्तिचे दोन प्रमुख प्रकार येथे विचारात घेतले आहेत. जो माझी भक्ति करतो, त्याची मी ही भक्ति करतो असे भगवंत सांगत आहेत. केवळ भक्तांनीच माझी भक्ति करावी असे नाही तर, मी ही त्यांची भक्ती करतो, म्हणजे प्रेम करणा-यावर मी ही प्रेम करतो असे भगवंत म्हणत आहेत. आपण मुक्या प्राण्यावर प्रेम केले तर मुका प्राणीही आपल्यावर प्रेम करतो हे आपण दैनंदिन जीवनात पाहतो. आपण तर चालती-बोलती माणसं आहोत. आपण दुस-यावर प्रेम केले, तर तोही आपल्यावर प्रेम करील. प्रेमाच्या देवाण-घेवाणीने राग, द्वेष, मत्सर, क्रोध, ईर्षा आपोआप नष्ट होत असतात. म्हणून भगवंताप्रमाणे आपणही भक्तिला, प्रेमाला महत्व दिले पाहिजे. भगवंत सांगतात, जे जशा प्रकारची भक्ति करतात, तसे त्यांना भक्तिरुपी फल मिळते सकाम किंवा फळाची अपेक्षा ठेवून भक्ति करण्यामुळे मी अभिन्न असतानाही माझ्यात लोक भिन्नता निर्माण करतात. नामहिन आत्म तत्वाला नांव देऊन, प्रतिमा स्वरुप नसलेल्या ब्रम्हाला देव-देवी म्हणतात आणि त्यांची लोक आराधना करतात. सर्वत्र सदासम असणा-या चैतन्याला लोक भिन्न मानतात.



वेगवेगळया देव-देवतांची पूजा करुन कामना करणां-यांना त्यांच्या फलाची प्राप्ती होते. ती प्राप्ती त्यांनी केलेल्या कर्माचे, कष्टाचे फळ असते. कर्मावाचून फल देणारे आणि कर्मकर्त्यावाचून फल घेणारे दुसरे कोणतेही योग्य कारण कर्मप्रकरणात नसते. अर्थात, कर्म (कर्तव्य) असेल तरच फल आणि कर्मच नाही तर फलाचा प्रश्नच नाही. जसे कर्म तसे फल हे सांगतांना भगवंत म्हणतात, आपण शेतात जे पेरणी करु, जे बीज घालू तेच उगवेल. आरशात जे रुप, वस्तु पाहू तेच आपणाला पाहायला मिळेल. डोंगराच्या तळाशी जे बोलू तसाच प्रतिध्वनी ऐकायला मिळेल. तसेच जसे आपले कर्म, कर्तव्य, उपासना असले तसेच फल मिळेल. भगवंतानी येथे अर्जुनाला माध्यम करुन चांगला संदेश दिला आहे. कष्टच नाही, तर फल मिळण्याचा प्रश्नच येत नाही. कर्म, कर्तव्य ही करावीच लागतात, त्याशिवाय फल प्राप्ती मिळणे शक्य नाही. जैसा कर्म करेगा, वैसा फल देगा भगवान, ये है गीता का ज्ञान. हे गीत आपण ऐकले असेल. हे गीत आपणाला श्रीकृष्ण भगवंतांचा संदेश देऊन जाते. कष्टाला, कर्माला पर्यायच नाही हे येथे आपण ध्यानात घेतले पाहिजे. देरे देवा पलंगावरी म्हणून चालणार नाही. कष्ट केले तर या कष्टाच्या प्रमाणात फल प्राप्ती आपोआप होत असते. आधी कष्ट, मग फल, असाध्य ते साध्य । करिता सायास । कारण अभ्यास । तुका म्हणे ।। केल्याने होत आहे । ते आधि केलेचि पाहिजे ।। अशा प्रकारच्या संतोक्त्या आपणाला कर्माची/कर्तव्याची महती सांगून जातात. कष्ठच करायचे नाहीत आणि फलाची अपेक्षा करायची म्हणजे निव्वळ मुर्खपणा होतो. आपल्या वाटयाला जे काही कर्म आले असेल ते कर्म आपण निष्ठापूर्वक, मन:पुर्वक केले पाहिजे. लहान आणि मोठे कर्म असा भेद न करता, कर्म हे कर्मच आहे, याची जाण ठेवून आपण करावे. केलेले कर्म, कष्ठ वाया जात नसतात म्हणून कर्म करण्यात कुचराई होणार नाही याकडे लक्ष असू द्यावे. कर्तव्यातूनच आपल्या जीवनातील आनंदलहरी वाढत असतात, हे ही याप्रसंगी लक्षात असू दयावे.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. ३१ डिसेंबर २०२४ | सुर्यनारायण मंदिर किरणोत्सव |
| विक्रम संवत् २०८०-८१ | अंबिका यात्रा नाईचाकूर |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. प्रतिपदा - (२७.२१) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पूर्वाषाढा (२४.०३) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - ध्रुव (१८.५८) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - किंस्तुघ्न (१५.४२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** मुलांच्या बाबतीत कठोर निर्णय घ्यावे लागतील. अपेक्षित मित्रांची मदत मिळेल. भावनेपेक्षा कर्तव्य महत्त्वाचे ठरेल. प्रवासाचा योग संभवतो.

**वृषभ :** आपल्या भोळ्या स्वभावाचा इतर गैरफायदा तर घेत नाही ना याकडे लक्ष द्या. जास्त ताण घेऊ नका. अभ्यासाचा बाऊ न न करता विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा.

**मिथुन :** मनाचा दाखविलेला मोठेपणा नातेसंबंधातील तेढ कमी करणारा ठरेल. विचार बदलतील. एखादा कार्यक्रम होण्याची शक्यता आहे.

**कर्क :** एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य. घरामध्ये पूर्वी ठरलेला शुभ समारंभ पार पडेल.

**सिंह :** मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे. हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य.

**कन्या :** आपल्या लहानसहान इच्छा:आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल.

**तुळ :** एकाच वेळी नोकरी आणि घर या दोन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे लागल्याने तुमच्यावर एकप्रकारचा दबाव येईल. नोकरीत बडती मिळण्याची शक्यता.

**वृश्चिक :** धंदा व्यवसायात कामाचा व्याप वाढेल. घरामध्ये छोट्या समारंभाच्या निमित्ताने प्रियजनांची गाठभेट होईल.

**धनु :** कोणताही टोकाचा विचार किंवा अतिरेकी कृती आपल्याच पायावर दगड पाडून घेणारी ठरेल. सद्गुरुची आराधनाने मन शांत होईल.

**मकर :** संततीच्या दृष्टीने येणाऱ्या शुभवार्ता अभिमानास्पद ठरतील. मात्र, त्यांचे आरोग्याचे प्रश्नाबाबत वेळीच लक्ष द्या.

**कुंभ :** इतरांना न जमणारी कामे तुम्ही यशस्वीरीत्या हाताळाल. त्यामुळे वरिष्ठांची आपल्यावर मर्जी राहील.

**मीन :** एकत्रित होणाऱ्या सहली आनंददायक ठरतील. मुलांच्या हट्टापायी चैनीच्या वस्तूसाठी खर्च करावा लागेल. जीवनात यशस्वी व्हाल.

# उळेगावच्या 'त्या' पुलाची येत्या ६ महिन्यात नव्याने उभारणी

## दिल्लीतील वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविला प्रस्ताव





### महामार्ग प्रकल्प संचालक जावडे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

गेल्या अनेक वर्षांपासून अपघाताची मालिका सुरू असलेल्या दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळेगावच्या पुलावर ऑक्टोंबर २०२४ मध्ये ट्रकचा बर्निंग थरार झाल्यानंतर या महामार्गाचे प्रकल्प संचालकांनी आता चांगलेच मनावर घेवून त्या पुलाची नव्याने उभारणी करण्याचा (मोठे करण्याचा) प्रस्ताव दिल्ली येथील त्यांच्या वरिष्ठ अधिकार्यांकडे पाठविला असून, त्यांचे आदेश येताच या पुलाची येत्या ६ महिन्यात नव्याने उभारणी करण्यात येईल, अशी माहिती सोलापूर-येडशी महामार्गाचे प्रकल्प संचालक राकेश जावडे यांनी दै. तरूण भारतशी संवाद साधताना दिली.

सोलापूर-धुळे महामार्गाची निर्मिती करताना उळेगावचा छोटा पुल नवीन असल्याने तेव्हा पाडला गेलाच नव्हता. हा लहान पुल असल्याने या ठिकाणी २ वाहने एकदम फास्ट आली तर बसत नाहीत. यामुळे एकतर ती वाहने एकमेकांवर आदळतात किंवा एक वाहन या पुलाच्या कठड्याला जोरात धडकते आणि अपघात होतो. येथील पुलावर गेल्या ३ ते ४ वर्षांपासून अशीच अपघाताची मालिका सुरू आहे. गेल्या एक-दोन महिन्याखाली अशीच एक मोठी ट्रक वेगाने येवून कठड्यावर अडकली आणि त्यामुळे गाडीला आग लागून आतील मालाचीही जळून राखरांगोळी झाली होती. इतकी मोठी हानी झाल्यानंतर सोलापूर येथील राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून त्या पुलाच्या अवती-भोवती अपघाताचे डेंजर झोन निर्माण करण्यासाठी प्लॅस्टिकची बॅरेकेटर्स दूरपर्यंत लावली आहेत, सिग्नल लावले आहेत. इतकेच कायतर महामार्गाच्या बाजूला काही वाळूची पोती भरून टाकली आहेत.

हा तात्पुरता पर्याय किती दिवस चालणार? अशी विचारणा प्रकल्प संचालक जावडे यांना केल्यावर त्यांनी सांगितले की, या अपघात प्रवण पुलावरून सुरळीत वाहतूक करण्यासाठी कायमचा तोडगा काढण्यासाठी आमच्या दिल्ली येथील वरिष्ठ कार्यालयाकडे पत्रव्यवहार केला आहे. त्यांचे आदेश येताच येत्या ६ महिन्यात या पुलाची नव्याने उभारणी करून वाहनधारकांसाठी सुरळीत वाहतूक करून देणार असल्याचे शेवटी सांगितले.



## कारंबा येथील ४० शेतकऱ्याचे मुरघास बॅग व खनिज मिश्रण खरेदीसाठी अनुदानासाठी प्रस्ताव

**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

वश्वकर्मा सोशल फाउंडेशन कारंबा तालुका उत्तर सोलापूर यांच्यावतीने कारंबा येथील ४० शेतकऱ्याचे मुरघास बॅग व खनिज मिश्रण खरेदीसाठी अनुदानासाठी प्रस्ताव ग्रामपंचायत सदस्य विनायक सुतार यांनी दाखल केले.

पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद सोलापूर यांच्यावतीने ज्या शेतकऱ्यांकडे पशुधन व दुधाळ पशुधन असणाऱ्या अशा शेतकऱ्यांना जिल्हा परिषदेच्या शेष फंडातून पशुसंवर्धन विभागाच्या वतीने मुरघास बॅग व खनिज मिश्रणासाठी शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येते. त्यासाठी कारंबा गावातील या शेतकऱ्यांचे प्रस्ताव उत्तर सोलापूर पंचायत समिती पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रशांत देशमुख डॉ. सुदेश अभिवंत डॉक्टर जाधव यांच्याकडे देण्यात आले यामुळे पशुधन व दुधाळ पशुधन असणाऱ्या शेतकऱ्यांना अनुदान मिळाल्यास त्या शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल




## एरियामध्ये अव्वल ठरला भावसार व्हिजन सेंट्रल क्लब

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

कंचिपूरम तामिळनाडू येथे झालेल्या भावसार व्हिजन च्या १९ व्या राष्ट्रीय अधिवेशन मध्ये भावसार व्हिजन सोलापूर सेंट्रलचे अध्यक्ष लक्ष्मीकांत मुसळे यांना राष्ट्रीय पातळीवरील सर्वोकृष्ठ अध्यक्ष 'किताब पटकावीला तर एरिया मधील सर्वोत्तम क्लब चा अवॉर्ड सहित इतर ७ अवॉर्ड भावसार व्हिजन सोलापूर सेंट्रल मिळविले

तसेच या अधिवेशन मध्ये सोलापूर सेंट्रल चे जेष्ठ सदस्य अश्विन डोईजोडे यांची नॅशनल डायरेक्टर या पदावर नियुक्ती करण्यात आली तर श्रीकांत रांगदाळ यांची एरिया गव्हर्नर या पदावर नियुक्ती करण्यात आली.

भावसार व्हिजन सोलापूर सेंट्रल ने गेल्या वर्षभरातील कामाची पोच पावती म्हणून जवळपास ९ अवॉर्ड देऊन क्लब ला सन्मानीत करण्यात आले. क्लबने केलेल्या वधू-वर मेळाव्यास बेस्ट प्रोजेक्टचा राष्ट्रीय प्रोजेक्ट अवॉर्ड ने सन्मानित करण्यात आला.

तसेच माधव वळसे यांना बेस्ट सचिव, किरण रणसुभे, सागर पुकाळे, प्रभाकर जवळकर, ज्योती क्षीरसागर यांना बेस्ट डायरेक्टरचे अवॉर्ड प्रदान करण्यात आले. यावेळी क्लबचे जेष्ठ सदस्य सुहास क्षीरसागर, दिपक आकुडे, हर्षद क्षीरसागर, किरणकुमार मुसळे आदी या अधिवेशनमध्ये उपस्थित होते.



## तीर्थ येथे वेळअमावस्येनिमित्त लक्ष्मी पूजन, पांडव पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

श्रीक्षेत्र तीर्थ (ता. द. सोलापूर) वेळा अमावस्या निमित्त विशेषतः दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यातील शेतकरी कुटुंबातील सर्वजण व पाहुण्या मंडळीसहित शेतावर जाऊन शेतातील लक्ष्मी पूजन व पांडव पूजन करतात. ज्वारीची पाच धाटे एकत्रित बांधून खाली पाच दगड ठेऊन हळद-कुंकू लावून नैवेद्य दाखवून नारळ वाढवतात.

तीर्थ येथील प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांच्या शेतात लक्ष्मी व पांडव पूजन करताना शारदादेवी बिराजदार, तन्वी, घोडके, प्रा.डॉ भीमाशंकर बिराजदार, नागनाथ शेळगे, समर्थ पाटील, अभय शेळगे, शिवा घोडके, शिवराज बिराजदार उपस्थित होते.

## 'कॉंशियसनेस' लघुपट आज होणार प्रसारित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

सध्याच्या आधुनिक जीवनशैलीच्या युगात छोट्या छोट्या कारणावरून नैराश्याने ग्रासणाऱ्या युवा पिढीला सकारात्मक राहण्याचा संदेश देणारी हिंदी व तेलुगू भाषेतील 'कॉंशियसनेस' हा लघुपट (शॉर्ट फिल्म) मंगळवार दि. ३१ डिसेंबर रोजी यूट्यूबवर प्रसारित होणार आहे, अशी माहिती निर्माता व दिग्दर्शक रविराज वंगारी यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

वात्सल्य प्रोडक्शन्स या बॅनरखाली या शॉर्ट फिल्म ची निर्मिती करण्यात आली आहे. आयटी क्षेत्रातील कार्यरत असलेल्या सोलापूरच्या रविराज वंगारी यांनी या शॉर्टफिल्मची निर्मिती, दिग्दर्शन, कथा-पटकथा-संवादलेखन करण्याबरोबर त्यामध्ये अभिनयदेखील केला आहे. पुणेस्थित आयटीमध्ये कार्यरत रोहित गुरली, शिरीषा कामटे, प्रभू नायर तसेच रिया स्वाईन आदींच्या यामध्ये भूमिका आहेत. संगीत जोईल क्रिएटिव्ह वर्क्स यांनी दिले असून प्रवीण टमटम हे संकलक आहेत. कॅमेरामन अनिल पोरंडला श्रीकांत तुम्मा हे आहेत. या पत्रकार परिषदेस दिगंबर बंडी उपस्थित होते.

## दीड हजार तरुणांना प्रशिक्षण

### 'सारथी' मार्फत कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ३० डिसेंबर-**

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या वतीने (सारथी) सरदार सूर्याजी काकडे सारथी वाहनचालक कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी समाजातील १ हजार ५०० तरुणांना वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

प्रशिक्षित वाहनचालकांची देशात व देशाबाहेर दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात मागणी आहे. त्यानुसार संस्थेने १५०० व्यक्तींना दर वर्षी हलकी मोटार वाहने (लाइट मोटर व्हेइकल) व जड मालवाहू वाहने (हेवी ट्रान्सपोर्ट व्हेइकल) चालविण्याचे कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या तरुण-तरुणींना केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या रस्ता सुरक्षा उपक्रमांतर्गत असलेल्या आयडीटीआर पुणे या केंद्र शासनाच्या संस्थेमार्फत एका महिन्याचे प्रशिक्षण विनामूल्य देण्यात येईल. दररोज आठ तासांचे हे प्रशिक्षण राहील. त्यामध्ये वाहनांचे भाग, त्यांची देखभाल, दुरुस्ती, तसेच वाहनचालनाच्या भारतातील व परदेशातील नियमांची माहिती देण्यात येईल. याशिवाय दररोज क्षेत्रीय स्तरावर सराव व प्रशिक्षण देण्यात येईल. या विद्यार्थ्यांना एका प्रशिक्षण महिन्यासाठी रुपये १० हजार रुपये विद्यावेतन देण्यात येईल. हे प्रशिक्षण छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या दिवशी १९ फेब्रुवारी २०२५ पासून सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, राज्यातील ग्रामीण भागात, तसेच परदेशात तरुणांना रोजगाराची संधी निर्माण होणार आहे. यासाठी जास्तीत जास्त उमेदवारांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे यांनी केले आहे.

## इंडियन दलित सेनेच्या वर्धापन दिनानिमित्त मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

इंडियन दलित सेना सेनेच्या आठव्या वर्धापन दिन आणि विजय क्रांती स्तंभ भीमा कोरेगावच्या २०७व्या वर्धापन दिनानिमित्त सोलापुरात बुधवार दि. १ जानेवारी २०२५ रोजी दुपारी २ वाजता कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष देविदास दुपारगुडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

रंगभवन चौक येथील समाज कल्याण केंद्रात हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. माजी आ. प्रकाश यलगुलवार यांच्या हस्ते या मेळाव्याचे उद्घाटन होणार आहे. याप्रसंगी प्रमुख वक्ते डॉ. संघप्रकाश दुड्डे यांचे संघटनेसाठी कार्यकर्त्यांचे योगदान या विषयावर आणि डॉ. अंजना गायकवाड यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जातीय अंताचा लढा व सध्याच्या जातीचे संघटन या विषयावर व्याख्यान होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षा विद्या लोलगे, कामगार नेते कुमार करजगी, माजी महापौर संजय हेमगड्डी, समता सैनिक दलाच्या अध्यक्षा वैशाली उबाळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यास कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन देविदास दुपारगुडे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस डॉ. किरण खरात, डॉ. सुजय गायकवाड, राम माने, सुहास बिराजदार आदी उपस्थित होते.



## नाट्य स्पर्धेत पानगल प्रशाला प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

बज्मे गालीब सोलापूर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या अंताशालेय उर्दू नाटय स्पर्धेत एम. ए. पानगल उर्दू शाळा डॉ. हारून बागबान लिखित व महेमुद खतीब दिग्दर्शित तीन सवाल यांनी प्रथम क्रमांक पटकाविले. तर बिडी घर सोशल उर्दू हायस्कूलच्या वतीने इरफान फरीद लालकोट दिग्दर्शित बडीबी सुब्हान अल्लाह द्वितीय क्रमांक मिळविले आणि मजरेवाडी येथील शमा उर्दू प्राथमिक शाळा स्व नसीम मन्नान सोलापूरी लिखित शाहीन सदफ व अबरार नल्लामंदू दिग्दर्शीत मनहूस कदमने तृतीय क्रमांक मिळविले.

विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते अ गनी हिप्परगी ट्राफी, मंजूर आलम शेख ट्राफी व शमीम बानो ट्राफी देऊन सन्मानित करण्यात आले. हुतात्मा स्मृती मंदिर येथे सादर झालेल्या या नाटय स्पर्धेचे साय ७ वाजता बज्मे गालीबचे अध्यक्ष प्रा. बशीर परवाज यांच्या अध्यक्षतेखाली व उर्दू अदबी साहित्य मंडळाचे अध्यक्ष व माजी महापौर ॲड. यु. एन. बेरीया यांच्या हस्ते पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. यावेळी मंचावर ज्येष्ठ रंगकर्मी प्रा. बी. एच. करजगीकर, शफी कैप्टन, राजा बागबान, सुमीत फुलमामडी, आसीफ इक्बाल, एजाज मंजूर आलम, जुबेर हिप्परगी आदी उपस्थित होते. नाट्य स्पर्धा संयोजक समितीचे शफी कॅप्टन नासर आळंदकर, शऊर अहमद, हुसेन बक्षी, युसूफ आलम सिद्दीकी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार अन्वर कमिशनर यांनी केले.

## ईपीएस ९५ निवृत्त कर्मचारी समन्वय संस्थेचा बुधवारी मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

ईपीएस ९५ निवृत्त कर्मचारी समन्वय व लोककल्याण संस्थेच्या वतीने बुधवार दि. १ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता सोलापुरातील छत्रपती शिवाजी हायस्कूल येथे पेन्शनधारकांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती शहराध्यक्ष शशिकांत भुसारे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या मेळाव्यात संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोक राऊत, महासचिव राजावत सिंग, प्रदेशाध्यक्ष पोखरकर आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.

केंद्रीय कामगार मंत्री मांडविया यांच्यासोबत झालेल्या चर्चेतील ईपीएस ९५ पेन्शन आणि सद्यस्थिती यासंदर्भात ही यावेळी मार्गदर्शन होणार आहे. विविध १६८ खाजगी क्षेत्रातील कंपन्या व इतर संस्थांमध्ये कार्यरत असलेल्या निवृत्त कर्मचाऱ्यांना सध्या ८०० ते २५०० रुपये पेन्शन मिळते.

ही पेन्शन वाढवून ७ हजार ५०० रुपये करावी. महागाई भत्ता, मोफत आरोग्य सुविधा याही नियमित महागाई प्रमाणे देण्यात याव्यात, अशी संघटनेची मागणी आहे. सोलापूर जिल्ह्यात १ लाख ३४ हजार पेन्शनधारक आहेत तर देशभरात ३८ लाख पेन्शन धारक आहेत. या मेळाव्यास पेन्शनधारकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन यावेळी महिला आघाडी सचिव नीता ठाणेदार यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस रमण केदार, राजेंद्र खराडे, राजेश राऊळ, शिवाजी शिंदे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### कलाशिक्षक अण्णाराव खंडागळे यांचा गौरव

**माढा, दि. ३० डिसेंबर-**
माढा येथील कलाशिक्षक लिटिल मास्टर इंग्लिश मीडियम स्कूल, शेटफळ. येथे कार्यरत असणारे अण्णाराव नागनाथ खंडागळे यांचा डॉ राजकुमार आडकर आणि परिवाराच्यावतीने आयोजित गुरुजनांचा कृतज्ञता सन्मान आणि डॉ. सुयश आणि डॉ. सृष्टी यांच्या कौतुक सोहळ्याच्या प्रसंगी आमदार अभिजीतआबा पाटील यांच्या शुभहस्ते मानाचा फेटा, स्नेहाची शाल, पुष्पगुच्छ, मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. कलाशिक्षक अण्णाराव खंडागळे यांना शिक्षण क्षेत्रातील बारा वर्षाच्या अनुभव असून त्यांच्या हातून अनेक विद्यार्थी घडले आहेत. शैक्षणिक व कलाक्षेत्रात त्यांचे उल्लेखनीय कार्य आहे. त्यांना अनेक जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. म्हणूनच त्यांचा सन्मान आडकर परिवाराच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी त्यांचे अभिनंदन माढ्याच्या नगराध्यक्षा मीनलताई साठे, संजयबाबा कोकाटे, भारत शिंदे उपनगराध्यक्षा कल्पनाताई जगदाळे, डॉ. राजकुमार आडकर, डॉ. अनिता आडकर, ॲड. रत्नप्रभाच जगदाळे, प्राचार्या फराह शेख, चेतन कोरके, रवी वसेकर, नामदेव खारे, जयकुमार शिंदे, विद्या महाडिक व शैक्षणिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.




### मोडनिंब येथे उदयकीर्ती अर्बन बँकेच्या दिनदर्शिकेचे उत्साहात प्रकाशन

**मोडनिंब, दि. ३० डिसेंबर-**
मोडनिंब येथे उदयकीर्ती अर्बन बँकच्या दिनदर्शिकेचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला.छोट्या उद्योगांना कर्ज देणे व त्यांना मदत करणे उभारी देणे हा उदयकीर्ती मल्टीस्टेटचा मुख्य हेतू आहे, असे उदयकीर्ती मल्टीस्टेट चेअरमन उदय माने यांनी सांगितले.मोडनिंब (ता. माढा) येथे उदयकीर्ती दिनदर्शिकेच्या लोकार्पण सोहळा प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जि. प अध्यक्षा निशिगंधा कोल्हे होत्या.चेअरमन माने, शाखाप्रमुख काळे यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी तालुकाप्रमुख वैभव मोरे,तालुकाध्यक्ष समाधान दास,गणेश इंगळे,विष्णू भालेराव,गणेश नलवडे,राहुल सावंत,संजय सुर्वे,सूर्यकांत कांबळे, नागनाथ माळी, शाखाप्रमुख साईप्रसाद काळे,संतोष कोळेकर, अनिल वागज,भक्ती पवार, उज्वल माने, प्रसाद भणगे यासह ग्रामस्थ तसेच व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रास्ताविक माने यांनी तर सूत्रसंचालन आणि आभार काळे यांनी केले.



### विजयपूर बंदला चांगला प्रतिसाद

**विजयपूर, दि. ३० डिसेंबर-**
राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्याबाबत अपमानास्पद वक्तव्य करणाऱ्या केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दलित संघटना, विविध प्रगतीपर गट अहिंद संघटनेच्या वतीने पुकारलेल्या विजयपूर बंदच्या आवाहनाला सोमवारी चांगला प्रतिसाद मिळाला. मध्यवर्ती बसस्थानकाजवळील खासगी बसेसवर आणि अथणी रोडवरील गोदावरी हॉटेलजवळ केएसआरटीसी बसेसवर किरकोळ दगडफेकेची अनुचित घटना वगळता बंद शांततेत पार पडला. सकाळपासून बस वाहतूक बंद होती. त्यामुळे शहरातील मध्यवर्ती बसस्थानक व सॅटेलाइट बसस्थानक बसेस व प्रवाशांविना शुकशुकाट जाणवत होता. सकाळी १० वाजेपर्यंत शहरात मोजकेच वाहन फिरत होते. नंतर वाहनांची वाहतूकही ठप्प झाली. अमावस्येमुळे इतर शहरातील मंदिरात जाणाऱ्यांना बस आणि खासगी वाहनांविना त्रास सहन करावा लागला. याचप्रसंगी अहिंदाचे नेते सोमनाथ कळ्ळीमणी, चंद्रशेखर कोडबगी, एम. सी. मुल्ला आदींची भाषणे झाली. बीरप्पा जुमनाळ, फयाज कलादगी, नागराज लंबू, सिद्दू रायन्नवर, श्रीनाथ पुजारी, अनिल होसमनी, महादेवी गोकाक, महानगरपालिका सदस्य आरती शाहपुर, अदिवेप्पा सलगल, संगमेश सागर, मल्लिकार्जुन बटगी, डॉ. रवी बिरादर यांच्या सह हजारो संख्येने विविध संघटनेचे कार्यकर्ते मोर्चात सहभाग झाले होते.



### बार्शीच्या विवेकानंद केंद्र संस्कार वर्गातील विद्यार्थ्यांचे कराटे स्पर्धेत यश

**बार्शी, दि. ३० डिसेंबर-**
रविवार दि. २९ डिसेंबर रोजी झालेल्या ७ वी राज्यस्तरीय मिक्स मार्शल आर्ट (कराटे) स्पर्धेमध्ये विवेकानंद केंद्र बार्शीच्या संस्कार वर्गातील विद्यार्थी प्रीतम कबाडे, प्रेम कबाडे, साईप्रसाद कबाडे, कोमल कबाडे, यशराज कबाडे यांनी गोल्ड मेडल आणि शिवतेज कोटकर व सपना लोहार यांनी सिल्व्हर मेडल पदक मिळवून विजयी झाले आहे. सर्वांना प्रशिक्षक विनोद कबाडे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. विजयी खेळाडूंवर विवेकानंद केंद्र बार्शी, यशराज बहुउद्देशीय व संशोधन संस्था , ढगे मळा कला क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, जय राणा ग्रुपतर्फे शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# अक्कलकोट बसस्थानकाच्या पुनर्निर्माणाचे काम प्रगतीपथावर

## २९ कोटी रुपयांचे होणार भव्य बसस्थानक; प्रवाशांना मिळणार अनेक सुविधा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३० डिसेंबर-**
अक्कलकोट येथील नूतन बसस्थानकाचे काम अंत्यत जलद गतीने होत आहे. राज्यातील एक मॉडेल बसस्थानक म्हणून या बसस्थानकाकडे पाहिले जाईल, अशी याची रचता आहे. अक्कलकोट तीर्थक्षेत्री महाराष्ट्रासह देशभरातून येणाऱ्या भाविक भक्तांसाठी अक्कलकोट बसस्थानकाच्या पुनर्निर्माणाचे काम प्रगतीपथावर आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रयत्नामुळे अक्कलकोट बसस्थानकाच्या कामास गती आली आहे. २९ कोटी रुपयांचे हे बसस्थानक अक्कलकोटच्या वैभवात भर टाकणारे असणार आहे.

तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीत बसस्थानक हे पुनर्निर्माणाच्या प्रतीक्षेत होते. जुन्या बसस्थानकात सुविधांचा अभाव होता. अक्कलकोट तालुकावासीय व परगावच्या लाखो भाविक भक्तांची भव्य बसस्थानक



बांधण्याची मागणी होती. अक्कलकोट बसस्थानकाची अवस्था अत्यंत बिकट होती. मोडकळीस आलेली इमारत ' घाणीचे साम्राज्य अतिक्रमणाचा विळखा , स्वच्छतागृहांचा अभाव मोकाट जनावरांचा वावर यामुळे बसस्थानक हे बकाल बनले होते. गेल्या वीस-पंचवीस वर्षापासून बसस्थानक बदलाच्या प्रतीक्षेत होते .आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी महायुती सरकारच्या काळात पाठपुरावा करून सुमारे २९ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला. विधानसभा निवडणुकीच्या आधी राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अक्कलकोट बसस्थानकाच्या पुनर्निर्माणाचे भूमिपूजन करण्यात आले. सदरच्या नवीन बस स्थानकात सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अक्कलकोटचे नूतन बसस्थानक हे तीन मजली आहे. दोन चाकी वाहन , रिक्षा आणि चार चाकी वाहनांसाठी स्वतंत्र वाहन तळ , ११ मोठे व्यापारी गाळे ,भक्तनिवास , आरक्षण कक्ष शिवनेरी शिवशाही शिवाई अशा बसेससाठी स्वतंत्र प्रतीक्षालय ,वाहक चालक विश्रांती कक्ष, हिरकणी कक्ष, स्वतंत्र महिला वाहक विश्रांती कक्ष ,अत्याधुनिक स्वच्छतागृहे , सर्व सोयीने युक्त कॅन्टीन ,कर्मचारी अधिकारी यांच्यासाठी स्वतंत्र कक्ष, बसेस साठी एकूण २२ फलाट असे वैशिष्ट्य नवीन बसस्थानकाचे असणार आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पाठपुराव्यामुळे तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीत बस स्थानकाची भव्य अशी वास्तू साकारत आहे. या नवीन बसस्थानकाच्या निर्मितीस वेग आला असून पुनर्निर्माणाचे काम प्रगतीपथावर आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या कार्यकाळात निर्माण होणारे बसस्थानक हे नक्कीच अक्कलकोटच्या सौंदर्यात भर घालणारे आहे.

### सर्वस्तरातून समाधान अन् कौतुक

नवीन बस स्थानकाच्या निर्माणामुळे परगावच्या लाखो भाविक भक्तांसह अक्कलकोट तालुका वासियांसह सीमावर्ती भागातील प्रवाशांची सोय होणार आहे. या बस स्थानकाच्या निर्माण बद्दल सर्वत्र समाधान व्यक्त केले जात आहे.

# बार्शीतील स्पर्धेत ४०० स्पर्धकांचा सहभाग

## डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त कर्मवीर बुद्धिबळ स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० डिसेंबर-**
कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त बुद्धिबळ स्पर्धा बार्शीत घेण्यात आल्या. या स्पर्धेचे आयोजक वखारिया विद्यालय उपळे (दु) होते.चार गटात पार पडल्या. प्राथमिक गट व माध्यमिक गटाच्या संस्थेतर्गत स्पर्धा दि. २७ डिसेंबर रोजी संपन्न झाल्या. मुलांचा खुला व मुलींचा खुला गटाच्या स्पर्धा ९ डिसेंबर रोजी संपन्न झाल्या.

यावेळी सचिव पी. टी. पाटील व खजिनदार जयकुमार शितोळे उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या स्पर्धेची सुरुवात या दोघांच्या हस्ते बुद्धिबळ पटावरील



एक सोंगटी खेळून केली. याप्रसंगी संस्थेचे सदस्य व स्पर्धा प्रमुख बी.के.भालके. मुख्याध्यापक दयानंद रेवडकर, नामदेव महाले, अतुल नलगे, व अविनाश जाधव उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये ४०० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. प्राथमिक व माध्यमिक गटातून पाच क्रमांक काढण्यात आले. यामध्ये संस्थांतर्गत प्राथमिक गटातून प्रथम क्रमांक सान्वी दत्तात्रय गोरे (महाराष्ट्र विद्यालय बार्शी), द्वितीय प्रज्वल बारंगुळे (महात्मा फुले विद्यामंदिर बार्शी), तृतीय श्रीशैल्य घाडगे (महाराष्ट्र विद्यालय बार्शी), चौथा मधुरा क्षीरसागर (जिजामाता विद्यामंदिर बार्शी), पाचवा विराज जिरंगे (महाराष्ट्र विद्यालय बार्शी). माध्यमिक गटातून प्रथम क्रमांक प्रसन्न जगदाळे, द्वितीय वेदांत खोसे, तृतीय यज्ञेश जाधव, चौथा शुभम कदम, पाचवा अजय वैद्य ( सर्व महाराष्ट्र विद्यालय बार्शी). बक्षीस वितरणाचा कार्यक्रम प्रमुख बी.के भालके यांच्या हस्ते झाला. यासाठी मुख्याध्यापक दयानंद रेवडकर, अतुल नलगे, नामदेव महाले, स्नेहा निंबाळकर, अविनाश जाधव यांनी परिश्रम घेतले.

### खुल्या गटातील विजेते

खुला गट मुले प्रथम क्रमांक प्रसन्न जगदाळे (महाराष्ट्र विद्यालय बार्शी), द्वितीय वेद आगरकर (सुलाखे इंग्लिश मीडियम बार्शी). खुला गट मुली प्रथम क्रमांक अनन्या उलभगत (फिनिक्स पोदार लर्न स्कूल बार्शी) द्वितीय संपदा बोळे (श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी), तृतीय क्रमांक शिवकन्या बकाल यांनी पटकावला.

# वीटचे काका काकडे मोडी लिपीचे सरकारमान्य अधिकृत वाचक

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ३० डिसेंबर-**
वीट (ता. करमाळा) येथील काका काकडे हे मोडी लिपी वाचक परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत.त्यांनी हे प्रशिक्षण पुरभिलेख संचनालय, महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या देऊळगावराजे जिल्हा बुलढाणा येथील प्रशिक्षण वर्गात पूर्ण केले आहे. या परीक्षेत काकडे यांनी तृतीय श्रेणी घेऊन मोडी लिपी वाचक बनवण्याचा मान मिळवला आहे.



त्यामुळे त्यांना मोडी भाषेत असणारे जुने पत्रव्यवहार,शासनाची मोडी भाषेतील कागदपत्रे वाचून मराठीमध्ये भाषांतरित करण्याचा अधिकार महाराष्ट्र शासनाच्या वतीने मिळाला आहे.महाराष्ट्रात बाराव्या शतकात सुरू झालेल्या मोडी लिपीचे अनेक दस्तऐवज आहेत. हेमाडपंथीयांनी निर्माण केलेल्या या लिपीचा यादव काळात सर्रास वापर होत होता. पुढे शिवकाळात अनेक दस्तऐवज या लिपीत असल्याचे दिसून येते हे सर्व दस्तऐवज वाचने सध्याच्या काळात अवघड काम बनले आहे. काकडे यांच्या अधिकृत मोडीवाचक बनण्याने महसुलातील अनेक नोंदी आता वाचणे सोपे होणार आहे याचा फायदा जुने पुरावे वाचून जन्ममृत्यूच्या नोंदी तपासणे,महसुली नोंदी तपासणे यामुळे कुणबी दाखले, संपत्ती विवरण यासाठी सर्वसामान्यांना फायदा होणार आहे. त्यांना मोडी लिपीचे मार्गदर्शन करण्यासाठी शिक्षक विनायक पाटील वाडकर सर, मरसकोल्हे, भिसे यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर प्रांत अधिकारी आंबेकर मॅडम, करमाळा तहसीलदार शिल्पा ठोकडे मॅडम, नायब तहसीलदार काझी साहेब, आणि मदन निंबाळकर यांचेही मार्गदर्शन लाभले आहेत.



# श्री वटवृक्ष देवस्थान समितीची नि:स्वार्थ सेवा उल्लेखनीय बाब : डेरे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि, ३० डिसेंबर-**
श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान हे स्वामींचे वास्तव्य असलेले जागृत स्थान आहे. श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीची ही निस्वार्थ सेवा म्हणजे उल्लेखनीय बाब असल्याचे मनोगत नवी मुंबई येथील राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेश सरचिटणीस नंदा डेरे यांनी व्यक्त केले.

श्री वटवृक्ष स्वामी मंदिरास सहकुटुंब भेट देऊन दर्शन घेतले. याप्रसंगी चेअरमन महेश इंगळे यांनी त्यांचा सन्मान केला. डेरे म्हणाल्या, स्वामींचे हे आशीर्वाद स्वामी दर्शनाच्या माध्यमातून भाविकांना तात्काळ पुरविण्याचे काम श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीचे प्रमुख महेश इंगळे हे अत्यंत सेवाभावी वृत्तीने सांभाळत आहेत. वैयक्तिक जीवनातील सुख दुःखांना छेद देऊन महेश इंगळे हे प्रत्यक्ष वटवृक्षाखाली तासंतास उभे राहून प्रत्येक भक्तांना मोफत व सुलभ स्वामींचे दर्शन कसे मिळेल याचे अत्यंत तळमळीने नियोजन करित असतात. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रथमेश इंगळे, श्रीशैल गवंडी, प्रसाद सोनार, गिरीश पवार, श्रीकांत मलवे, विपुल जाधव उपस्थित होते.

# मातोश्री ईश्वराम्मा विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० डिसेंबर-**
समाज परिवर्तनासाठी स्त्री शिक्षण या ब्रीदवाक्याने प्रेरित होऊन संस्थापक सचिवा सुनेत्रा पवार यांचे कुशल मार्गदर्शनाखाली पंढरीतील रुक्मिणी विद्यापीठाच्या मातोश्री ईश्वराम्मा विद्यालयात रंगला माजी विद्यार्थिनींचा स्नेह मेळावा.

यावेळी प्रथम शाळेची घंटा वाजवून मुलींनी शाळेत प्रवेश केला. पुढे गणरायाची विधिवत पूजा व आरती करून या स्नेह मेळाव्यास सुरुवात केली. परवीन कोतवाल या विद्यार्थिनीच्या अमृतवाणीने सर्वांना मंत्रमुग्ध करत गुरुवर्यांना वंदन करून गुरुवर्यांचा यथोचित मानसन्मान केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या नंदिनी गायकवाड उपस्थित होत्या. मुली कितीही मोठ्या झाल्या तरी आपली शाळा आणि तेथील आठवणी नेहमी मनात घर करूनच जात असतात याचाच प्रत्यय मातोश्री ईश्वराम्मा विद्यालयाच्या माजी विद्यार्थीनींच्या स्नेह मेळाव्यात आला.जुन्या अनेक आठवणीत शाळेच्या इयत्ता दहावीच्या १९९७ व



९८ च्या मुली एकत्र येऊन रमल्या होत्या. गुरुंनी दिलेली शिस्त ,चिकाटी, सचोटी यामुळेच आज आम्ही जीवनात यशस्वी झाल्याचे माजी विद्यार्थिनींनी मनोगतात व्यक्त केले. प्रशालेच्या माजी विद्यार्थिनी या उत्तम गृहिणी बरोबर लघुउद्योजिका, कृषी अधिकारी, ग्रामसेवक तर आहेतच व वेगवेगळ्या क्षेत्रात त्यांनी आपला नावलौकिक केला आहे. या मेळाव्यास माजी शिक्षिका व मुलींनी उपस्थिती दर्शवत प्रशाले वरील प्रेम व्यक्त केले. या कार्यक्रमास मुलींनी प्रशालेस क्रीडा साहित्य देऊ केले .या दिलेल्या वस्तूंचा अंतकरणपूर्वक स्वीकार करून सर्व शिक्षकांनी भविष्यात त्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा देऊन या कार्यक्रमाचा समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परवीन कोतवाल यांनी केले. या कार्यक्रमास शीला गवळी ,रूपाली देठे, वर्षा जाधव, संगीता डिसले, करुणा साळुंखे, संजीवनी जाधव, स्वाती अभंगराव, विद्या माने, सत्यशीला आखाडे, साधना पाटील, संजीवनी कसगावडे, मनीषा सोनटक्के, नीता बनसोडे, वर्षा जाधव, मनीषा पवार, रेवती बेलपत्रे याही उपस्थित होत्या.

# माळशिरसमधील ऊस चालला दुसऱ्या जिल्ह्यात

## जादा दरामुळे ओढा दुसऱ्या कारखान्यांकडे

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ३० डिसेंबर-**
माळशिरस तालुक्यात उसाचे क्षेत्र मोठे आहे. कारण तालुक्याला निरा खोऱ्यातील धरणाचे पाणी उपलब्ध असल्यामुळे या तालुक्यात उसाचे क्षेत्र मोठे आहे. शेतकऱ्यांची उसाला पहिल्यापासूनच मोठी पसंती आहे. तालुक्यात एकूण पाच साखर कारखाने आहेत. पण तसा विचार केला तर हे साखर कारखाने पुणे व सातारा जिल्ह्यातील साखर कारखान्यापेक्षा २०० ते ४०० रुपये दर कमी देतात. यामुळेच तालुक्यातील अनेक शेतकरी सातारा जिल्ह्यातील साखर कारखान्यांना



गाळपासाठी ऊस देतात ही वस्तुस्थिती आहे.

हे साखर कारखाने उसाचे बिल पण एकरकमी देतात यामुळेच माळशिरस तालुक्यातील ऊस मोठ्या प्रमाणावर सातारा जिल्ह्यातील कारखान्याला शेतकरी देतात .ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनमालकाला वाहतुकीचा दर पण टनामागे शंभर रुपये पेक्षा जादा मिळत आहे. तसेच हे साखर कारखाने बाहेर वजन करुनही ऊस कारखान्याला पाठविल्यास काही अडचण येत नाही. शेतकऱ्यांचा टनामागे सरासरी २०० ते ३०० रुपये फायदा होत आहे यामुळे माळशिरस तालुक्यातील ऊस मोठ्या प्रमाणात सातारा जिल्ह्यातील कारखान्याला गाळपासाठी दिला जात आहे. तसेच अडचणीच्या ठिकाणचा ऊस बैलगाडीने भरुन ट्रक किंवा ट्रॅक्टर मध्ये भरुन दिला जातो .तर आडसाली ,कमी वयाचा किंवा खोडवा याचा कसलाही विचार न करता सदरचे कारखाने शेतकऱ्यांचा विना अट ऊस गाळपासाठी नेतात. त्यामानाने माळशिरस तालुक्यातील चार कारखाने जुने आहेत त्यांच्याकडे उपपदार्थ निर्मिती केली जाते तरीही हे कारखाने उसाला चांगला दर देत नाहीत. यामुळे माळशिरस तालुक्यातील शेतकरी इतर जिल्ह्यातील कारखान्याला ऊस देतात.

### राजेवाडीला जातो जास्त ऊस

माळशिरस तालुक्यातून सांगली जिल्ह्यातील राजेवाडी येथील श्री श्री सद्गुरु साखर कारखान्यालाही मोठ्या प्रमाणावर ऊस जातो. पण तो सांगली जिल्ह्यात असूनही त्या झोनप्रमाणे शेतकऱ्यांना दर देत नाही. या कारखान्यास सांगली जिल्ह्यापेक्षा सोलापूर जिल्ह्यातील ऊस मोठ्या प्रमाणावर गाळपास जातो.

# मद्य विक्री अनुज्ञप्तीधारकांची कार्यशाळा

**पंढरपूर, दि. ३० डिसेंबर-**
राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत सुरू केलेल्या संगणकीय धोरणानुसार विकसीत सप्लाय चेन मॅनेजमेंट आज्ञावलीमधील रिटेलर मॅनेजमेंट सिस्टीम या मॉडयुलवरील विषयाबाबतची सीएल-३, एफएल-२, एफएल, बीआर-२, एफएल-३ अनुज्ञप्तीधारकांकरीता एकदिवसीय कार्यशाळा पंढरपूर विभागामार्फत आयोजित करण्यात आलेली होती.

राज्य उत्पादन शुल्कचे आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी, अपर आयुक्त यतिन सावंत, , सहआयुक्त (प्रशासन), एस. एन. चव्हाण, सहआयुक्त व्ही. जी. इंदिसे, सहआयुक्त पी. पी. सुर्वे, विभागीय उपआयुक्त सागर धोमकर, राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक भाग्यश्री जाधव, उपअधीक्षक एस. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेमध्ये सप्लाय चेन मॅनेजमेंट मधील रिटेलर मॅनेजमेंट सिस्टीमचे संचालन प्रभावीपणे होण्याकरीता अनुज्ञप्तीधारकांना पंढरपूर विभागाचे निरीक्षक पंकज कुंभार, दुय्यम निरीक्षक बापू चव्हाण पंढरपूर यांनी सखोल मार्गदर्शन केले. याबाबत समस्यांचे निराकरण केले. यावेळी मंगळवेढा, सांगोला व पंढरपूर तालुक्यातील अनुज्ञप्तीधारक उपस्थित होते. तसेच सदर कार्यशाळा आयोजित करण्यासाठी राहुल ताड यांचे बहुमोल तांत्रिक सहकार्य लाभले. तसेच विभागाचे गुरूदत्त भंडारे, सदुनि, जवान विजयकुमार शेळके हे उपस्थित होते. सूत्रसंचालन जवान विनायक वाळुजकर यांनी केले.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## करमाळा मूकबधिर आश्रमशाळेला इरा स्कुलची भेट

**करमाळा, दि. ३० डिसेंबर-**

इरा पब्लिक स्कूल जेऊर च्या इयत्ता नर्सरी ते पहिलीच्या विद्यार्थ्यांनी करमाळा येथील मूकबधिर आश्रमाला सदिच्छा भेट दिली . यावेळी इरा पब्लिक स्कूल चे सचिव सुनिल अवसरे सर, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी यांच्या हस्ते मूकबधिर आश्रमातील विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आले यावेळी त्या आश्रमातील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. व देणगीच्या स्वरूपात तांदूळ देण्यात आले. आश्रमातील कर्मचाऱ्यांनी इरा पब्लिक स्कूलचे व सर्व विद्यार्थ्यांचे आभार मानले.





## संक्षिप्त वृत्त...



### शालेय तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये बार्शीतील महाराष्ट्र विद्यालयाचे यश

**बार्शी, दि. ३० डिसेंबर-**

दि. २७ व २८ डिसेंबर रोजी ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन एमआयटी रेल्वे इंजिनिअरिंग कॉलेज बार्शी या ठिकाणी पार पडले. या प्रदर्शनामध्ये तालुक्यातून १९२ प्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले.

यामध्ये महाराष्ट्र विद्यालयातील दोन विद्यार्थ्यांनी व एक शिक्षकाने घवघवीत संपादन केले ते पुढीलप्रमाणे- दिव्यांग गटातून आरुष राहुल शहाणे याने प्रथम क्रमांक मिळवला. माध्यमिक गटातून तृतीय क्रमांक तनवीर जमील तांबोळी यांनी मिळवला.व प्राथमिक शिक्षक गटातून संग्राम दादासाहेब देशमुख यांनी प्रथम क्रमांक मिळवला. या सर्वांची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे. वरील यशस्वी विद्यार्थ्यांना एस.एल. देशमुख व सर्व विज्ञान शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल सर्वांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन.एन. जगदाळे, संस्थेचे सचिव तथा शाळा समितीचे अध्यक्ष पी. टी. पाटील, सहसचिव तथा शाळा समितीचे सदस्य ए. पी. देबडवार, संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ. मिराताई यादव, एस.बी. शेळवणे,सर्व कार्यकारिणी सदस्य ,सर्व संस्था सदस्य, विद्यालयाच्या प्राचार्या के. डी.धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी. सपताळे, पर्यवेक्षक एस. सी. महामुनी, पर्यवेक्षिका एन.बी. साठे, विज्ञान प्रमुख एस. एम. हाजगुडे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### बार्शीत गुटखा साठ्यावर कारवाई; १.२६ लाखांचा साठा जप्त

**बार्शी, दि. ३० डिसेंबर-**

बार्शी पोलिसांनी मोठी कारवाई करत महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटख्याचा १.२६ लाख रुपये किंमतीचा साठा जप्त केला आहे. वाणी प्लॉट, बार्शी येथे सचिन शिवाप्पा गवसाणे यांच्या राहत्या घरी केलेल्या छाप्यामध्ये हा साठा आढळून आला. आरोपी सचिन गवसाणे सध्या फरार असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे. बार्शी शहर पोलीस स्टेशनला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, वाणी प्लॉट येथील सचिन गवसाणे यांच्या घरात मोठ्या प्रमाणावर गुटखा साठा असल्याचा संशय होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने प्रतिबंधित गुटखा राम डोंबे या पुरवठादाराकडून खरेदी केला होता. छाप्यामध्ये केआर १००० प्रकारच्या गुटख्याची ३६ पोती (एकूण किंमत रु. १,२६,०००) जप्त करण्यात आली. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सहायक आयुक्त नंदिनी हिरेमठ यांनी याबाबत बार्शी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत अधिसूचनेचे उल्लंघन केले आहे. जप्त केलेल्या गुटख्याचा एक नमुना पुढील तपासासाठी पाठवण्यात आला असून उर्वरित साठा पोलिसांच्या ताब्यात ठेवण्यात आला आहे. सदर आरोपी सचिन गवसाणे आणि गुटखा पुरवठादार राम डोंबे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस दोघांचा शोध घेत आहेत. बार्शी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक एम. ए. गळगटे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरु आहे.



### मंदिर समितीच्या अन्नछत्रासाठी एक लाख रुपयाची देणगी

**पंढरपूर, दि. ३० डिसेंबर-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीस दत्ताराव दामू फुलसुंदर यांनी एक लक्ष रुपयेची देणगी दिल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. या देणगीदाराचा सन्मान मंदिर समितीचे लेखाधिकारी मुकेश अनेचा यांनी श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन केला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब व सेवक सुधाकर घोडके उपस्थित होते. देणगीदार हे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे निस्सिम भक्त असून, दरवर्षी श्रीच्या दर्शनासाठी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे येत असतात. मागील दोन वर्षापासून त्यांनी प्रत्येक वेळी एक लक्ष रुपयेची देणगी दिली आहे. संबंधित देणगीदार ठाणे येथील रहिवासी असून, प्रत्येक वर्षी आपल्या जमापुंजीतून मंदिर समितीस दान करीत असतात. सदरची देणगी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रासाठी दिली आहे. या अन्नछत्रामध्ये दैनंदिन दुपारी १२ ते २ व रात्री ७ ते ९ या वेळेत भाविकांना मोफत अन्नदान करण्यात येते. त्याचा सुमारे दैनंदिन ३००० भाविक लाभ घेतात.

## शेतशिवारात घुमले 'चांगभलं'

**वेळ अमावस्येनिमित्त शेतकऱ्यांकडून धरणी मातेची पूजा; बाजारपेठेत शुकशुकाट**

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ३० डिसेंबर-**

धरणीमातेविषयी ऋण व्यक्त करण्यासाठी शेतकऱ्यांकडून वेळ अमावस्या सण उत्साहात साजरा करण्यात आला. शेतशिवारात पांडवांची पूजा करताना चांगभलंच्या आवाजाने शेतशिवार. वेळ अमावस्येनिमित्त वनभोजनाचा आस्वाद घेण्यासाठी शेतात पै पाहुणे, नातेवाईक व मित्र परिवारांची मांदियाळी होती. धरणीमातेच्या पूजेसाठी शेतीत शेतकऱ्यांची गर्दी असल्याने गावातील बाजारपेठेत शुकशुकाट होता.

वेळ अमावस्या व सोमवती अमावस्येनिमित्त सीमावर्ती भागातील शेतकरी शेता पांडवांची पुजा करून सर्व भाजीपाल्यांचे मिश्रण असणारी' खज्जीभज्जी' सह पुरणपोळीचा नैवेद्य दाखवितात. या दिवशी 'खज्जीभज्जी'ला विशेष महत्त्व असल्याने पहाटेपासूनच गृहिणींची 'खज्जीभज्जी' करण्यासाठी लगबग सुरू होते. शेतातील पालक,चुका, मेथी, कोथिंबीर, कडीपत्ता, दोडका, काकडी, बोर, मिरची, घेवडा यासह कडधान्य मिश्रण करून 'खज्जीभज्जी' तयार करण्यात येते. शिवाय बाजरीची उंडे व पुरणपोळीसह गावातील देवतांना नैवेद्य दाखवून मोठ्या उत्साहात वेळ अमावस्या सण साजरा करण्यात आला. यावेळी पाच दगडांचा पांडव करून व पाच ज्वारीचे पाचुंदा यांची पूजा करून पाच फेरी घालण्यात येते. यावेळी सहपरिवार 'चांगभलं, पाऊस आला घरला चला' म्हणत पाच फेऱ्या घालतात. त्यानंतर सहपरिवार एकत्र येऊन निमंत्रित पै पाहुणे, मित्र व नातेवाईक यांच्यासह 'खज्जीभज्जी' व बाजरीच्या उंडीच्या भोजनाचा आस्वाद घेतला जातो. सोलापूर शहरापासून मंद्रुप अर्ध्या तासाच्या अंतरावर असल्याने शहरातील नोकरदार व कर्मचारी मोठ्या संख्येने शेतात हजेरी लावली होती. दिवसभर शेतशिवार फिरून संध्याकाळी घरी परतात. यावेळी शेतकरी शेतातील पाच ज्वारी पाचुंदा देवापुढे अर्पण करतात. अशा प्रकारे सहपरिवार व मित्र, नातेवाईकांच्या उपस्थितीत 'वन डे' वनभोजनामुळे शेतकरी आनंदी होतो. ग्रामीण भागात वेळअमावस्येला विशेष महत्त्व असल्याने सर्व जातीधर्मांचे लोक वेळ अमावस्या सण साजरी करतात. शेतकऱ्यांसह गावातील मित्र व शेजारी मोठ्या संख्येने शेतात जात असल्याने बाजारपेठेत शुकशुकाट होता.



## वैराग परिसरात स्नेहभोजन

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ३० डिसेंबर-**

वैराग परिसरामध्ये शेतकऱ्यानी वेळ अमावस्या मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. पूर्वी बळीराजा बैलगाडीमध्ये हे सर्व साहित्य भरून घरचा सगळा लवाजमा धडधड करीत आदळत आपटत मस्त सफर करत शेताला जायचा. आता मात्र सवडीप्रमाणे मोटारसायकल, ऑटोचा वापर केला जातो. काहीजण डोक्यावर डालगे (मोठे टोपले) घेऊन शेतात जातात. या दिवशी आपल्या कामानिमित्त बाहेगावी असणारी माणसे वेळामावस्याला मात्र आपापल्या गावी आवर्जून सहकुटुंब येतात आणि आनंदाने हा उत्सव एकत्रीतपणे साजरा करतात.

भाकरीला त्या दिवशी भाकर न म्हणता 'रोडगा' म्हणतात. त्याचबरोबर भाज्यांची मोकळी भाजी, खीर, आंबील, बाजरीचे व ज्वारीचे उंडे, तिळाच्या भाकरी, भजी, शेंगदाण्याचे लाडू हे नैवेद्याचे पदार्थ करून ठेवतात. आदल्याच दिवशी सगळा भाजीपाला आणि 'आळंदे' खरेदी केले जाते. 'आळंदे' म्हणजे लहान मडके आणि त्यावर झाकायला एक खापराची झाकणी असते . या दिवशी शेतात असणाऱ्या सर्व पिकांची व पांडवाची पूजा केली जाते. ज्वारी किंवा बाजरीचे उंडे, आंबट भात, भज्जी, खीर अशा अनेक पदार्थाचा नैवदय दाखविला जातो . बनवलेल्या सर्व पदार्थाचा प्रसाद म्हणून वन भोजनाच्या रूपात अस्वाद घेतला जातो यावेळी एकमेकांना जेवणासाठी आमंत्रण दिले जाते.

वेळ अमावस्या या सणामध्ये आढळणारी निसर्गाची हानी या सणात नसून माणसाला निसर्गा जवळ घेऊन जाणारा निसर्गाशी घट्ट नाते विणणारा हा सण आहे. रंगीत फुलांच्या मूकूटासह नटलेला करंडा, कापणीसाठी आलेली तूर, परिपक्व होऊ लागलेला हरभरा, हवेच्या तालावर नाचणारा गहू, पाखरांना खुणवणारी पोटऱ्यातील ज्वारी असा चोहीकडे दिसणारी हिरवीगार शेती आणि प्रसन्न निसर्ग अशा वातावरणाने ऊन, वारा, पाऊस या निसर्ग शक्ती समोर नतमस्तक होऊन केलेली पूजा म्हणजे शेतकरी व निसर्गाची शतकानुशतके चालत आलेली भागीदारीच दर्शविते.

शेतातली सर्व मंडळी सूर्यास्ताच्या वेळी दिवसभरात हा अनोखा आनंदोत्सव साजरा करून हर हर महादेव, काळ्याआईचं चांगभला म्हणत सुखासमाधानाने घरी येतात.



## अणदूर परिसरात वेळ अमावस्या सण मोठ्या उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ३० डिसेंबर-**

शेतकऱ्यांचा सगळ्यात आवडीचा काळ्या आईची सेवा करण्याचा व मनसोक्त वनभोजनाचा सण म्हणजे वेळाअमावस्या हा सण सोमवारी अणदूर परिसरातील बळीराजाने मोठ्या उत्साहात साजरा केला.

कर्नाटक व सीमावर्ती भागात साजरा होणारा हा सण म्हणजे काळ्या आईची नैवेद्य दाखवून ऋण फेडण्याचा दिवस. सर्व कुटुंब, पाहुणे रावळे आपल्या शेतात जातात. संपूर्ण अणदूर परिसरातील गावे ओस पडली होती. या सणाला मुख्य मेनू म्हणजे आंबील व भज्जी. विविध प्रकारच्या पालेभाज्या, चवळी, वाटाण्यापासून बनविली जाते ती खूप स्वादिष्ट होते, तर ताकापासून आंबील तयार केले जाते. वांग्याचे भरीत, शेंगांच्या पोळ्या, बाजरीच्या पिठापासून तयार केलेले उंडे, गव्हाची खीर यावर ताव मारून सर्व मंडळी तृप्त झाली इतर सर्व सणाला घरी जेवण असते. फक्त वेळ अमावस्येला शेतात जेवण असते, असा हा आगळा वेगळा सण.

वेळ अमावास्या हा मूळ कर्नाटकी असणारा. पण महाराष्ट्रामध्येही सिमावर्ती भागात धाराशिव जिल्ह्यात हा सण मोठ्या उत्साहात साजरा होणारा कृषिप्रधान सण आहे. मार्गशीर्ष अमावास्येला हा उत्सव साजरा केला जातो. पेरणीनंतर येणाऱ्या सातव्या अमावास्येला हा उत्सव होतो. दर्शवेळा अमावस्या हा ग्रामीण संस्कृतीचे प्रतीक आणि वनभोजनाचा आनंद देणारा सण आहे. या सणाची तयारी शेतकरी दोन दिवसांपासून अंबली, उंडे, खीर, शेंगा पोळी, बाजरीची भाकरी, धपाटे, बारा भाज्या मिळून बनवलेली भज्जी, वांग्याची भाजी, शेंगा चटणी आदी पदार्थ बनवले जातात. यावेळी शेतातील पाच पांडवाना चुना, काव याने रंगवले जाते. कडब्याची कोपी केली जाते. पाच पाडवांसोबत शिवारातील दैवतांची, पिकांची, भूमातेची पूजा मनोभावे केली जाते. नैवेद्य दाखवून शेतकरी आपल्या आप्तेष्ट मित्रांसोबत वनभोजनाचा आस्वाद घेतो. ग्रामीण भागात येळवशीला शेतकरी व शेतीशी निगडित सर्व कुटुंबीय हजेरी लावतात.



### शेत शिवार हिरवेगार

काळी आई हिरवा शालू नेसून बळीराजाच्या स्वागतासाठी तयार असते. शेत शिवार हिरवेगार असल्याने शेतकऱ्यांत उत्साही वातावरण असते. यादरम्यान पोटऱ्या आलेली ज्वारी, गहू, हरभरा ही पिके जोमाने डोलू लागतात. यावेळी बच्चे कंपनी चिंच, बोर, डहाळे, जांभ या रानमेव्याचा मनमुराद चव चाखतात. या सणाला गाव ओस पडलेले असतात आणि शेत शिवार फुललेली असते. शहरी भागातील नागरिक वेळ अमावस्याचा सण साजरा करण्यासाठी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात येत असतात.



## रातंजन येथे काळ्या आईची मनोभावे पूजा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० डिसेंबर-**

येळ अमावस्या म्हणलं की शेतकऱ्यांसाठी काळ्या आईच्या पुजेचा सण. या सणाला ग्रामीण भागात मोलाचे स्थान आहे. येळ अमावस्या म्हटलं की लहान मुलं, महिला, पुरुष सर्वांसाठी एकत्र येऊन शेतशिवारात जाऊन आनंदात पांडवांची पूजा करुन साजरा करण्याचा दिवस असतो.

शेतातील उत्पन्नाची सम्रद्धी भरम साठ होण्याची मनोकामना व्हावी म्हणून मनोभावे काळ्या आईची पूजा असंख्य शेतकरी करतात. गत दोन वर्षांच्या तुलनेत यावर्षी चांगला पाऊस झाल्याने शेतकऱ्यांत आनंदाचे वातावरण असल्याने शेतशिवार हिरवेगार झाल्याचे दिसून येत आहे.

बार्शी तालुक्यातील रातंजन येथील बापू दत्तू नागटिळक यांच्या शेतामध्ये येळ आमावस्याची पूजा करण्यात आली.अतिशय आनंदमय वातावरणात शेतात साजरा करण्यात आली. त्यावेळी गौतम नागटिळक, बिरु नागटिळक, माधुरी नागटिळक, सीता डोळस, दुर्गा नागटिळक, माया सुरवसे, उर्मिला देशमुख, गीता बनसोडे, कृष्णा बनसोडे, भैरवनाथ चौधरी, साहिल डोळसे इत्यादी उपस्थित होते. अमावस्येनिमित्त खाण्याची जणू मेजवानीच असते. आंबील, गव्हाची खीर, भज्जी, अंडे, धपाटे, शेंगा चटणी, वरण अशा विविध प्रकारचा मेनू असतो. त्यामुळे एरव्ही शेतीकडे बगल देणारी माणसे सगळीकडे हिरवेगार बागायत असल्याने शेतीची वारी करू लागले आहेत. गेल्या अनेक वर्षापासूनची परंपरा मराठवाड्यातील लातूर, उस्मानाबाद, परळी, सोलापूर भागातील शेतकऱ्यांनी जोपासली आहे.

## पं. राजेंद्र कुलकर्णींचे बासरीवादन, पं. संजय गरुड यांच्या गायनाने गाजला पहिला दिवस

**पं. विकास कशाळकर फाऊंडेशनतर्फे आयोजन; संगीत महोत्सवात बासरीवादन राग श्री, गायनात राग कलाश्रीने आणली रंगत**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० डिसेंबर-**

अभिजात भारतीय शास्त्रीय संगीतातीच्या प्रचार आणि प्रसारासाठी आणि नवोदित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या पं.विकास कशाळकर फाऊंडेशन यांचे वतीने दोन दिवसीय संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

महोत्सवात सुरुवातीला उमेश परिचारक मान्यवर कलाकार आणि डॉ. प्रसाद कुलकर्णी, ज्ञानेश्वर दुधाणे, आण्णासाहेब सुरवसे, उदय उत्पात, एस. पी. कुलकर्णी, माधूरी जोशी, स्वानंदी काणे यांचे हस्ते संगीत महोत्सवाचे दीपप्रज्वलन होऊन उद्घाटन करत कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी बोलताना उमेश परिचारक यांनी सांगितले की पंढरपूर नगरीला शास्त्रीय संगीताचा वारसा मोठा आहे आणि तो वारसा कशाळकर फाऊंडेशनच्या माध्यमातून पुढे चालत असून यातून पंढरपूर येथे नवोदित कलाकार निर्माण व्हावेत. त्याद्वारे पंढरपूर नगरीचा नावलौकिक वाढेल असे सांगून शुभेच्छा देत नेहमी सहकार्य राहील असे आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ प्रसाद कुलकर्णी यांनी करत कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रथम सत्रात आंतरराष्ट्रीय किर्तीचे ख्यातनाम बासरीवादक पंडित राजेंद्र कुलकर्णी यांनी राग श्री सादर करत पहिल्यांदा आलाप जोड झाला सादर केला. त्यानंतर झपताल आणि तीन तालात अप्रतिम द्रुत गत सादर करत रसिकांना मंत्रमुग्ध केले.शेवटी दादऱ्या मधील गत वाजवली त्यांना तितकीच सुंदर साथसंगत तबला ऋषिकेश सुरवसे, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे यांनी दिली. दुसऱ्या सत्रात किराणा घराण्याचे ख्यातनाम गायक पं.संजय गरुड यांच्या दमदार गायनाला सुरुवात झाली. त्यामध्ये सुरुवातीला त्यांनी राग कलाश्री बडा ख्याल विलंबित एकतालामध्ये धन धन मंगल गावो बंदिश आणि मिश्र निर्वाणी मधील ठुमरी बलमवा तुम क्या जानो प्रीत अप्रतिम सादर करत अतिशय सुंदर पहाडी आवाज आणि तितकीच मधूरता आलाप ताना यांची अनुभूती रसिकांना अनुभवायला मिळाली. त्यानंतर भिमसेन जोशी यांचा अजरामर अभंग जो भजे हरि को सदा या भैरवीने कार्यक्रमाची सांगता केली.



### यांनी केली साथसंगत

यावेळी त्यांना तितकीच सुंदर साथसंगत तबला रोहन पंढरपूरकर, हार्मोनियम तुषार केळकर, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे, टाळ निषाद गरुड, स्वरसाथ ओजस अंबिके.यांनी केली. राजेश खिस्ते यांनी सुंदर सुत्रसंचलन केले. आभार उदय उत्पात यांनी मानले. अप्रतिम ध्वनी व्यवस्था आरती साऊंड सिस्टीम यांनी केली.

संगीत महोत्सव यशस्वी करण्यासाठी माधुरी जोशी,आण्णासाहेब सुरवसे,एस. पी. कुलकर्णी, स्वानंदी काणे,धनंजय मनमाडकर,प्रज्ञा कुलकर्णी,भगवान मनमाडकर, सुधीर भोरकर,ओजस अंबिके, सिध्देय पुरवत, श्रीरंग जाकी, अनिरुध्द कुलकर्णी, मिहीर देशपांडे आदींनी अधिक परिश्रम घेतले.

## तुळजाई पतसंस्थेच्या दिनदर्शीकेचा प्रकाशन सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर,दि.३० डिसेंबर -**

तुळजापूर खुर्द येथील तुळजाई नागरी सहकारी पतसंस्थेच्या सन-२०२५ या वर्षाच्या दिनदर्शीका प्रकाशन सोहळा दि.२७ रोजी संस्थेच्या सभागृहामध्ये सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक पी.ए.साठे यांच्या शुभहस्ते पार पडला. या दिनदर्शीका प्रकाशन सोहळ्याप्रसंगी माजी नगरसेवक पंडितराव जगदाळे, जिल्हा उपनिबंधक कायालयातील सहाय्यक सहकार अधिकारी नितीन पाटील,



संस्थेचे चेअरमन राजाभाऊ देशमाने, चेअरमन ताटे, संचालक सर्वश्री धनंजय कुंभार, मकसुद शेख, भिकु कुंभार, संजय देशमाने, रमेश भोजने, रामहारी भोजने, संस्थेचे कर्मचारी, संक्षप ठेव प्रतिनिधी उपस्थीत होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन संस्थेचे व्यवस्थापक संजय ढवळे यांनी केले तर आभार व्हा.चेअरमन ताटे यांनी व्यक्त केले.

### संक्षिप्त वृत्त...



### सनातन वैदिक धर्म जनजागृती अभियानास प्रारंभ

**तुळजापूर, दि.३० डिसेंबर -**

शहरातील जय हनुमान नगर येथून सनातन वैदिक धर्म बद्दल जनजागृती अभियानास प्रारंभ करुन यशस्वीरित्या राबवण्यात आले. यापुढे ही हे अभियान मोठ्या प्रमाणात सर्वत्र राबवण्यात येणार आहे. श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी धर्म जागृती धर्मरक्षण तसेच गोवंश संवर्धन आणि रक्षण लव्हजिहाद अशा प्रमुख विषयावर महंत इच्छागिरी महाराज यांनी उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास जय हनुमान नगर येथील रहिवाशांसह महिलांची संख्या मोठ्या संख्येने होती.




### राष्ट्रीय रोलबॉल स्पर्धा : प्रणवने पटकाविले सुवर्णपदक

**धाराशिव, दि.३० डिसेंबर -**

भारतीय रोलबॉल महासंघाचे अधिपत्याखाली महाराष्ट्र रोलबॉल संघटनेच्या वतीने सातारा येथे घेण्यात आलेल्या ११ वर्षाखालील राष्ट्रीय रोलबॉल स्पर्धेत धाराशिव जिल्हा रोलबॉल संघटनेचा खेळाडू प्रणव मलदोडे याने सुवर्णपदक पटकाविले आहे. सातारा येथे झालेले राज्यस्तरीय रोलबॉल स्पर्धेतून महाराष्ट्र रोलबॉल संघटनेचे सचिव प्रताप पगार यांनी ११ वर्षे वयोगटातील मुला मुलींचे संघ जाहीर केले होते. मुलांच्या संघात धाराशिव जिल्हा रोल बॉल संघटनेचा खेळाडू प्रणव मलदोडे याची तर धाराशिव जिल्हा रोलबॉल संघटनेचे मुख्य प्रशिक्षक तथा सहसचिव प्रतापसिंह राठोड यांची संघ व्यवस्थापक पदी निवड करण्यात आली होती. धाराशिव जिल्हा रोल बॉल संघटनेचे अध्यक्ष खा.ओमप्रकाश राजेनिंबाळकर, कार्याध्यक्ष सचिन शिंदे, उपाध्यक्ष धनंजय पाटील, सचिव गिरीश पाळणे, कोषाध्यक्ष सचिन देवगिरी, रोलबॉल कोच साई राठोड, ओम राठोड आदिसह संघटनेचे पदाधिकारी, खेळाडू, पालक आणि क्रीडा प्रेमींनी अभिनंदन केले आहे.



### राष्ट्रीय ज्युदो स्पर्धा : ओमप्रसाद करणार महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व

**धाराशिव, दि.३० डिसेंबर -**

महाराष्ट्र ज्युदो संघटनेच्या वतीने मुंबई येथे घेण्यात आलेल्या कॅडेट वयोगटातील राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धेत धाराशिव जिल्हा ज्युदो संघटनेचे ज्युदो पटू ओमप्रसाद निंबाळकर याने ९० किलो पुढील वजनी गटात सुवर्णपदक पटकावत राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे. यासह नाशिक येथे झालेल्या वरिष्ठ गटातील राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धेत ओंकार चौरे याने १०० किलो पुढील वजनी गटात रौप्य पदक तर ओमप्रसाद निंबाळकर याने १०० किलो खालील वजनी गटात कास्यपदक पटकाविले आहे. राज्य स्पर्धेतील जुदोपटूंची कामगिरी जिल्ह्यातील उदयन्मुख ज्युदोपटू साठी प्रेरणादायी ठरणार असून त्यांच्या कामगिरीबद्दल धाराशिव जिल्हा ज्युदो संघटनेचे अध्यक्ष नितीन काळे, उपाध्यक्ष वैजिनाथ घोडके, उपाध्यक्ष अमर सुपेकर, सचिव प्रवीण गडदे, सहसचिव अशोक जंगमे, कोषाध्यक्ष अभय वाघोलीकर, रवींद्र जाधव, प्रभाकर जाधव, स्पर्धा विभाग प्रमुख प्रतापसिंह राठोड, तांत्रिक समिती सचिव कैलास लांडगे, प्रशिक्षक साई राठोड यासह संघटनेचे पदाधिकारी, खेळाडू, पालक आणि क्रीडाप्रेमींनी अभिनंदन केले आहे

### सौर ऊर्जेचा प्रकल्प स्थलांतर करा, मनसेचा इशारा

**नळदुर्ग, दि.३० डिसेंबर -**

नळदुर्ग येथील सर्व्हे नं २३६/७ मधील ११ हेक्टर २६ गुंठे जागा हि मुख्यमंत्री सौर योजने अंतर्गत सौर ऊर्जा प्रकल्प स्थापित करण्याकरीता पालिकेने प्रतिवर्षी १ रु दराने ३० वर्षाकरीता भाडेपट्याने दिली असून. ही शहरातील नळदुर्ग-तुळजापुर मार्गांवरील अत्यंत मोक्याची जागा आहे. भविष्यात नळदुर्ग तालुक्याची निर्मिती झाल्यास कार्यालयासाठी ही जागा राखीव ठेवणे गरजेचे आहे. सौर ऊर्जेचा प्रकल्प इतरत्र स्थलांतरीत करावा अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमुद केले आहे. या जागेवरील प्रकल्प इतरत्र स्थलांतर नाही केल्यास खळखट्याक आंदोलनाचा इशारा मनसेने दिला आहे. निवेदनावर मनसेचे जिल्हा सचिव ज्योतिबा येडगे, शहराध्यक्ष अलिम शेख, शहर सरचिटणीस प्रमोद कुलकर्णी, शहर संघटनक रवी राठोड यांच्या स्वाक्षरी आहेत.

# जिल्ह्यात वेळ अमावस्या उत्साहात साजरी

## शेतशिवार माणसांनी गेले होती फुलून...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव,दि.३० डिसेंबर -**

जिल्ह्यात वेळ अमावस्या उत्साहात साजरी करण्यात आली. शेतकऱ्यांनी कुटुंबीयांसह, मित्र परिवार, नातेवाईक यांनी वनभोजनाचा आनंद घेतला. शहर आणि गावातील रस्ते आज सुनसान होते तर शेतशिवार माणसांनी फुलून गेले होते. जिल्ह्यात वेळ अमावास्या मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते. यादिवशी शासकीय सुट्टी जरी जाहीर करण्यात येत नसली तरी अघोषित सुट्टीच असते. यावेळी तर सलग तीन दिवस सुट्टी असल्याने शुक्रवारी दुपारनंतर अनेकांनी गावाकडची वाट धरलेली होती. काट्याकुटाचा रस्ता तुडवत सर्वांची पावले शेतशिवाराकडे वळली होती.

भज्जी, आंबील, उकडीचे ज्वारी, बाजरीचे उंडे, चपाती, पुरणपोळी, तीळाची पोळी, गव्हाची खीर, धपाटे, कच्ची मेथी, कांदा, ज्वारी बाजरीची भाकरी असे विविध पदार्थ खाऊन झाडाखाली थोडी झोप घेऊनच सर्वजण परतीला निघतात.

उमरगा, तुळजापूर, धाराशिाव लोहारा तालुक्यासह जिल्ह्यातील अनेक गावात वेळ आमवस्या हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

वेळ आमावस्या म्हणजे ग्रामीण भाषेत 'येळवस' हा सण मूळ कर्नाटकातील असला तरी मराठवाड्यातील काही जिल्ह्यात साजरा केला जातो. पेरणीनंतर येणाऱ्या सातव्या अमावस्येला हा सणसाजरा केला जातो. मार्गशीष अमावस्या म्हणजेच वेळ अमावस्या.



**धाराशिव :** भाजपचे तुळजापूर विधानसभेचे आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी शेतकरी संस्कृती जपणाऱ्या काळ्या आईची, मातीपासून बनवलेल्या पांडवांची पूजा वेळ अमावस्येनिमित्त आपल्या शेतात जावून पूजा केली. यावेळी त्यांनी हा सण बळीराजाला अधिक समृद्धी देणारा ठरावा अशी निसर्गाकडे प्रार्थना केली.

शेतकरी शेतीला आई समजून त्याचीमशागत करतो. त्याच्यातून धान्य पिकवतो व त्याच्यातून शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह होतो अशा काळ्या आईचीकृतज्ञता व्यक्त करण्याचा शेतकऱ्यांचा हा दिवस.

या दिवशी गावात अघोषित संचारबंदी होऊन प्रत्येक शिवारम ाणसांच्या गर्दीने फुलवून जातो. थंडीच्या या काळात विविध भाज्या शेतामध्ये उपलब्ध असतात, त्या सर्वभाज्यांचे मिश्रण करून त्याची भाजी (भज्जी) बनवली जाते. तर बाजरीच्या पिठा पासून उकडलेले बाजरीचे उंडे बनवले जातात. हा सण थंडीच्या ऋतूमध्ये असल्याने उष्ण पदार्थापासून बनलेल्या अन्नाचा यात समावेश होतो.

### या पदार्थाची असते मेजवानी...

बाजरीचे उंडे, वांग्याचे भरीत, तिळासोबत बनविलेल्या बाजरीच्या भाकरी, भज्जी, गुळ घालून बनवलेली खीर, याबरोबरच हे अन्न पाचविण्यासाठी ज्वारीचे पीठ रात्रभर ताकात मुरवून केलेली स्वादिष्ट आंबील असे जेवण या दिवशी केले जाते. त्याचबरोबर रानातील विविध रानमेव्याचा आनंद या दिवशी लुटला जातो. बोर, मोहोळ, बीबीचे फुलं अशा अनेक रानमेव्याचा आनंद या दिवशी घेण्यात येतो. इतर वेळी शेताकडे न फिरकणारेही आजच्या दिवशी शेतात थांबून मनसोक्त निसर्गाचा आनंद घेतात. त्यानंतर परतीची वाट धरतात. पुढील वर्षी हा सण कधी येईल याची आतुरतेने वाट पाहतात.



## 'बालाघाट'चे युवामहोत्सवात यश

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० डिसेंबर -**

कला विज्ञान व वाणिज्य म हाविद्यालयाच्या विद्यार्थी कलावंतांनी छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या युवा महोत्सवात लोक आदिवासी नृत्य या प्रकारात प्रथम तर लोकगीत या प्रकारात द्वितीय क्रमांकाचे यश मिळविल्या बद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. युवक महोत्सवात यश संपादन केलेल्या विद्यार्थी कलावंताचे संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री मधुकरराव चव्हाण व संचालक बाबुराव चव्हाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी बोलतांना मधुकरराव चव्हाण यांनी म्हटले की, विद्यार्थ्यांनी स्वतःला सिद्ध करण्यासाठी नेहमी धडपड केली पाहिजे, तरच यश मिळु शकते हे सर्व तुमच्या परिश्रमाचे श्रेय आहे. ग्रामीण भागामध्ये आपल्या अवतीभोवती अनेक लोककला आहेत की ज्या लोप पावत जातात की काय अशी शंका असताना युवा महोत्सवाच्या माध्यमातुन विद्यार्थी कलावंतांच्या द्वारे ही कला जोपासली जाते आहे, याचा आनंद होत आहे. या लोककलांना विद्यार्थी जतन करताना दिसून येते आहे याचे कौतुक केले.

महाविद्यालयातल्या विद्यार्थी कलावंतांनी लोक आदिवासी नृत्य, लोकगीत, लावणी, समुह गायन, सुगम गायन, भजन, वक्तृत्व, काव्यवाचन, रांगोळी, कोलाज, चित्रकला, प्रश्नमंजुषा अशा १२ कला प्रकारात आपला सहभाग नोंदवुन सादरीकरण केले. महाविद्यालयातील रामकृष्ण चव्हाण, रुपेश चव्हाण, अर्चना चव्हाण, किर्ती इटकरी, वैष्णवी सुतार, सुधामती काळे, वृषाली गायकवाड, मुस्कान शेख, श्वेता नाईक, अनुष्का सोनवणे, सोनाली काळे या विद्यार्थी कलावंतांनी सहभाग घेऊन आपल्या कलेचे उत्कृष्ठ सादरीकरण करून यश मिळविले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष राठोड, कार्यालयीन अधिक्षक धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शाखाली सांस्कृतिक विभागातील सर्व प्राध्यापकांनी यशस्वी विद्यार्थांना मार्गदर्शन केले.

सर्व यशस्वी कलावंतांचे व म ार्गदर्शकांचे संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव चव्हाण, सचिव उल्हास बोरगावकर, कार्याध्यक्ष रामचंद्र आलुरे, उपाध्यक्ष डॉ.अभय शहापुरकर, कोषाध्यक्ष प्रदीप मंटगे, सहसचिव शहबाज काझी, लिंबराज कोरेकर, प्रकाश चौगुले, बाबुराव चव्हाण, प्राचार्य डॉ.सुभाष राठोड, कार्यालयीन अधीक्षक धनंजय पाटील, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

## लोहारा तालुका, जळकोट परिसरात वेळ अमावस्या साजरी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, जळकोट, दि.३० डिसेंबर -**

बळीराजाच्या आनंदाचा दिवस म्हणजे वेळ अमावस्या... काळया आईची पूजा करण्याचा दिवस म्हणजे वेळ अमावस्या... हा शेतकऱ्याचा सण ... लोहारा तालूका, जळकोटसह परिसरातील शिवारात मोठ्या आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. शिवारं-शिवारं वनभोजनाने फुलून गेल्याचे दृश्य दिसून आले.

जळकोटसह परिसरातील हंगरगा, नंदगाव, सिंदगाव, बोरगाव, सलगरा, बोळेगाव, कुंसावळी, घोळसगाव, मुरटा, होर्टी, सलगरा (म), किलज, लोहगाव, येडोळा, वागदरी, दस्तापुर, आष्टा, जेवळी, येणेगुर, डाळिंब,



फनेपूर, हराळी, मुरूम आदि गावच्या तसेच लोहारा तालुक्यातील शेतकरी व नागरिकांनी वेळात वेळ काढून काळ्या आईचे ऋण व्यक्त करत पुजन करून वनभोजनाचा आनंद घेतला.

सध्याच्या युगात आधुनिक तंत्रज्ञानामध्ये वाहनांची संख्या वाढली आहे. बैलगाडीमध्ये बसून जाण्याचे चित्र कमी प्रमाणात पहावयास मिळाले. त्यातल्या त्यात बच्चे कंपनी आनंदाने व उत्साहाने बैलगाडीमध्ये बसून शेताला जात असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

शेतकऱ्यांनी आपल्या स्वतःच्या शेतात पांडव पूजा मांडून सहकुटुंब सहपरिवार पूजा केल्याचे चित्र दिसून आले. वन भोजनामध्ये खीर, आंबील, शेंगाच्या पोळ्या, भजी, उंडे असा वन भोजनाचा बेत अनेकांनी आखून त्यावर ताव मारतानाचे चित्र शिवारा शिवारात दिसून आले.

## इटकळ ग्रामीण पत्रकार संघाच्या दिनदर्शिकेचे रविवारी प्रकाशन

### धार्मिक क्षेत्रातील, उद्योगात नाविन्यपूर्ण, उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना पुरस्काराने गौरविण्यात येणार

**तभा वृत्तसेवा**
**मंगरुळ, दि.३० डिसेंबर -**

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी इटकळ ग्रामीण पत्रकार संघाच्या



२०२५ दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा रविवार दि.५ जानेवारीरोजी सायंकाळी ५ :०० वाजता निवांता रिसॉर्ट इटकळ ता. तुळजापूर येथे आयोजित करण्यात आला आहे. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी विविध क्षेत्रात नाविन्यपूर्ण व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान सोहळाही आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण व उद्घाटक म्हणून हभप ज्ञानेश्वर रामकृष्ण महाराज दिंडेगावकर व माजी जि.प.सदस्य अझर मुजावर तर प्रमुख पाहुणे म्हणून शेंडगे रिसर्च सेंटरचे डॉ.राजाराम शेंडगे, तुळजाभवानी शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सुनील चव्हाण, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष (अजित पवार गट) महेंद्र धुरगुडे, नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे, संजीवनी सामाजिक संस्था अणदूरचे नागनाथ कुंभार, जितेंद्र कानडे, माजी जि.प.सदस्य वसंत वडगावे, ग्रा.पं. कार्यालय इटकळचे सरपंच साहेब क्षिरसागर, उपसरपंच फिरोज मुजावर, पोलीस उपनिरीक्षक महेश घोडके, तरुण भारतचे जिल्हा प्रतिनिधी प्रमोद राऊत, युवा नेते आशिष सोनटक्के, ऋषी मगर, सुनील रोचकरी हे उपस्थित राहणार आहेत. या दिनदर्शिका व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांच्या पुरस्कार वितरण सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे अवाहन अध्यक्ष दिनेश सलगरे, उपाध्यक्ष लियाकत खुदादे, केशव गायकवाड, चांदसाहेब शेख, बालाजी गायकवाड, नामदेव गायकवाड यांनी केले आहे.

गेल्या चौदा वर्षांपासून इटकळ ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने दिनदर्शिका प्रकाशन व विविध क्षेत्रांत नाविन्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात येत असून यावर्षी वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणाऱ्या २६ जणांचा व ५ युवा उद्योजकांचा सन्मानपत्र, पुष्पगुच्छ, शाल श्रीफळ, पेन देऊन गौरविण्यात येणार आहे. यापूर्वी शिक्षक, माजी सैनिक, पोलीस पाटील, कोरोना काळात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्याना गौरविण्यात आले आहे.

## तेरखेडा-नांदगावमार्गे शिर्डीला जाणाऱ्या रस्त्याची प्रचंड दुरावस्था

### रस्त्याच्या दुतर्फा झाडे झुडपे वाढल्याने वाहन चालवणे झाले जिकिरीचे...संबंधित अधिकारी निद्रावस्थेत...

**तभा वृत्तसेवा/ सुधीर घोलप**
**तेरखेडा,दि.३० डिसेंबर -**

गाव खेड्याचा विकास झाला तर शहराचा विकास होतो. मात्र शहरांना जोडणारे रस्ते व्यवस्थित नसले तर याचा परिणाम दळणवळणावर होतो. रस्ते व्यवस्थित नसले तर शेतकऱ्यांचा माल वेळेवर बाजारात विक्रीसाठी उपलब्ध होत नाही. गावखेड्यातील मुलामुलींना शिक्षणासाठी वेळेवर शहरात जाता येत नाही. गावखेड्यातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उद्भवल्यास रस्ता खराब असल्याने उपचारासाठी जात असताना विलंब होत आहे. देशात, राज्यात अनेक नवनवीन रस्ते झाले असून रस्त्याचे मोठे जाळे विणले गेले आहे. मात्र गाव खेड्याकडे याचा अभाव असल्याचा दिसून येत आहे.

वाशी तालुक्यातील तेरखेडा, नांदगाव मार्गे शिर्डीला जोडणाऱ्या रस्त्याची मोठी दूर अवस्था झाली आहे. मागील अनेक दिवसांपासून या रस्त्यावरती मोठ मोठे खड्डे पडलेले आहेत. खड्ड्यात रस्ता



की रस्त्यात खड्डा हे समजणे मुश्किल झाले आहे. रस्ता खराब असल्याने या रस्त्यावरती अनेक छोटे-मोठे अपघात झाले आहेत. दळणवळणाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा रस्ता आहे.

तेरखेडा, नांदगाव, भूम या रस्त्याने अनेक गावाचा संपर्क जोडला जात असून, पुढे हा रस्ता जामखेड, अहिल्यानगर, आणि शिर्डीला जोडला जात आहे. त्यामुळे या रस्त्याने आंध्रा, कर्नाटक, तेलंगणा तसेच महाराष्ट्रातील भाविक शिर्डी साईबाबांच्या दर्शनाला जाण्यासाठी जवळचा मार्ग म्हणून याच रस्त्याचा वापर करत असतात. मात्र रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाल्यामुळे भाविकांना दर्शनासाठी जात असताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच

खेड्याची जीवन वाहिनी समजली जाणारी लाल परी याच रस्त्याने दिवसभरात धावत असते. रस्ता खराब असल्याने लाल परीतून प्रवास करत असताना नागरिकांना बैलगाडीत बसल्यासारखे वाटत आहे,असे नागरिक सांगत आहेत. खराब रस्ता असल्याने कंबर दुखी, पाठ दुखी, मनके दुखी सारखे आजार उद्भवत आहेत. तरी देखील संबंधित विभागाचे याकडे दुर्लक्ष आहे. यावरून या खात्याचा भांगळ कारभार समोर येत आहे. नांदगाव गावापासून काही किलोमीटर अंतरावर गेल्यानंतर या रस्त्यावरती घाट आहे.

घाटात अक्षरशा रस्त्याची चाळन झाली असून रस्त्यावरती गुडघाभर खोल खड्डे पडले आहेत, असेच म्हणावे लागेल. यामुळे वाहन चालकांना वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागत आहे. रस्त्यावर अवघड चढ-उतार आणि धोक्याची वळणे आहेत.

त्यात रस्त्यावर दुतर्फा मोठी झाडे झुडपे वाढली असून समोरून येणाऱ्या वाहनांचा चालकांना अंदाज येत नाही. त्यामुळे अपघात होत आहेत. तसेच रस्ता खराब झाल्याने वाहनांची रहदारी देखील आता कमी झाली आहे. तरी देखील रस्त्या संबंधित अधिकारी मात्र ऑफिसमध्ये फॅन ची हवा खात नो टेन्शनमध्ये आहेत.

## अनुदानासाठी मनसेचे निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३० डिसेंबर -**

सन २०२४ -२५ खरीप मध्ये सोयाबीन पीक काढणे अवस्थेत असताना मोठ्या प्रम ाणे पाऊस झाल्याने पिकाचे नुकसान झाले होते. त्याची शेतकऱ्याने तक्रार करून विमा कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी पंचनामे केले आहेत. त्या चार-पाच महिने झाले असून अद्याप पर्यंत विमा रक्कम मिळाली नाही. तसेच अतिवृष्टी अनुदान मिळाले नाही.

खरीप हंगामातील पिकांची मोठ्या प्रम ाणात घट आले आहेत मालाला भाव नाही तसेच नाफेड मार्फत शासनाची खरेदी अत्यंत संत गतीने चालू आहे. बारदाना नसल्यामुळे केंद्र बंद राहतात. त्यामुळे ना विलाजामुळे सोयाबीन व्यापाऱ्याला कमी भावात विकावे लागते. सन २०२४-२५ चा पिक विमा लवकरात लवकर देण्यात यावा सोयाबीन अतिवृष्टी अनुदान तात्काळ वाटप करावी नाफेड खरेदी केंद्राची संख्या वाढवावी तसेच सोयाबीन खरेदीची मुदत वाढवावी २३-२४ चे सोयाबीन अनुदान शेतकऱ्यांना त्वरित वाटप करावे. नसता प्रशासनाच्या विरोधात मनसेच्या वतीने आंदोलाचा इशारा दिला आहे. निवेदनावर तालुका अध्यक्ष अक्षय चेडे,तसेच श्रीमंत कवडे, शिवशंकर गायकवाड, ओमकार कुदळे यांची स्वाक्षरी आहे.

# विघनवाडी ते राजुरी रेल्वे चाचणी पूर्ण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० डिसेंबर**

बीड वासियांचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या रेल्वेची चाचणी काल बीड जवळील विघनवाडी ते राजुरीपर्यंत करण्यात आली. खासदार बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत ही चाचणी करण्यात आली असून रेल्वेच्या अधिकाऱ्यांना यापुढील रेल्वे मार्गबाबत खासदार सोनवणे यांनी सूचना केल्या आहेत.



अहमदनगर ते बीड परळी रेल्वे मार्ग मध्य रेल्वेचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. २६१. किलोमीटर लांबीचा हा मार्ग करण्यात येत असून पहिल्या टप्प्यात नगर ते अमळनेर असा १००. ८ किलोमीटरचा मार्ग यापूर्वीच पूर्ण झाला होता. यानंतर रेल्वे मार्गातील अमळनेर ते विघनवाडी या अंतरापर्यंत काम ९ ऑगस्ट २०२४ ला हे काम पूर्ण झाल्यानंतर शिरूर तालुक्यातील विघनवाडी ते बीड अशी ३५ किलोमीटर अंतरापैकी नवगण राजुरीर्यंतचे रेल्वे रूळ टाकण्याचे काम देखील पूर्ण झाले आहे. हे काम पूर्ण झाल्याने या मार्गावर रेल्वे चाचणी (दि.३०) सोमवार रोजी घेण्यात आली आहे.

मागील काही वर्षांपासून नगर-बीड-परळी असा रेल्वे मार्ग मंजूर हल्यानंतर मार्ग तयार करण्याचे काम सुरु होते. टप्प्याटप्प्याने या मार्गाचे काम करण्यात येत आहे. आता काही अंतराचे काम बाकी असून ते पूर्ण करण्यासाठी गती मिळाली असून येत्या २६ जानेवारीपर्यंत काम पूर्ण करून बीड पर्यंत रेल्वे मार्ग पूर्ण करण्यात येणार असून बीडपर्यंत रेल्वे पोहचणार असल्याने विकासाच्या दृष्टीने पाऊल आहे.

शिरूर तालुक्यातील विघनवाडी ते राजुरी नवगण पर्यंत ही पहिली चाचणी केली गेली. रेल्वे कृती समितीने यासाठी खूप मोठा लढा घेतला. या लढ्याचे फळ आणि स्वप्न पूर्ण करण्याचं काम माझ्या काळात पूर्ण होत आहे. आज राजुरी पर्यंत ही चाचणी झाली असून दि.२६ जानेवारी पर्यंत रेल्वे बीडपर्यंत रेल्वे येणार असल्याचा शब्द मी पूर्ण केला असल्याचं खासदार सोनवणे यांनी म्हटले आहे.

# जिल्ह्यात १२ जानेवारीच्या मध्यरात्रीपर्यंत मनाई आदेश जारी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० डिसेंबर**

मराठा, ओबीसी,धनगर समाजाचे आरक्षण मागणी अनुषगांने आंदोलने चालू आहेत तसेच आगामी कालावधीत नुतन वर्षे साजरे होणार आहे.सध्या बीड जिल्ह्यामध्ये पोलीस स्टेशन केज येथे दाखल असलेल्या गुन्हयाच्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष व संघटना यांच्याकडून सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने त्यांच्या मागणी करीता अचानक आंदोलन करत आहेत. राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने त्यांच्या न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, आंदोलने, उपोषण, मोर्चे होण्याची शक्यता असून अचानक घडणारे घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच आरक्षणच्या मागणीसाठी सर्व समाज व राजकीय पक्ष आक्रमक आहे या करिता कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी मनाई आदेश जारी करण्यात आले असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे.

दिनांक २९ डिसेंबर २०२४ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते १२ जानेवारी २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.

या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिकाऱ्यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.



केज-दर्श वेळा अमावास्या निमित्त केज तालुक्यातील युसुफ वडगाव येथील शेतकरी बापुसाहेब भुसारी सपत्नीक मनोभावे शेतात पांडवांची पुजा करताना (छाया:-अनिल गलांडे)

# संतोष देशमुख हत्या ही राज्याच्या अस्मितेला कलंक लावणारी ही घटना आहे-ना.रामदास आठवले

## हत्या व खंडणी सर्व आरोपी व मुख्य सुत्रधाराला तात्काळ अटक करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री आणि मुख्यमंत्री यांची भेट घेणार-ना.रामदास आठवले

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३० डिसेंबर**

संतोष देशमुख यांची हत्या ही महाराष्ट्रासारख्या पुरोगामी समाजाला राज्याच्या अस्मितेला कलंक लावणारे घटना असून या हत्याकांड आणि खंडणी प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी. तसेच या प्रकरणाचा तपास जलद गतीने करण्यात यावा. यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्र्याची देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन प्रसार माध्यमाशी बोलताना सांगितले.



केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दि. ३० डिसेंबर रोजी मस्साजोग येथे सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेवून सांत्वन केले. यावेळी त्यांच्या सोबत युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, बाबुराव कदम, मिलिंद शेळके यांच्यासह रिपाईचे नेते उपस्थित होते

बीड जिल्ह्यातील मस्साजोग तालुका केज येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या ही पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्याच्या अस्मितेला कलंक लावणारी आहे तसेच यां घटनेपूर्वी पवन ऊर्जा प्रकल्पात घडलेल्या घटनेची येथील सुरक्षा रक्षाच्या मारहाणीची प्रकरणी पोलिसांनी ट्रॉसिटीची तक्रार दाखल करून घेतली असती तर कदाचित ही घटना टाळता आली असती म्हणून जिल्ह्यात आणि राज्यात पोलिसांच्या कार्यपद्धतीवर रोष व्यक्त होत आहे. या घटनेतील गुन्हेगारांची प्रॉपर्टी जप्त करून भागणार नाही तर यातील आरोपींना पकडणे आवश्यक आहे. चार आरोपी पकडले असून अद्यापही तीन आरोपी फरार आहेत. इतर आरोपी ताब्यात घ्यायला एवढा वेळ लागतो ? महाराष्ट्र पोलीसासाठी ही चांगली नाही पोलिसांनी दवाखाली काम करू नये. हे जे प्रकरण आहे ते अत्यंत गंभीर आहे. सुरक्षा रक्षक अशोक सोनवणे हा सोलार प्रकल्पात काम करीत होते त्यांना मारहाण झाल्यामुळे

संतोष देशमुख हे भांडण सोडवायला गेले होते. त्यामध्ये ट्रॉसिटी लावणे अत्यंत आवश्यक होते. जर ट्रॉसिटी लावली असती आणि आरोपींना पकडले असते तर ही घटनाच घडली नसती. यामुळे पोलीसावर लोकांचा संशय आहे. हे अत्यंत गंभीर आहे. केज आणि बीड येथील पोलिसांवर लोकांचा संशय आहे. जिल्हा पोलीस अधीक्षकांची बदली झालेली आहे. नवीन आलेल्या जिल्हा पोलीस अधीक्षकांनी यात लक्ष घालावे. यासंदर्भात मी या सदर्भात मी त्यांच्याशी बोलणार आहे. असे रामदास आठवले म्हणाले.

तसेच मुख्यमंत्र्यांशी देखील ते बोलणार आहेत. देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळाला पाहिजे. संतोष देशमुख यांची आई आणि त्यांच्या कुटुंबीयांची त्यांनी भेट घेतले आहे. या कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे अशी त्यांची आणि रिपब्लिकन पार्टीची मागणी आहे. असे तेंमहबके. तर या प्रकरणी ते केंद्रीय गृहमंत्री अमित शाहा यांची देखील भेट घेणार आहेत. परंतु त्या अगोदर ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील भेट घेणार आहे. या प्रकरणातील सर्व आरोपी आणि त्यांचे मास्टरमइंड यांना तात्काळ अटक झाली पाहिजे. ही घटना घडवून २१ दिवस लोटले आहेत. तरी अद्याप पर्यंत सर्व आरोपी अटक झालेले नाहीत. हे आश्चर्य आहे. अद्याप पर्यंत पोलिसांनी देशमुख यांच्या कुटुंबीयातील कोणाचेही स्टेटमेंट घेतलेले नाही. घटना घडल्या नंतर पहिल्या दोन-तीन दिवसांमध्ये पोलिसांनी त्यांचे स्टेटमेंट घेणे आवश्यक होते. अशा प्रकरणांमध्ये त्या कुटुंबाचे लवकरात लवकर स्टेटमेंट घेतले जातात पण पोलिसांनी त्यांचे लवकरात लवकर विनाविलंब स्टेटमेंट घ्यावे. या प्रकरणाची सविस्तर चौकशी करून उर्वरित सर्व आरोपी यांना तात्काळ ताब्यात घेण्यात यावे. त्या आरोपींना पकडलेच पाहिजे अशी आमची भूमिका असून सर्व आरोपी आणि त्याचा सूत्रधार यांच्या अटकेची मागणी रामदास आठवले यांनी केली आहे.

यावेळी त्यांच्या सोबत राजू जोगदंड, महावीर सोनवणे, अशोक साळवे, किशोर कांडेकर, अविनाश जावळे, किसन तांगडे, मझर खान, सुरेश माने, रविराज माळाळे, मायाताई मिसळे, राणी गायकवाड, गोवर्धन वाघमारे, उत्तम आप्पा मस्के, बापू पवार, सादेक कुरेशी, भाई उजगरे, महादेव उजगरे, अरुण निकाळजे, अरुण भालेराव, दीपक कांबळे, धोंडीराम सिरसट, प्रमोद दासुद, सुभाष तांगडे, संदीपान डोंगरे, राहुल सरवदे, अविनाश जोगदंड, सतीश शिनगारे, प्रभाकर चांदणे, विलास जोगदंड, शाम विर, नागेश दुबळे, भाऊसाहेब दळवी, रतन वाघमारे, संभाजी गायकवाड, ईश्वर सोनवणे, राजेश सोनवणे, अक्षय कोकाटे, धम्मा पारवेकर आणि दिलीप बनसोडे, रवी जोगदंड, गौतम बचुटे, सूरज काळे, हरेंद्र तूपारे, प्रशांत हजारे, हरीश गायकवाड, दादाराव धेंडे, विनोद शिंदे, रोहित कांबळे, रोहित बचुटे आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# माजलगाव शहर पोलिसांचा अवैध दारु साठ्याच्या वर छापा

## ११,००० रुपयांची दारू जप्त



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३० डिसेंबर**

माजलगाव शहर पोलिसांनी आज अवैध दारूवर छापा टाकला. माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल (पोकॉ) कदम यांना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, माजलगावच्या बायपास रोडवरील विजय हॉटेल आणि गौतम नगर येथे अवैध दारूची विक्री सुरू आहे.

त्यानुसार, माजलगाव शहर पोलिसांनी त्वरित त्या ठिकाणी छापा मारला. या कारवाईत पोलिसांना २७ बाटल्या 'टँगो पंच' कंपनीच्या देशी दारूच्या, ५ बाटल्या 'मॅग्डॉल' कंपनीच्या, ६ बाटल्या 'ऑफिसर चॉईस बिल्यु' कंपनीच्या आणि ५ बाटल्या 'इम्पेरियल ब्लू' कंपनीच्या विदेशी दारूचा साठा मिळाला. या दारूचा एकूण किंमतीचा अंदाज ५१०० रुपये आहे.

हॉटेलचे चालक प्रशांत रंगनाथराव खरात (वय ३५, रा. बिलालमोहल्ला, माजलगाव) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. यानंतर, गौतम नगर येथे छापा मारून गावठी हातभटीच्या २७ लिटर दारूचा साठा जप्त करण्यात आला, ज्याची किंमत ५९०० रुपये आहे. या सगळ्या अवैध दारूचा एकूण किंमत ११,००० रुपये इतका झाला आहे.सदरची कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक नवनित कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, सहा पोलीस अधीक्षक कमलेश मिना, उपविभागीय पोलीस अधिकारी केज कमलेश मिना, माजलगाव शहर पोलीस निरीक्षक आर.के. सुर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली केली गेली. पोलिसांच्या पथकात पोहवा राम भंडाणे, पोहवा अनिल भालेराव, पोकॉ अमोल कदम, पोकों श्रीगणेश मिरकले आणि मपोकों रविना जाधव यांचा समावेश होता.कारवाईत मिळालेल्या दारूसाठ्यामुळे माजलगाव शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

# सोशल मिडीयावरुन दहशत निर्माण करणाऱ्या पोस्ट व्हायरल केल्यास अथवा फॉरवर्ड केल्यास होणार कठोर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० डिसेंबर**

बीड जिल्हा पोलीस अधिक्षक श्री नवनीत कॉंवत यांनी जिल्हयातील सर्व जनतेला आवाहन केले आहे की, कोणीही मोबाईल व इंटरनेटचा वापर करुन आपल्याकडे असलेले वैध अथवा अवैध शस्त्राचे (फोटो व्हीडीओ) सोशल मिडीयाव्दारे प्रदर्शित करु नये. तसेच एखाद्या मारामारीच्या घटनेतील रेकॉर्ड केलेला फोटो/व्हीडीओ, शिव्या देतांनाचा व्हिडीओ अथवा समाजात दहशत किंवा भिती निर्माण होईल अशी कोणतीही पोस्ट कोणत्याही सोशल मिडीया अकाउंटवरुन शेअर करु नये, अथवा फॉरवर्ड करु नये. तसेच ज्यांनी कोणी यापुर्वी अशा प्रकारच्या पोस्ट



सोशल मिडीयाव्दारे प्रदर्शित केल्या असतील/शेअर केल्या असतील किंवा फॉरवर्ड केल्या असतील त्या त्यांनी तात्काळ सोशल मिडीयावरुन डिलिट कराव्यात.

समाज माध्यमांवर (सोशल मिडीया)

### पोलीस अधिक्षक बीड यांच्याकडून जनतेला आवाहन

अशा प्रकारे कोणीही शस्त्राचे, मारामारीचे अथवा शिवीगाळ केल्याचे किवा ज्यामुळे समाजात भिती व दहशत निर्माण होईल असे फोटो व्हीडीओ प्रदर्शित करील, लाईक करील किंवा फॉरवर्ड करील तसेच ज्यांनी कोणी यापुर्वी सोशल मिडीयावरुन अशा पोस्ट केल्या आहेत. परंतू आम्ही दिलेल्या सुचनेनंतरही त्या पोस्ट डिलिट केल्या नाहीत. तर अशा व्यक्तींविरुध्द तात्काळ भारतीय न्याय संहिता, माहिती तंत्रज्ञान अधिनियम तसेच इतर कायद्यान्वये योग्य ती कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

# विद्यापीठ युवक महोत्सवात सावरकर महाविद्यालयाला तीन पारितोषिके

## जलसा, लोकनाट्य,भजनाचेही उत्कृष्ट सादरीकरण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० डिसेंबर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर द्वारा आयोजित केंद्रीय युवक महोत्सवात शास्त्रीय गायन प्रथम, काव्यवाचन द्वितीय, मृदुमूर्तिकला तृतीय ही तीन पारितोषिके मिळाली आहेत. लोकनाट्य जलसा आणि भजन या प्रकाराचेही महाविद्यालयाने उत्कृष्ट सादरीकरण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या युवक महोत्सवात महाविद्यालयाचा संघ सहभागी झाला होता. महाविद्यालयाने भारतीय शास्त्रीय गायन, सुगम गायन, तालवाद्य, भजन मृदूमूर्तीकला, काव्यवाचन, रांगोळी, जलसा, लोकनाट्य, स्पॉट फोटोग्राफी, शोभायात्रा या कलाप्रकारांमध्ये सहभाग नोंदवला. भारतीय शास्त्रीय गायन प्रकारात महाविद्यालयाचा विद्यार्थी चिरंजीव वेद दीपक मुळे याने उत्कृष्ट सादरीकरण केले आणि प्रथम क्रमांक पटकावला. त्याला गुरुवर्य पंडित हेमंत पेंडसे ,गुरुवर्य श्री. नामदेव साळुंके , पालक, तसेच संगीत विभाग प्रमुख डॉ. रूपाली कुलकर्णी, श्रीमती दीपा देशपांडे, श्रीमती. आसावरी राऊत यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी अंजली जालिंदर शिंदे हिने काव्यवाचन प्रकारामध्ये द्वितीय पारितोषिक पटकावले. मृदुमूर्तीकला या कलाप्रकारात कु. ऋतुजा काळे हिने तृतीय क्रमांक पटकावला. तिला डॉ. जोगेंद्र गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच महाविद्यालयाने जलसा या सांघिक कलाप्रकारात डॉ. जोगेंद्र गायकवाड लिखित जलस्याचे उत्तम सादरीकरण केले. प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद या जलशाला मिळाला.महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. सुहास मोराळे सर यांचे युवक महोत्सवातील सर्व संघास मार्गदर्शन व सहकार्य लाभले. पुरुष संघ प्रमुख म्हणून सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. राम् गव्हाणे आणि डॉ. जोगेंद्र गायकवाड, डॉ. रुक्मिणीकांत पांडव आणि महिला संघ प्रमुख म्हणून डॉ. रुपाली कुलकर्णी आणि कु. आसावरी राऊत यांनी संघास प्रेरणा दिली.

## रेट्रो ते मेट्रो संकल्पनेवर थिरकले डॉक्टर्स
### धन्वंतरी नाईटने जिंकली शहरवासीयांची मने



छ. संभाजीनगर – पंजाबी गीतांचा ठेका, गुजराती दांडियाची खंक तर महाराष्ट्रीन लावणीचा ठेका असे विविध राज्यातील नृत्य आणि संगीतातील विविध रंग उधळत महिला डॉक्टरांनी मंचावर बहारदार सादरीकरण केले. विविधतेतून साकारलेल्या एकतेच्या रंगात शहरवासीय रंगून गेले. पुकारता चला हु मै, मेरी सपनो कि राणी कब आयेगी टू अशी सुमधुर साद घालत डॉ. संजय पटणे आणि त्याच्या साथीदार डॉक्टरांनी कार्यक्रम उत्तरोत्तर रंगवत नेला.

निमित्त होते शहरातील फिजिशियनी सादर केलेल्या धन्वंतरी नाईटचे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे आणि आयएमए च्या अध्यक्ष डॉ. उज्ज्वला दहिफळे यांच्या हस्ते आणि संघटनेचे अध्यक्ष डॉ. संजय पटणे, आणि सचिव डॉ. अनंत कुलकर्णी यांच्या उपस्थितीत धन्वंतरीच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. डॉ. शामली भारुका यांच्या गणेश वंदना सादर केल्यानंतर रेट्रो ते मेट्रो संकल्पनेवर आधारित गीतांचे सादरीकरण कार्यक्रमाचा सर्वोच्च क्षण होता. पुकारता चला हु गाण्यापासून सुरु झालेली ही मैफल डॉ. संजय पाटणे, डॉ. सुरेंद्र जैस्वाल, आनंददीप अग्रवाल, डॉ.अजय उकडगावकर , डॉ. अमोल कुलकर्णी, मंजिरी नाईक, मिलिंद खर्चे, गीतेश दळवी यांनी एकापेक्षा एक गाणी सादर करत खुलवत नेली.

वरिष्ठ ते तरुण महिला फिजिशियन्स डॉ. मंगला बोरकर, डॉ. ज्योती गयाळ, डॉ. सोनाली भट्ट, डॉ. शैलजा राव, उज्ज्वला झंवर, यशस्विनी तुपकरी यांनी मंचावर विविध राज्यातील नृत्य प्रकार सादर करत अवघा भारत मंचावर उभा केला. डॉ. अजित कडेठाणक्र यांच्या गिटार वादनाची रंगत मैफिलीत पसरली होती. राजकीय नेत्यांची मिमिक्री सादर करत डॉ. अजय पोहेकर यांनी वर्मावर घाव घातला. मल्हारी गाण्यावरील धमाकेदार नृत्य रणजीत पालकर, शरद बिरादार आणि समीर महाजन या डॉक्टरांनी सादर केले.

माजी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ, सुंदर कुलकर्णी, डॉ. नंदकुमार उकडगावकर, डॉ. अमृत महाजन यांच्या उपस्थित शहरातील अनेक मान्यवर डॉक्टर आणि स्नेही कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ अभय पोहेकर, डॉ अजीत अन्नछत्रे , डॉ अजिंक्य देशमुखयांनी बहारदार सूत्रसंचालन करत कार्यक्रमाची रंगत वाढवत नेली. डॉ. अनंत कुलकर्णी यांनी आभार मानले. व्यस्त दिनक्रमातून वेळ काढत, स्वताच्या कलागुणांना वाव देत डॉक्टरांनी स्वतासाठी वेळ काढला. त्यांच्या चेहऱ्यावर हा आनंद फुलून आला होता.

## शहर पाणीपुरवठा योजना; संयुक्त तांत्रिक पाहणी करुन अहवाल सादर करावा- इ.मा.व.कल्याण मंत्री अतुल सावे

छत्रपती संभाजीनगर, दि.३०(जिमाका):-राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या दोनही विभागांनी पैठण ते छत्रपती संभाजीनगर रस्ता व त्याच रस्त्यालगत होत असलेल्या शहर पाणीपुरवठा योजनेच्या कामाची मनपा समवेत संयुक्त तांत्रिक पाहणी करावी व अहवाल सादर करावा. पहिल्या टप्प्यात मार्च मध्ये पाणीपुरवठा सुरु होईल असे नियोजन करावे,असे निर्देश इतर मागास वर्ग व बहुजन कल्याण, तसेच दुग्धविकास व उर्जा नुतनीकरण मंत्री अतुल सावे यांनी आज दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात शहर पाणीपुरवठा योजनेच्या प्रगतीबाबत आज बैठक पार पडली. राज्याचे इतर मागास वर्ग व बहुजन कल्याण, तसेच दुग्धविकास व उर्जा नविनीकरण मंत्री अतुल सावे, खासदार संदिपान पाटील भुमरे, खासदार डॉ. कल्याण काळे, विधानसभा सदस्य आ. अनुराधा चव्हाण, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, मजिप्राच्या मुख्य अभियंता मनिषा पलांडे, कार्यकारी अभियंता दीपक कोळी, मनोज पाठक मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे अनिकेत कुलकर्णी, जेव्हीपीआर कंपनीचे जी.मेहंदर, खलील अहमद, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे मुख्य अभियंता रवींद्र इंगोले, महानगरपालिकेचे अभियंता ए. बी. देशमुख, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अभियंता किरण पाटील यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी पाणीपुरवठा योजनेचे कामकाज करणारे कंत्राटदार आणि शेतकरी बैठकीस उपस्थित होते.

बैठकीत प्रारंभी मजीप्रातर्फे माहिती सादर करण्यात आली. त्यानुसार, महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत शहर पाणीपुरवठा योजनेला २०१९ मध्ये मान्यता मिळाली. या योजनेचा अमृत २.० योजनेत समावेश करुन त्यास सुधारीत मंजूरी घेण्यात आली. आता पर्यंत १८०८ कोटी ३९ लक्ष रुपयांचा निधी प्राप्त झाला असून आतापर्यंत १५८३ कोटी ३२ लक्ष रुपये इतका निधी खर्च झाला आहे.

याअंतर्गत उद्भव विहिरीच्या (जॅकवेल) उभ्या भिंतीचे काम ११.९ मिटर उंचीपर्यंत पूर्ण झाले असून वर्तुळाकार भिंतीचे २२.७ मिटर उंचीचे काम पूर्ण झाले आहे. उपांग कामांमध्ये पुलाचे काम ७५ टक्के पूर्ण आहे. पाईपलाईन अंथरण्याचे काम ८८ टक्के पूर्ण झाले आहे.जलाभिसरण कारंजाचे आरसीसी काम ९० टक्के, आऊटलेट चेंबर ७२ टक्के पूर्ण, सीएलफचे काम ९५ टके पूर्ण,पम्प हाऊस व केमिकल हाऊसचे काम अनुक्रमे ७० व ७५ टक्के पूर्ण झाले आहे. या शिवाय ४७ उंच जलकुंभ व ३ बैठे जलकुंभ असे एकूण ५० जलकुंभ तयार करण्यात येणार आहेत. त्यातील ७ उंच जलकुंभ पूर्ण झाले आहेत. २ बैठे जलकुंभ पूर्ण झाले आहेत. उर्वरीत जलकुंभ ९० टक्क्यांहून अधिक कामे पूर्ण झाली आहेत. पूर्ण झालेल्या जलकुंभांच्या कार्यकक्षेत घरगुती जोडण्यांचे कामेही सुरु आहेत,अशी माहिती देण्यात आली.

राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत रस्त्याच्या कामाबाबत माहिती सादर करण्यात आली. या योजनेसाठी पैठण ते छत्रपती संभाजीनगर या रस्त्यालगत ८ मिटर अंतरापर्यंत अस्तित्वातील १२०० मिमी पाईप लाईनच्या बाजूने नवीन २५०० मिमी पाईपलाईन टाकण्याचे काम सुरु आहे. जमिनीखाली मंजूर पाईप लाईन टाकल्यास व त्यावरुन रस्ता गेल्यास भविष्यात पाईपलाईनची देखभाल करण्याविषयी निर्माण होऊ शकणाऱ्या प्रश्नांबाबत व याबाबतच्या तांत्रिक शक्यतांवर चर्चा करण्यात आली.

श्री. सावे म्हणाले की, रस्त्याचे व जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्यानंतर जलवाहिनीची देखभाल दुरुस्ती करतांना रस्ता खोदावा लागू नये. यासाठी कार्यान्वयन यंत्रणा व मनपा या तिघाही यंत्रणांनी मिळून संयुक्त तांत्रिक पाहणी करावी. येत्या चार दिवसात त्याचा अहवाल सादर करावा. येत्या मार्च पर्यंत पहिल्या टप्प्यातील २०० दलघमी पाणी शहराला पुरवठा करावे,असे निर्देश श्री. सावे यांनी दिले. तसेच या कामाची हायड्रॉलिक तसेच रेडिओग्राफिक चाचणी घेतल्यानंतरच संबंधित ठेकेदाराचे देयक अदा करावे,अशी सुचनाही श्री. सावे यांनी दिली.

ही योजना आगामी ५० वर्षांसाठी तयार करण्यात आली असून आगामी कालावधीत कोणत्याही अडचणी निर्माण होऊ नये याबाबत उपाययोजना कराव्या. लोकांना पाणी मिळावे, पैठणकडे जाणारी तसेच बिडकीन व चितेगाव या रस्त्यालगतच्या गावातील रहदारी सुरळीत व्हावी, यादृष्टीने उपाययोजना कराव्या,असे निर्देश खा. संदिपान भुमरे यांनी दिले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले की. कार्यान्वयन यंत्रणांनी आपापसात समन्वय राखून काम वेळेत पूर्ण करावे.

मनपा आयुकत जी.श्रीकांत यांनी या योजनेचे काम पूर्ण करुन शहरवासियांना पाणीपुरवठा करणे हेच मनपाचे प्राधान्य असून त्यासाठी सर्व कार्यान्वयन विभागांनी मिळून संयुक्त प्रयत्न करावे,असे सांगितले.

## कामगारांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.३०(जिमाका):- उद्योगात काम करणाऱ्या कामगारांची सुरक्षा राखणे हे कायद्याने बंधनकारक आहे. कामगारांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत यासंदर्भात एक जिल्हास्तरीय समिती तयार करुन या समितीने सर्व आस्थापनांमध्ये तपासणी पाहणी करावी व तसा अहवाल दरमहा सादर करावा,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे दिले.



औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचा आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेण्यात आला. अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी हे होते. निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, औद्योगिक सुरक्षा विभागाचे सहसंचालक प्र.वि. सुरसे, उपसंचालक धिरा. खिरोडकर, सहा. संचालक श्रीमती गायकवाड, ग.बा. पाचवणे, कामगार कल्याण अधिकारी चंद्रकांत राऊत यावेळी उपस्थित होते.महाराष्ट्र कारखाने नियम व महाराष्ट्र कारखाने नियम २००३ अन्वये कारखान्यांचे कामकाज व कामगारांची सुरक्षा याबाबत करण्यात येत असलेल्या उपाययोजना व आवश्यक तपासण्या व कारवाई बाबत माहिती देण्यात आली. धोकादायक व अतिधोकादायक कारखान्यांमधील कामगारांची सुरक्षा वेळोवेळी तपासणी होणे आवश्यक असून कामगार व औद्योगिक सुरक्षा अधिनियमानुसार ते बंधनकारकही आहे. याबाबत कामगारांमध्ये तसेच आस्थापना चालकांमध्ये जनजागृतीपर उपक्रम राबवावे. कामगारांना आपल्या सुरक्षा उपाययोजनांविषयी प्रशिक्षित करावे. याबाबत प्रत्येक आस्थापनेत होत असलेल्या सुरक्षा उपाययोजनांच्या अंमलबजावणीच्या तपासणीसाठी एका समितीचे गठन करावे व त्या समितीने आपला अहवाल दरमहा सादर करावा,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

## वीजबिल वसुलीसाठी महावितरणचे मुख्य अभियंता उतरले रस्त्यावर
### थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याची धडक मोहीम सुरु

छत्रपती संभाजीनगर : वीजबिल वसुलीसाठी थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याच्या महावितरणच्या धडक मोहिमेत छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट हे स्वत: रस्त्यावर उतरले आहेत. त्यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोहिमेत सहभागी झाल्याने वीजबिल वसुलीस वेग आला आहे. महावितरणची संपूर्ण यंत्रणा जोमाने कामाला लागली आहे. थकबाकीदार ग्राहकही वीजबिल लगेचच भरून मोहिमेस सकारात्मक प्रतिसाद देत आहेत.

वीजबिलांच्या प्रचंड थकबाकीमुळे महावितरण आर्थिक अडचणीत आलेली आहे. त्यामुळे थकबाकी वसुलीसाठी छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील शहर, ग्रामीण व जालना मंडलात महावितरणची ही मोहीम सुरू करण्यात आलेली आहे. मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांच्यासह सर्व अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते, शाखा अभियंते, तांत्रिक कर्मचारी तसेच विविध संवर्गातील संपूर्ण कार्यालयीन अधिकारी-कर्मचारीही मोहिमेत प्रत्यक्ष ग्राहकांकडे भेट देऊन थकबाकी वसुलीसाठी सरसावले आहेत. अनेक ग्राहक तातडीने बिल भरून सहकार्य करत आहेत. तर जे ग्राहक बिल



भरण्यास प्रतिसाद देत नाहीत, त्यांचा वीजपुरवठा नाईलाजास्तव खंडित करण्याची कारवाई या मोहिमेत करण्यात येत आहे. तसेच थकबाकीपोटी वीजपुरवठा खंडित केल्यानंतरही कुणी ग्राहक अनधिकृतरित्या वीज वापरत असेल तर त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. तरी वीजग्राहकांनी आपली वीजबिलांची थकबाकी व चालू बिले भरून सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरात नक्षत्रवाडी व सिटी चौक शाखा कार्यक्षेत्रात सोमवारी (३० डिसेंबर) राबवण्यात आलेल्या विशेष वसुली मोहिमेत मुख्य अभियंता पवनकुमार कछोट, वरिष्ठ व्यवस्थापक लक्ष्मीकांत राजेल्ली यांच्यासह शहर मंडलातील विविध कार्यालयांतील अभियंते, तांत्रिक कर्मचारी तसेच विविध संवर्गातील संपूर्ण कार्यालयीन अधिकारी-कर्मचाऱ्यांनीही एकाच वेळी या मोहिमेत ग्राहकांना भेट देऊन वीजबिलांची वसुली केली.

## अन्नछत्र प्रसादालयाचे खा. संदिपान भुमरे यांच्या हस्ते होणार शुभारंभ

तभा वृत्तसेवा

पैठण दि ३० :- पैठण नवीन वर्षापासून श्रीसंत एकनाथ महाराज विश्वस्त मंडळाच्या वतीने भाविक भक्तांसाठी अन्नछत्र प्रसादालयाचे खासदार संदिपान भुमरे यांच्या हस्ते बुधवारी दि.१ रोजी शुभारंभ करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी विश्वस्त दादा पाटील बारे यांनी दिले आहे.

श्रीसंत एकनाथ महाराज मंदिर विश्वस्त मंडळाच्या बैठकीत नवीन वर्षापासून श्रीसंत एकनाथ महाराज यांच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी, भाविक भक्तांसाठी समाधी मंदिर परिसरामध्ये सुसज्ज अन्नछत्र प्रसादालय सुरू करण्याचा निर्णय विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष आमदार विलास बापू भुमरे, विश्वस्त सदस्य अप्पर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे, ह.भ.प रघुनाथबुवा गोसावी पालखीवाले, ह.भ.प विठ्ठल चनघटे, डॉ प्रा. गणेश मोहिते यांनी घेतला असून बुधवारी १ रोजी सकाळी ११ वा या अन्नछत्र प्रसादालयाचे खासदार संदीपान भुमरे यांच्या हस्ते शुभारंभ संपन्न होणार असून. वारकरी भाविक भक्तांना अधिक सुविधा देण्यासाठी सर्व विश्वस्त महेश खोचे, पांडुरंग निरखे, कैलास बोबडे, मारुती वाणी, अशोक मिसाळ, राजेंद्र गोरडे, किशोर नरवडे, राजेंद्र मिसाळ, मुकेश निवारे, पठाडे, लादे जानकर, पवार, चोथे परिश्रम घेत आहे.

## जी.डी.सी.ए. व सी.एच.एम. परीक्षा २०२४ निकाल घोषित

छत्रपती संभाजीनगर, दि.३०(जिमाका):-जी.डी. सी.ए. व सी.एच.एम. परीक्षा २०२४ सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या मार्फत मे २०२४ मध्ये घेण्यात आली. या परीक्षेचा निकाल घोषित झाला आहे,असे जिल्हा उपनिबंधक डॉ. मुकेश बारहाते यांनी कळविले आहे. हा निकाल परिक्षार्थ्यांना https://gdcamaharashtra.gov.in या संकेतस्थळावर आपापला लॉगइन व पासवर्ड वापरुन पाहता येईल. तसेच https://sahakarayukta.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर महत्त्वाचे दुवे मधील जी.डी.सी.एड ए मंडळ येथे पहावयास मिळतील. फेरगुण मोजणीसाठी परिक्षार्थ्यांना दि.५ जानेवारी २०२५ पर्यंत https://sahakarayukta.maharashtra.gov.in यावेबसाईटवर आपला लॉगइन व पासवर्ड वापरुन अर्ज करता येईल. फेरगुण मोजणीचे शुल्क भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत प्रत्येक विषयासाठी प्रत्येकी ७५ रुपये या प्रमाणे व अधिक बँक चार्जेस या प्रमाणे चलनाद्वारे भरावे. बँकेचे चलन ऑनलाईन प्राप्त करुन घेण्याची मदत दि.५ जानेवारी २०२५ च्या रात्री साडेदहा (२२.३०) पर्यंत राहील. हे चलन दि.५ ते ८ जानेवारी २०२५ पर्यंत बँकेच्या कामकाजाच्या वेळत भरणा करावे. मुदतीनंतर प्राप्त अर्जांवर विचार होणार नाही,असे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था डॉ. मुकेश बारहाते यांनी कळविले आहे.

## शिवार सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या पुरस्कारांचे थाटात वितरण

छत्रपती संभाजीनगर : जुन्या आठवणी लिहिताना सातत्य, उत्स्फूर्तता आणि निरागसता असल्यास संबंधित लेखन वाचकाला निश्चितच भावते. पण, त्यात कृत्रिमता आणि रुक्षपणा असल्यास भावत नाही. असहिष्णू आणि विषारी वातावरणाचा स्पर्श टाळून संतोष आळंजकर यांनी 'रानभुलीचे दिवस' या पुस्तकात गतकातरता मांडूनही ते प्रेरक आणि ग्रामजीवनाचा इतिहास ठरले आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत जयदेव डोळे यांनी रविवारी, २९ डिसेंबर रोजी येथे केले.




ज्येष्ठ साहित्यिक रा. रं. बोराडे यांच्या 'शिवार सांस्कृतिक प्रतिष्ठान' चा २३ वा 'शेतकरी साहित्य पुरस्कार' संतोष आळंजकर यांना 'रानभुलीचे दिवस' या ललित गद्यसंग्रहासाठी आणि 'संदीप दळवी बालसाहित्य पुरस्कार' गणेश घुले यांना 'सुंदर माझी शाळा' या बालकवितासंग्रहासाठी प्रदान करण्यात आला. रोख ५ हजार रुपये, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. मराठवाडा साहित्य परिषदेच्या नांदापूरकर सभागृहात कार्यक्रमात ज्येष्ठ विचारवंत डोळे यांच्या हस्ते दोघांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वासुदेव मुलाटे अध्यक्षस्थानी होते. शिवार प्रतिष्ठानच्या प्रेरणा दळवी आणि नीळकंठ डाके यांची प्रमुख उपस्थिती होती.

ग्रामीणमध्ये शिक्षणाची आबाळ

डोळे म्हणाले, मागील दहा वर्षांत शिक्षणाचा बट्ट्याबोळ झाला आहे. सर्वत्र शाळेच्या पिवळ्या रंगाच्या बसेस धावताना दिसतात. पण, ग्रामीण भागात शिक्षणाची अवस्था वाईट आहे. या पार्श्वभूमीवर गणेश घुले यांचा 'सुंदर माझी शाळा' हा कवितासंग्रह काही मर्यादांसह उत्तम कविता देणारा आहे. 'ढ' मुलांवरील कवितेतून त्या मुलांची मनोवस्था मांडली आहे. मात्र, सचित्र कविता असलेल्या पुस्तकात चित्रांतून पुरुषसत्ताक व्यवस्थेचे प्रतिबिंब दिसते.

अनुभवनिष्ठ बालचरित्र

'रानभुलीचे दिवस' या पुस्तकावर रवी कोरडे यांनी भाष्य केले. ललित लेखनाची मराठी आणि हिंदी साहित्यात मोठी परंपरा आहे. हा साहित्य प्रकार परिघावरचा आहे. कविता, कथा, कादंबरी अत्यंत सर्जनशील प्रकार मानला जातो. पण, जे कवितेतून व्यक्त करता येत नाही, त्या भावावस्थेतून होणारे लेखन ललित गद्य असते. रानभुलीचे दिवस हे पुस्तक आळंजकर यांचे बालपणीचे आत्मचरित्रच आहे. अनुभवनिष्ठता असल्याने त्यात कृतकता नाही, असे कोरडे म्हणाले.

शाळेच्या सुंदर आठवणी

'सुंदर माझी शाळा'वर डॉ. जिजा शिंदे यांनी विचार मांडले. हा कवितासंग्रह शाळेच्या सुंदर आठवणी आहेत. मुलांची मनोवस्था लक्षात घेऊन लेखन करणे कठीण असते. शिक्षण व्यवस्थेचे संक्रमण, हरवत चाललेली नैतिकता या परिस्थितीत गणेश घुले यांनी कवितेतून मुलांची मनोवस्था मांडली आहे, असे शिंदे म्हणाले. डॉ. गणेश मोहिते यांनी प्रास्ताविक केले. प्रा. वीणा माळी यांनी सूत्रसंचालन केले.

## उघड्यावर कचरा आणून टाकणाऱ्या हॉटेल व्यावसायिकावर कारवाई
### दंडात्मक कारवाई करणार : स्वाती पाटील

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : घंटा गाडी सुरू असूनही सिडको परिसरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग तयार झाले आहे. या परिसरात रिक्षाद्वारे कचरा आणून टाकणाऱ्या एका हॉटेल व्यवसायीकास सिडकोच्या सहाय्यक वसाहत अधिकारी स्वाती पाटील यांनी रंगेहाथ पकडून दंडात्मक कारवाई केली. घंटागाडी सुरु असूनही सिडको परिसरात नागरिक व हॉटेल व्यावसायिक कचरा आणून टाकत असल्याच्या अनेक तक्रारी सिडको व्यवस्थापनाला प्राप्त



झाल्या होत्या. त्या तक्रारीच्या अनुषंगाने सिडकोच्या सहायक वसाहत अधिकारी स्वाती पाटील या क्शन मोडवर येत कचरा टाकणाऱ्यांवर थेट कारवाई सुरू केली आहे. आज दुपारी सिडकोचे पथक गस्तीवर असतांना पाईपलाईन रोड वर हॉटेल चतुर्थीचा कचरा एका रिक्षात टाकून उघडल्यावर टाकत असतांना रंगेहाथ पकडले. या परिसरात पुन्हा कोणी कचरा आणून टाकू नये यासाठी या हॉटेल चालकावर मोठ्या रकमाची दंडात्मक कारवाई करणार असल्याचे स्वाती पाटील यांनी तरुण भारतशी बोलतांना सांगितले.

## ११ वी, १२ वी विज्ञानच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाविद्यालयातच मिळणार जातवैधता प्रमाणपत्र

छत्रपती संभाजीनगर, दि.३०(जिमाका):-शासनाने जाहीर केलेल्या १०० दिवस उद्दिष्ट कार्यक्रमांतर्गत येत्या १०० दिवस कालावधीत इ.११ वी व १२ वी विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या मागास प्रवर्गातील विद्यार्थी विद्यार्थिनींना जात वैधता प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयातच देण्यात येणार आहे,असे उपायुक्त तथा सदसय जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती छत्रपती संभाजीनगर डॉ. दीपक खरात यांनी कळविले आहे. इयत्ता ११वी व १२ वी विज्ञान शाखेत शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग, सामाजिक आर्थिक मागास प्रवर्ग, एएसईबीसी(मराठा) या मागास प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांच्या जाती प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. त्या करीता सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी आपले अर्ज https://bartievalidity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरुन अर्जाची हार्ड कॉपी संबंधित महाविद्यालयात दाखल करावी. संबंधित महाविद्यालयांनी हे अर्ज जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर करावे. समिती शिबिरे आयोजित करुन तात्काळ जात वैधता प्रमाणपत्र देईल,असे डॉ. खरात यांनी कळविले आहे.

## मराठी साहित्य संमेलनात दहशत, गुंडगिरीविषयी ठोस उपाययोजनांबाबत ठराव पारित करावा
### समाजवादी जनपरिषदेतर्फे मसापला निवेदन

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : दिल्ली येथे होत असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात पुढील ठराव पारित करण्याबाबत सार्वजनिक जीवनातून दहशत आणि गुंडगिरी नष्ट करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने ठोस उपाययोजना करून भयमुक्त समाज निर्मितीसाठी पुढाकार घ्यावा, असे पत्र समाजवादी जनपरिषदेचे अध्यक्ष ड. विष्णू ढोबळे यांनी मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील व कार्यवाह कुंडलिकराव अतकरे यांना रविवारी, २९ रोजी दिले.

निवेदनात म्हटले आहे की, सांप्रतच्या काळात देशातील सार्वजनिक जीवन कमालीचे अस्थिर आणि असुरक्षित बनले आहे. उगवणाऱ्या प्रत्येक दिवशी महिला, मुली, सामाजिकदृष्ट्या कमजोर घटकांकडून अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर सातत्याने हल्ले होत आहेत. अन्याय-अत्याचाराच्या घटना मन विषन्न करणाऱ्या आहेत. महाराष्ट्रातील बदलापूर, पुणे, बीड, परभणी इत्यादी ठिकाणच्या घटना केवळ हिमनगाचे टोक आहे. या स्वरुपाचीच परिस्थिती देशभर वाढीस लागलेली आहे. त्यामुळे काबाडकष्ट करूनही



स्थिर, सुरक्षित जगणे सामान्य नागरिकास अशक्य झाले आहे.

साहित्यिकांनी भूमिका घ्यावी

संविधानाच्या अमृत महोत्सवी काळात हे चित्र बदलण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज आहे अर्थातच याबाबत राज्यसंस्थेची भूमिका सर्वाधिक महत्त्वाची ठरते. गुन्हेगारांना राजाश्रय न देता कायद्याची कठोर अंमलबजावणी करून गुन्हेगारीस पायबंद करणे हे सरकारचे नैतिक आणि घटनात्मक कर्तव्य आहे. वाळू, ड्रग, शस्त्र अशा असामाजिक साधनांची तस्करी करणारे गुन्हेगार राजकीय पक्षांची पदे मिळवतात, निवडून येतात आणि मंत्रिपदे सुध्दा मिळवतात हे अधिक चिंताजनक आहे. या सर्व परिस्थितीत सामान्य नागरिक हतबल बनलेला आहे. स्वातंत्र्य आंदोलनात पाहिलेले निकोप समाजाचे स्वप्न आणि भयशून्य चित्त असलेला निर्भय नागरिक घडवण्याची अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आज साहित्यिकांनी भूमिका घेण्याची गरज आहे.

संमेलनात चर्चा व्हावी

माणसांच्या सुखदु:खाशी आणि भावभावनांशी अत्यंत तरल नाते असलेले कवी, लेखक, साहित्यिक हा वर्ग आहे. आजच्या प्रतिकूल परिस्थितीत समाज मनाला उभारी देण्यासाठी आणि सत्ताधाऱ्यांची कान उघाडणी करण्यासाठी साहित्य महामंडळाने संमेलनाच्या व्यासपीठावरून चर्चा आणि भूमिका घेणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच नवी दिल्ली येथे होणाऱ्या साहित्य संमेलनात या आशयाचा ठराव आपण संमत करावा, अशी विनंती ड. विष्णू ढोबळे यांनी मसापला केली आहे.

## वनवसींच्या कार्यक्षमतेला वाव देणारे उपक्रम राबवणे गरजेचे

### माध्यमतज्ज्ञ डॉ. धारूरकर यांचे प्रतिपादन

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

विरळ होत चाललेली जंगले, वने यामुळे वनवासी यांचे नैसर्गिक संसाधने नष्ट होत चालली आहेत. त्यामुळे त्यांच्या गरजेनुरूप त्यांना सक्षम बनवणारी यंत्रणा उभारावी लागेल तसेच त्यांच्या कार्यक्षमतेला वाव देणारे उपक्रम राबविणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध माध्यमतज्ज्ञ डॉ. वि. ल. धारूरकर यांनी येथे केले. अध्यक्षस्थानी मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती अंबादास जोशी होते.



छत्रपती संभाजीनगरमधील देवगिरी कल्याण आश्रमाच्या वतीने गुरुवारी, २६ डिसेंबर रोजी आयोजित अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमाचा स्थापना दिवस समारोह उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. धारूरकर बोलत होते. डॉ. धारूरकर यांनी कल्याण आश्रमाचा स्थापन उद्देश, कार्य या बाबत विस्तृत माहिती दिली.

अडचणी लक्षात घ्याव्यात

डॉ. धारूरकर म्हणाले, आदिवासी बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठीचे प्रयत्न करताना त्यांची आहार, संस्कृती, राहणीमान यावर विपरित परिणाम तर होणार नाहीना याचा अभ्यास करावा लागेल. आदिवासी, वनवासी व जनजाती रहिवासी भागात प्रत्यक्ष भेटी देवून त्यांच्या गरजा, अडचणी व त्यांनी सुचविलेले पर्याय विचारात घेऊन उपक्रम राबविण्यात यावेत, असे धारूरकर म्हणाले.

उपक्रमांची प्रशंसा

देवगिरी कल्याण आश्रम द्वारे चालू असलेले विविध कार्याची, आरोग्य रक्षक, रक्षाबंधन , दिवाळी फराळ वाटप, रथ यात्रा, बाल संस्कार वर्ग, युवा चेतना शिबिर, गुणवंत विद्यार्थी सत्कार, हितरक्षा जनजागृती आदी विविध आयामांची डॉ. धारूरकर यांनी प्रशंसा केली. शेवटी पसायदान आणि नंतर स्नेहाभोजनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## पाटेगाव पुलावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची गरज

पैठण दि २९ :- पैठण लगतच्या गोदावरी पात्रावरील पटेगाव पुलावर अनेक संशयास्पद घटना घडत असून या घटना रोखण्यासाठी पुलावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची गरज निर्माण झाली आहे.

काही महिन्यांपासून पैठण-शेवगाव रस्त्यावरील पाटेगाव पुलावरून उडी घेऊन गोदावरी पात्रात आत्महत्या करण्याचा घटना घडत आहेत. डॉक्टर महिलेची मुलासह आत्महत्या करण्याची घटना ताजी असतांना शनिवार दिनांक २८ डिसेंबर रोजी दुपारी याठिकाणी एका वृद्ध महिलेचे शव पाण्यात तरंगतांना आढळून आले. याप्रकरणी पैठण पोलिसांत अनोळखी वृद्ध महिलेच्या अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.सदरील मृत वृद्ध महिलेची ओळख अद्याप पटली नसून या महिलेने स्वतः आत्महत्या केली की कुणी त्यांना मृत अवस्थेत तेथे आणून टाकले हा प्रश्न उपस्थित होत आहे. अनोळखी वृद्ध महिलेच्या मृत्यू बाबत असे प्रश्न सध्या अनउत्तरीत असून पैठण पोलीस याचा शोध घेत आहेत. अश्या घटना पुलावर घडल्यास घटनेचे नेमके सत्य बाहेर येण्यासाठी पाटेगाव पुलावर सेफ्टीसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची गरज निर्माण झाली आहे.

## गो तस्करी विरुद्ध पैठण पोलिसांची कारवाई; ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा

पैठण दि २९ :- पर राज्यातल्या वाहनातून गोमातेची चोरी करून तस्करी करणाऱ्या वाहनाची शनिवारी पहाटे पैठण पोलिसांनी फिल्मी स्टाईल पाटला करून पकडले असून. तस्करी करण्यात येणाऱ्या पाच गोमातेची सुटका केली असून वाहनासह ६ लाख रुपयाचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.



अधिक माहिती अशी की शुक्रवारी दि.२७ रोजी रात्री पैठण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय देशमुख आपल्या पोलीस सहकार्यासह पेट्रोलिंग ग्रस्त घालीत असताना पहाटेच्या दरम्यान गोपनीय माहिती मिळाले की शेवगाव तालुक्यातील घोटण या गावातून पाच ते सहा अनोळखी चोरट्यांनी गोमातेची चोरी करून पर राज्यातील क्रमांक ठग३२त्रझ -३४५४ या वाहनातून पैठणकडे येत असल्याची माहिती मिळाल्याने तात्काळ पोलीस निरीक्षक संजय देशमुख, पो. कॉ कल्याण ढाकणे, नरेंद्र अंधारे, गायके, राजेश आटोळे यांनी शनिवारी पहाटेच्या सुमारास नवीन तहसील परिसरातून ही वाहन पळून जात असताना फिल्मे स्टाईल पाठलाग करून सदरील वाहनाला पकडले मात्र गोमातेची तस्करी करणारे पळून जाण्यात यशस्वी झाले. या वाहनाची झडती घेऊन यामध्ये असलेल्या पाच गोमातेची सुटका करून यामध्ये एक गोमाता आजारी असल्याने तात्काळ या गोमातेवर पोलीस ठाण्यात पशुवैद्यकीय पथकाकडून उपचार केला व इतर गोमातेला पैठण येथील विजय पांडुरंग गोशाळेत सुखरूप सोडण्यात आले. या घटनेत पाटेगाव येथील शेतकरी ज्ञानदेव बाबुराव डोंगरे यांच्या घरासमोरील पत्र्याच्या शेड मधून ८० हजार रुपये किमतीची गाय देखील या चोरट्यांनी चोरल्यामुळं पैठण पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून ६ लाख रुपयाचा मुद्देमाल हस्तगत केला. पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे, पोलीस निरक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार लक्ष्मण पुरी हे करीत आहे.

## श्रीमती राजाबाई माधवलालजी धूत कन्या विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

### शिवराज्याभिषेक व महाभारत व संत तुकाराम गाथेवरील नृत्य नाटिकांचे बहारदार सादरीकरण

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२९ डिसेंबर : गंगापूर शहरातील श्रीमती राजाबाई माधवलालजी धूत कन्या प्रशाला व उच्च महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये विद्यार्थिनींनी सादर केलेल्या शिवराज्याभिषेक व महाभारत व संत तुकाराम गाथेवरील नृत्य नाटिकांच्या बहारदार सादरीकरणाने उपस्थितांची वाहवा मिळवली.

शाळेच्या प्रांगणात झालेल्या या संमेलनाचे उदघाटन अध्यक्ष सुशिलकुमार मंत्री यांच्या हस्ते झाले यावेळी शालेय समितीचे सदस्य सौ. तृप्ती मंत्री, संतोष भालेराव, राजेंद्र सरोवर, रमेश पाटील प्राचार्या संजीवनी तांबे, विदुला शास्त्री यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी स्नेहसंमेलन दरम्यान घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये यशस्वी झालेल्यांसह गतवर्षी दहावी, बारावी परीक्षांमध्ये सर्वप्रथम आलेल्यांचा बक्षिसे देउन गौरव करण्यात आला.





यावेळी इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थिनींनी जुन्या नवीन गाण्यांवर आधारित रिमीक्स गीते, लावणी, देशभक्तीपर गीते, प्रबोधनात्मक गीतांसह ऐतिहासिक महाभारत, शिवराज्याभिषेक संत तुकाराम गाथेवर आधारित नृत्य नाटिका सादर करताना उत्कृष्ट अभिनय करून जिवंत इतिहास उपस्थितांसमोर उभा केल्याने प्रेक्षकांनी या सादरीकरणाला टाळ्यांच्या कडकडाटात दाद देत वाहवा केली.

याप्रसंगी स्नेहसंमेलनामध्ये घेण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये शाळेतील साडेतीनशेवर विद्यार्थिनींनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवला. त्यांना प्रतिसाद देण्यासाठी हजारावर पालक व मान्यवरांच्या उपस्थितीने शाळेचा परिसर फुलून गेला होता. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती अरूंधती जोसाळकर व अंजली मांडे, आभार प्रदर्शन अर्चना राउत यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षिकांसह कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## बिडकीन येथे फळ विक्रेत्याला तीन जणांकडून जबर मारहाण; गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा



बिडकीन दि २९ डिसेंबर पैठण तालुक्यातील बिडकीन येथील श्री स.भु विद्यालयाच्या समोर एका फळ विक्रेत्याला तिघा जणांकडून जबर मारहाण करून गंभीर जखमी करण्यात आले.

सविस्तर माहिती अशी की स.भु विद्यालय समोर फळ विक्रीची दुकान असून हुजेफ असिफ बागवान केळी हा नेहमी प्रमाणे सकाळी नऊ वाजेच्या सुमारस ग्राहक करीत होता केळी घेण्यासाठी आलेल्या ग्राहकांनी केळी दाबून पाहिली व भाव कमी जास्त करण्याच्या कारणावरून हुज्जत व बाचाबाची झाली. काही लोकांनी हा चालू असलेला वाद मिटवला त्यानंतर वाद गिरनार तांडा छत्रपती संभाजीनगर जाऊन परत वाद घालण्यासाठी तीन जण बुलेट या दुचाकीवर येऊन व फळ विक्रेत्याला लोखंडी मोज मापाने डोक्याला जबर मारल्याने रक्तबंबाळ होऊन मोठी दुखापत फळ विक्रेत्याला झाली.

नातेवाईक ,मित्रांनी मारहाणीत जख्मी झालेल्या हुजेफला बिडकीन ग्रामीण रुग्णालय येथे दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी प्रथमोपचार करून छत्रपती संभाजी नगर शासकीय रुग्णालय येथे पुढील उपचारासाठी हलवले. या मारहाणीतील आरोपी राहुल जयसिंग चव्हाण (वय २४) राहणार गिरनेरा तांडा ता.जि. छत्रपती संभाजीनगर,व अमोल जयसिंग चव्हाण यास पोलिसांनी ताब्यात घेतले असून यातील एक फरार आरोपी यांच्या विरोधात बिडकीन पोलीस स्टेशन येथे रात्री उशिरा पर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू होती. जखमी हुजेफ बागवान यास शासकीय रुग्णालयातून उपचार करून सुट्टी देण्यात आल्यानंतर त्यास खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## सोयगावात दत्त मंदिरात श्री.संत जगनाडे महाराज यांना अभिवादन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२९ डिसेंबर

सोयगाव शहरातील दत्त मंदिरात शनिवारी श्री संत संताजी जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्ताने शनिवारी अभिवादन करण्यात आले यावेळी शिवसेना तालुका प्रमुख(शिंदे गट)प्रभाकर काळे,

सुरेश बनकर (उद्धव ठाकरे गट) यांनी प्रमुख उपस्थिती होती.ह.भ.प.जान्हवीताई सोनवणे यांनी मान्यवरांचे स्वागत केले तसेच अरूण सोहणी यांनी शाल श्री फळ देऊन सत्कार केला.



शहरातील समस्त तिळवण तेली समाजाच्या वतीने या अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी नगरसेवक राजू दुतोंडे,कैलास काळे,सुनील गावंडे, मयूर मनगटे, नगरसेवक राजेंद्र जावळे,वसंत बनकर,नगरसेवक हर्षल काळे,नगरसेवक संतोष बोडखे, मोतीराम पंडित,अरुण सोहनी,मंगेश सोहनी,दिलीप मालोदे, संतोष सोनवणे,दत्तू सोनवणे,बंडू मिसाळ,शांताराम सन्सासे, कैलास पंडित,विनोद तेली,पिंटू सोहनी,सोनवणे,गणेश बागले,शिवाजी मालोदे,दत्तू राऊत,विक्रम सोहनी,गणेश क्षिरसागर,संदीप सोहनी आदींची उपस्थिती होती.

## रा.प.नाशिक ते छत्रपती संभाजीनगर बसेस गंगापूर बस स्थानकात येत नसल्याने प्रवाशांना मनस्ताप; आ. प्रशांत बंब यांचे विभागीय नियंत्रकांना पत्राद्वारे मागणी

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२९ डिसेंबर:

नाशिक, छत्रपती संभाजी नगर राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस गंगापूर बस स्थानकात येत नसल्याने या बसेस छत्रपती शिवाजी महाराज चौकातूनच परस्पर मार्गस्थ होत आहेत बस स्थानकातील प्रवाशांना तासनतास बसची वाट पाहत उभे राहावे लागत आहे. त्यामुळे अनेक प्रवाशांना वेळेनुसार बस न मिळाल्याने अनेकांच्या कामांचे नियोजन बिघडत आहे. वेळेवर बस न मिळाल्याने पोहचण्यासाठी विलंब होत आहे. यासंबंधी गंगापूर खुलताबाद तालुक्याचे आमदार प्रशांत बंब यांनी विभागीय नियंत्रक छत्रपती संभाजीनगर यांना पत्र देऊन सदरील बस या गंगापूर बस स्थानक येथे येणे अनिवार्य असून प्रवाशांची होणारी गैरसोय तात्काळ थांबविण्यात यावी. तर काही प्रवाशांना छत्रपती शिवाजी महाराज येथेच बसमधून उतरावे लागत आहे त्यामुळे त्यांना पुन्हा पायपीट करत बस स्थानक जावे लागत आहे.

> **छत्रपती संभाजी नगर व नाशिक परिवहन मंडळाच्या बसेस या गंगापूर बस स्थानकात येत नसून वाहक आणि चालक यांना पत्र देऊन सक्ती करण्यात यावी तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात कायमस्वरूपी वाहतूक नियंत्रकाची नेमणूक करण्यात यावी. या मागणीचे पत्र विभागीय नियंत्रक यांना दिले आहे.**
>
> **- आ. प्रशांत बंब.**

छत्रपती संभाजीनगर ते नाशिक व नाशिक ते छत्रपती संभाजीनगर कडे जाणाऱ्या या दोन्ही विभागाच्या राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस गंगापूर बस स्थानकात येजा करत नसून त्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातूनच निघून जात आहे परंतु या बसेसच्या मार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना बस स्थानकातच ताटकळत उभे राहावे लागत आहे. त्या मार्गावरून जाणाऱ्या बसेसच्या वाहक आणि चालक यांना पत्र काढून सर्व बस गाड्या गंगापूर आगारात येण्याचे सक्तीचे करण्यात यावे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात कायमस्वरूपी वाहतूक नियंत्रक यांची नियुक्ती करण्यात यावी अशी मागणी आमदार प्रशांत बंब यांनी केली आहे.

# राज्यासाठी समृद्धी घेऊन येणार टोयोटा : किर्लोस्कर मोटर्स

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून २० हजार कोटीची छत्रपती संभाजी नगर मध्ये गुंतवणूक

**टोयोटा किर्लोस्कर मोटर्स काय घेऊन येणार छत्रपती संभाजीनगर मध्ये राज्याच्या मागणीनुसार काय काय उभारण्यात येणार हे प्रत्यक्ष ठरवण्यात येणार असले तरी कर्नाटकच्या धरतीवर उभारण्यात आलेल्या प्रकल्पाप्रमाणे छत्रपती संभाजीनगर मध्ये ही प्रकल्प उभारण्यात येणार आहे.**

छत्रपती संभाजीनगर- राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेत जपान येथे जाऊन कर्नाटकच्या धरतीवरील प्रकल्पा सारखा प्रकल्प महाराष्ट्रातही घेऊन यावा अशी टोयोटा किर्लोस्कर मोटर्स कडे मागणी केली. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत पाहणी करून ऑरिक सिटीतील बिडकीन एमआयडीसी मध्ये येण्यास हिरवा कंदील दाखवला. आता २०२८ -२९ मध्ये उत्पादनाला सुरुवात होणार आहे. टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या येण्याने मराठवाड्यात समृद्धी येणार हे मात्र निश्चित आहे.







### सी एस आर फंडातून आरोग्य व सामाजिक उपक्रमाला गती मिळणार

कर्नाटक राज्यातील रामनगर येथे सी एस आर फंडातून टोयोटा किर्लो स्कर मोटार ने बारा कोटी रुपये खर्च करून शासकीय रुग्णालयाला इमारत बांधून दिलेली आहे त्यातील स्वच्छता व शिस्त आपल्याकडील खाजगी रुग्णालया याप्रमाणे जाणवली आहे. कंपनीतर्फे कोविड काळात येथेच पाच कोटी रुपये खर्च करून एक ऑक्सिजन प्लांट उभारण्यात आला . या प्लांट मधून तयार होणाऱ्या ऑक्सिजन कोविड काळात मोफत वितरित करण्यात आल्याचे सांगण्यात आले. एकंदरीत टोयोटा किर्लोस्कर मोटार च सामाजिक शैक्षणिक आणि आरोग्य विषयक कार्य पाहता राज्याचा आर्थिक जडणघडणीत मोलाचा वाटा असणार आहे व राज्याला समृद्धी लाभणार आहे.





### छत्रपती संभाजी नगर मध्ये इकोझोन

टोयोटा किर्लोस्कर मोटर शहरात येण्याच्या कंपनीने कर्नाटक राज्यात चार हजार एकशे कोटी रुपये याचे गुंतवणूक करून वायु प्रदूषण त्याचबरोबर पाणी प्रदूषण कमी करण्याचे उद्देशाने गुंतवणूक केली आहे. यामध्ये इको गार्डन आणि सोलार प्लांट उभारण्यात आला असून कंपनीसाठी लागणारे वीज याच प्लांट मधून वापरण्यात येते. आता कंपनी आपल्याकडे येण्याच्या हालचाली वाढल्या आहेत . कर्नाटक मधील प्रकल्पाप्रमाणे पर्यावरणास 'कार्बनमुक्त प्रोजेक्ट' कंपनीतर्फे आपल्याकडेही राबवण्यात येणार असून इको गार्डन आणि सोलर प्लांट आपल्याकडेही उभारण्यात येईल हेही स्पष्ट झाले आहे. या सोलर प्लांट मधून आपल्याकडेही संपूर्ण वीज वापरली जाईल असेच चित्र दिसत आहे.

### तांत्रिक प्रशिक्षणाद्वारे कंपनीच तयार करणार कारागीर

बिडकीन एमआयडीसीमध्ये उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पात ८००० लोकांच्या हाताला काम मिळणार आहे. यामध्ये स्थानिक लोकांनाच प्राधान्य असणार असून आवश्यक कुशल कामगार कंपनीच घडवणार आहे यासाठी कर्नाटकच्या धरतीवर(ढढढख) टोयोटा टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट भरण्यात येणार असून याद्वारे शिका आणि कमवा या तत्त्वावर आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना दोन आणि तीन वर्षाचे निवासी प्रशिक्षण देत त्यांना सक्षम करण्यात येणार आहे. सध्या टोयोट किर्लोस्कर मोटर्स कर्नाटक येथील बिदाडी एमआयडीसी मध्ये TTTI अंतर्गत तेथील विद्यार्थ्यांना निवासी प्रशिक्षण देत आहे.

**उद्योग वार्ता**
**नारायण गायकवाड**

टोयोटा किर्लोस्कर मोटर्स आणि महाराष्ट्र सरकार यांच्यात ३१ जुलै २०२४ रोजी वीस हजार कोटी रुपयाची गुंतवणूक करारावर स्वाक्षरी करत ८२७ एकर जमीन महाराष्ट्र राज्य कंपनीला देत असल्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले होते. त्यानुसार ऑक्टोबर २०२४ मध्ये झालेल्या कराराप्रमाणे टोयोटा किर्लोस्कर मोटर्स ने ८२७ एकर जमिनीचे रक्कम अळल कडे जमा करण्यात आली आहे.

आता कंपनीने राज्यात येण्याच्या हालचालींना वाढ केली आहे त्याप्रमाणे वीस हजार कोटी रुपये ग्रीन फील्ड मॅन्युफॅक्चरिंग सुविधा असलेला प्रकल्प उभारण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथील ऑरीक (औरंगाबाद इंडस्ट्रियल सिटी) बिडकीन झोनमध्ये राज्यातील सर्वात मोठा चार चाकी इलेक्ट्रिक वाहन निर्माण करणारा प्रकल्प उभारणार आहे. राज्यासह मराठवाड्याच्या अर्थकारणाला या प्रकल्पाचा फार मोठा फायदा होणार असून कंपनीच्या प्रत्येक घडामोडीवर उद्योग जगताचे लक्ष लागलेले आहे.

**२०२८-२९ पर्यंत उत्पादन होणार सुरू**

प्लांट उभारणीच्या कामाची सुरुवात लवकरच प्रेरण्यात येणार असून २०१८ २९ पर्यंत उत्पादन सुरू होऊ शकते असे टोयोटा किर्लोस्कर मोटर्सचे कंट्री हेड आणि कार्यकारी उपाध्यक्ष विक्रम गुलाटी यांनी बेंगळूर येथे दृकश्राव्य माध्यमातून तरुण भारत शी बोलताना सांगितले. यावेळी ढघच् चे कार्यकारी उपाध्यक्ष, वित्त आणि प्रशासन जे शंकरा, एस व्ही पी आणि मुख्य संपर्क अधिकारी सुदीप दळवी, महा व्यवस्थापक परराष्ट्रीय व्यवहार आणि जनसंपर्क अधिकारी नरेंदर कुक्रेती आदी उपस्थित होते.